



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार १८ आक्टोबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# संविधानाचे पुस्तक कपाळी लावणारे माओवाद्यांचे रक्षक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी एनडीटीव्ही वर्ल्ड ग्लोबल समिटमध्ये भाषण केले. ते म्हणाले, 'त्यांच्या राजवटीत काँग्रेस पक्षाने माओवादी दहशतीला लपवत होते. देशातील जवळजवळ प्रत्येक मोठे राज्य नक्षलवादी हिंसाचार आणि माओवादी दहशतीच्या विळख्यात होते.'पुढे, काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे नाव न घेता ते म्हणाले, 'मी मोठ्या जबाबदारीने बोलतो. संविधान कपाळावर घेउन नाचणारे अजूनही माओवाद्यांना संरक्षण देण्यात दिवसरात्र गुंतलेले आहेत.'पंतप्रधान मोदी म्हणाले, 'दहशतवादी हल्ल्यांनंतर भारत आता गप्प बसत नाही. आता, भारत शत्रूला सर्जिकल-एअर स्ट्राइक आणि ऑपरेशन सिंदूरने प्रत्युत्तर देतो. भारत थांबण्याच्या मनःस्थितीत नाही. आम्ही थांबणार नाही. १४० कोटी देशवासी एकत्र वेगाने पुढे जातील.'



पंतप्रधान मोदी म्हणाले की, गेल्या दशकात हजारो नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. गेल्या ७५ तासांतच ३०३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. ज्यांना एकेकाळी '३-नॉट-३' म्हणून ओळखले जायचे, त्यांनी आज आत्मसमर्पण केले आहे. यापैकी काहींवर १ कोटी, काहींवर १.५ दशलक्ष आणि काहींवर ५ लाख रु पयांचे बक्षीस होते.पंतप्रधान मोदी एनडीटीव्ही शिखर परिषदेत म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरची जगभरात मोठ्या प्रमाणात चर्चा झाली आहे. 'नक्षलवाद, प्रत्यक्षात माओवाद, मी तुम्हाला दहशतवादाची कहाणी सांगतो. काँग्रेसच्या राजवटीत शहरी नक्षलवादी परिसंस्था अजूनही काही प्रकारे वर्चस्व गाजवते.'ते पुढे म्हणाले, 'आपल्या देशात दहशतवादाची चर्चा झाली. काँग्रेसच्या राजवटीत माओवादी दहशतवादावर पडदा टाकण्यात आला. या दहशतीचे अनेक बळी दिल्लीत आले. त्यांना अपंगत्व आले. ते माओवादी दहशतीचे बळी होते. त्यापैकी अनेकांचे दोन्ही पाय कापण्यात आले. ते सात दिवस हात जोडून आमचा संदेश जगाला पोहोचवण्याची विनंती करत राहिले.'

## भारताकडे स्वतःचे 4G नेटवर्क

अलिकडेच, BSNL ने मेड इन इंडिया 4G लाँच करण्याची चर्चा होती. आज आपण अभिमानाने म्हणू शकतो की भारत स्वतःचे 4G नेटवर्क असलेल्या पहिल्या पाच देशांमध्ये आहे. भारताने 2G बद्दल ऐकले आहे. ज्या सरकारी कंपन्यांना उद्ध्वस्त करण्यात काँग्रेसने कोणतीही कसर सोडली नाही, त्यांना आपण फायदेशीर बनवले आहे.




## 11 वर्षांत 25 कोटी गरीब लोकांना आम्ही गरिबीतून बाहेर काढले




पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'गेल्या ११ वर्षांत आमच्या सरकारने २५ कोटी गरीब लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे. म्हणूनच आम्हाला आमच्या सरकारवर विश्वास आहे. आज भारतात गरीब आणि वंचितांच्या सेवेसाठी समर्पित सरकार आहे. आम्ही वंचितांना प्राधान्य देतो आणि त्यांना प्रथम स्थान देतो.'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, आयकर आणि जीएसटी कमी करण्यात आला आहे. १२ लाख रु पयांपर्यंतच्या उत्पन्नावरील आयकर शून्य करण्यात आला आहे. विक्रीचे रेकॉर्ड मोडले जात आहेत. देशवासीयांना दरवर्षी २.५ लाख कोटी रु पये वाचवण्याची हमी आहे.

# पटेलांच्या मंत्रिमंडळात 19 नवीन चेहरे

## रिवाबा जडेजांसह तीन महिलांचा समावेश





**गांधीनगर/वृत्तसंस्था :** भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने गुजरातमध्ये मोठा फेरबदल केला असून मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळातील सर्वच मंत्र्यांचे राजीनामे घेतल्यानंतर १९ नवीन चेह-यांसह २६ जणांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. मंत्रिमंडळ विस्तार करताना भाजपने सामाजिक समीकरणाची विशेष काळजी घेतली असून तीन महिलांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे.

२०२७ मध्ये होणा-या विधानसभा निवडणुकीची भाजपने आतापासूनच तयारी सुरू केली आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांचे संपूर्ण मंत्रिमंडळच बदलण्यात आले आहे. नव्या मंत्रिमंडळात कोण असेल हेही स्पष्ट झाले आहे. क्रिकेटपटू रवींद्र जडेजाची पत्नी आमदार रिवाबा जडेजा यांच्यासह तीन महिलांना मंत्री केले आहे. भूपेंद्र पटेल यांच्या आधीच्या मंत्रिमंडळातील ११ मंत्र्यांना वगळण्यात आले असून फक्त ६ जणांनाच पुन्हा संधी देण्यात आली आहे.भूपेंद्र पटेल सप्टेंबर २०२१ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री बनले होते. तेव्हा विजय रु पाणी यांना अचानक हटवण्यात आले होते. त्यानंतर डिसेंबर २०२२ मध्ये भाजपला पुन्हा बहुमत मिळाले आणि भूपेंद्र पटेल मुख्यमंत्री बनले. त्यांचे हे तिसरे मंत्रिमंडळ असणार आहे. भूपेंद्र पटेल, मुख्यमंत्री, त्रिकम बीजल चांगा, स्वरु पजी ठाकोर, प्रत्रवणकुमार गोर्धनजी माळी, ऋतिकेश गणेशभाई पटेल, पीसी बराडा, दर्शना एम. वाघेला, कांतीलाल शिवलाल अमृतिया, वरजीभाई मोहनभाई बावलिया, रिवाबा जडेजा,अर्जून मोढवाडिया, प्रद्यमन वाजा, कौशिक कांतीभाई वेकरिया, परशोत्तम सोलंकी, जितेंद्रभाई सावजीभाई वाघाणी, रमणभाई भीखाभाई सोलंकी, कमलेशभाई रमेशभाई पटेल, संजय सिंह महेदा, रमेशभाई भूराभाई कटारा, मनीषा राजीवभाई वकील, ईश्वर सिंह ठाकोरभाई पटेलचा समावेश आहे.

## सहा नृत्यांगनांचा सामूहिक आत्महत्येचा प्रयत्न

**कोल्हापूर :** कोल्हापूरमध्ये शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर रोजी एक धक्कादायक घटना घडली आहे. येथील महिला सुधारगृहामध्ये असलेल्या सहा नृत्यांगनांना सामूहिकरीत्या जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. या सर्व नृत्यांगनांनी आपल्या हाताच्या नसा कापून घेत जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र ही घटना उघडकीस येताच प्रशासनाने धावपळ करून सर्व महिला नृत्यांगनांना तातडीने उपचारांसाठी रु ग्णालयात दाखल केले. अधिक माहितीनुसार सध्या महिला सुधारगृहात असलेल्या या सहा नृत्यांगनांना पोलिसांनी दोन महिन्यांपूर्वी केलेल्या कारवाईदरम्यान, ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्यांची रवानगी महिला सुधारगृहामध्ये करण्यात आली होती. दरम्यान, आज सकाळच्या सुमारास सहा नृत्यांगनांनी आपल्या हाताची नस कापून घेत जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रशासनाने प्रसंगावधान दाखवत त्यांना तातडीने रु ग्णालयात दाखल केल्याने त्यांचे प्राण वाचले. आता या नृत्यांगनांवर रु ग्णालयात उपचार सुरू आहेत. पण या नृत्यांगनांनी सामूहिकरीत्या जीवन संपवण्याचा प्रयत्न का केला, याबाबतचे कारण मात्र अद्याप समोर आलेले नाही. याबाबत पोलिस अधिक तपास करत आहेत.



# नाशिकमधून झेपावले 'तेजस'

## स्वदेशी बनावटीचे तेजस विमान एचएएलची ऐतिहासिक कामगिरी



**नाशिक/प्रतिनिधी :** आत्मनिर्भर भारत संकल्पनेला बळ देणारी ऐतिहासिक घटना शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर रोजी नाशिककरांनी अनुभवली. देशात बनवलेले पहिले तेजस एमके १ ए लढाउ विमान नाशिकमधील हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) च्या ओझर युनिटमधून आकाशात झेपावले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत ही ऐतिहासिक कामगिरी पार पडली.

हे अत्याधुनिक लढाउ विमान भारतीय वायुसेनेत अधिकृतपणे दाखल झाले असून त्यासोबतच एचएएलच्या नवीन उत्पादन लाईनचे उद्घाटनही यावेळी करण्यात आलं. बंगळुरू नंतरची ही दुसरी उत्पादन सुविधा असून, स्वदेशी संरक्षण क्षमतेच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण घडी ठरली आहे. एचएएलच्या नाशिक युनिटमध्ये तयार करण्यात आलेल्या तेजस एमके १ ए विमानाने आज पहिली झेप घेतली. विमान लँड झाल्यानंतर धावपट्टीवर अग्निशमन दलाच्या पाण्याच्या फवा-यांनी त्याचे जलतुषारात स्वागत करण्यात आले. यानंतर चित्तथरारक एअर शो सादर करण्यात आला, ज्यामध्ये तेजस आणि सुखोई लढाउ विमानांनी सहभाग घेतला.

***तेजस विमानाची वैशिष्टये-*** पूर्ण भारतीय बनावटीचे तेजस विमान सर्वात हलके लढाउ विमान आहे. ताशी २००० किलोमीटर वेग आणि हवेतच इंधन भरण्याची क्षमता आहे. ध्वनीच्या वेगाच्या १.६ पट म्हणजेच सुमारे २,००० किमी प्रतितास वेगाने उड्डाण करण्यास हे विमान सक्षम आहे. ५०,००० फूट उंचीपर्यंत सहज उड्डाणाची क्षमता आहे. सर्व दिशांनी लक्ष्य साधण्याची क्षमता असलेले हे लढाउ विमान आहे. एईएसए रडारमुळे एकाच वेळी अनेक लक्ष्य ओळखणे (पान २ वर)

# हिंदू मुलींनी जिमला जाऊ नये, घरीच योग करावा-पडळकर

**बीड/प्रतिनिधी :** भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी हिंदू मुलींना जिममध्ये न जाण्याचा सल्ला दिला. कॉलेजला जाणा-या हिंदू मुलींना सल्ला देत ते म्हणाले की, मुलींनी जिमला जाउ नये. त्यांनी घरीच योग करावा. तुम्हाला माहीत नाही की तिथे कोण प्रशिक्षण देत आहे आणि कोणता कट रचला जात आहे असे गोपीचंद पडळकर म्हणाले. पडळकरांच्या या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. भाजप आमदार गोपीचंद यांनी महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात एका जाहीर सभेत हे वक्तव्य केले आहे. हिंदू मुलींनी जिममध्ये जाउ नये, घरीच योग करावा. त्यांना माहीत नाही की एक मोठा कट रचला जात आहे असे गोपीचंद पडळकर म्हणाले. त्यांनी एका विशिष्ट समुदायाचा उल्लेख करत सांगितले की, ते हिंदू मुलींना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत.



***भाजप आमदाराचे वादग्रस्त वक्तव्य-*** गोपीचंद यांचा इशारा एका विशिष्ट समुदायाकडे होता. त्यांनी सांगितले की, हिंदू मुलींना माझी नम्र विनंती आहे की, त्यांनी अशा जिममध्ये जाउ नये, जिथे त्यांना प्रशिक्षक कोण आहे हे माहीतच नाही. कॉलेजला जाणा-या मुलींनी जिममध्ये जाण्याऐवजी घरी योग करावा. त्यांनी अशा ठिकाणांपासून सावध राहावे, जिथे जिम प्रशिक्षक कोण आहे हेही माहीत नाही. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी यामागे एक मोठा कट असल्याचा इशारा दिला. त्यांनी कॉलेजला जाणा-या तरुणांची ओळख (पान २ वर)

## प्रत्येक प्रकरणात सीबीआय चौकशी आदेश देणे अयोग्य!

**नवी दिल्ली :** न्यायालयांनी नियमितपणे सीबीआय चौकशीचे आदेश देउ नयेत. आपले अधिकार अधिक संयम आणि सावधगिरीने वापरावेत. जेव्हा इतर सर्व पर्याय संपले असतील आणि प्रकरणाची निष्पक्षता बाधित झाली असेल, तेव्हाच सीबीआय चौकशीचा अवलंब केला पाहिजे. प्रत्येक प्रकरणात सीबीआय चौकशीचा आदेश देणे केवळ संस्थेवरील कामाचा भार वाढवत नाही, तर राज्यांच्या तपास यंत्रणांवरील विश्वासालाही धक्का देते, अशी महत्वाची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. हा निर्णय अलाहाबाद हायकोर्टच्या आदेशावर दिला गेला आहे. हायकोर्टने उत्तर प्रदेश विधान परिषदेत कर्मचा-यांच्या भरती प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी सीबीआयला निर्देश दिले होते. या आदेशावर आक्षेप घेत न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने हायकोर्टचा तो निर्णय रद्द केला आणि स्पष्ट केले की, सीबीआय चौकशीचा आदेश सहजासहजी देता येत नाही. न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले की, सीबीआय चौकशीचा आदेश सामान्यतः देउ नये किंवा केवळ यासाठी देउ नये की, कोणत्या तरी पक्षाने एखाद्या राज्यातील पोलिसांवर अविश्वास दाखवला आहे. सीबीआय चौकशीचा आदेश देण्याचा अधिकार संयमाने, सावधगिरीने आणि केवळ अपवादात्मक परिस्थितीत वापरला पाहिजे. संबंधित न्यायालयाला खात्री पटली पाहिजे की, संबंधित प्रकरणात सीबीआय तपास आवश्यक आहे, किंवा प्रकरण इतके गुंतागुंतीचे, व्यापक किंवा राष्ट्रीय प्रभावाचे आहे की, केंद्रीय एजन्सीची गरज भासते. केवळ अशा परिस्थितीतच सीबीआय चौकशीचे आदेश द्या.



# तलाठी भरतीत महसूल सेवकांना प्राधान्य

**मुंबई/प्रतिनिधी :** तलाठी भरतीत सामावून घेण्याची महसूल सेवकांची मागणी होती. त्यांच्या या मागणीचा गांभीर्याने विचार करीत सरकारने या महसूल सेवकांनाच आता तलाठी भरतीत प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. भरतीत महसूल सेवकांना प्राधान्य देणार असल्याचे अश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. मंत्रालयात महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. यावेळी मुख्य सचिव राजेश मिना, अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे, तसेच महसूल सेवक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणीमध्ये समाविष्ट करून मानधनाऐवजी वेतनश्रेणी मंजूर करण्याची मागणी विचारात घेण्यात आली. मात्र, सध्याच्या नियमांनुसार वेतनश्रेणी लागू करता येत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.



महसूलमंत्र्यांनी महसूल सेवकांना न्याय देण्यासाठी पर्याय सूचवला. त्यांच्या अनुभवानुसार तलाठी (पान २ वर)

# त्याने बुट मारला, आम्ही बुलेट मारू!

## भीम आर्मी आक्रमक; अपमान सहन करणार नाही

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर वकील राकेश किशारने बुट मारला. दुसरा वकील अनिल मिश्रा संविधान संपविण्याचा आणि संविधान निर्माते बाबासाहेबांचे विचार संपविण्याची भाषा करतो. आता हा अपमान सहन केला जाणार नाही. त्याने बूट मारला, आम्ही बुलेट मारू, गाली का जबाब गोलियोसे दिया जाएगा, असा इशारा भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी आज जनआक्रोश मोर्चाप्रसंगी दिला. सरन्यायाधीशांवर हल्ला करणा-या वकील राकेश किशोर आणि अनिल मिश्रा यांच्याविरुद्ध देशद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत, त्यांची सनद रद्द करावी या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी आज (१७ ऑक्टोबर) भीम आर्मीच्या वतीने सतीश पवार यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. तत्पूर्वी जिजामाता प्रेक्षागार मैदानावर झालेल्या सभेला संबोधित करताना येथून पुढे होणारे अन्याय, अत्याचार सहन केले जाणार नाही, असा इशारा सरकारला देण्यात आला. सुरु वातीला संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. सुरेश जाधव, अनंता मिसाळ, कैलास खिल्लारे, शैलेश वाकोडे, प्रकाश धुंदळे, संतोष वानखडे यांनी मोर्चात आपले सडेतोड विचार मांडले. मल्हारी गवई यांनी मनुवादी विचारसरणीवर आधारित गीत सादर केले. संगम चौक, जयस्तंभ चौक, बाजार लाइन, कारंजा चौक या मार्गाने घोषणाबाजी करीत मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी जिल्हाधिका-यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. सरकार आणि मनुवादी धोरणा राबविणा-यांवर चौफेर टिका करीत सतीश पवार म्हणाले, दोन्ही वकील मनोविकृत आहे. यापूर्वी सर्वोच्च पदावर (पान २ वर)

## 'युनिव्हर्सल किडनी' बनविण्यात शास्त्रज्ञांना यश

**बीजिंग /वृत्तसंस्था-** वैद्यकीय आणि अवयव प्रत्यारोपण क्षेत्रात एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. कॅनडा आणि चीनमधील शास्त्रज्ञांच्या एका चमूने एक अशी युनिव्हर्सल किडनी तयार केली आहे, जी सैद्धांतिकदृष्ट्या कोणत्याही रक्तगटाच्या रु ग्णाला यशस्वीरित्या प्रत्यारोपित करता येउ शकते. यामुळे किडनी प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षा यादीत असलेल्या लाखो रु ग्णांसाठी एक मोठी आणि जीवनरक्षक आशा निर्माण झाली आहे.सध्या रु ग्णाच्या रक्तगटाशी जुळणारी किडनी मिळणे आवश्यक असते, ज्यामुळे ओ रक्तगटाच्या रु ग्णांना सर्वाधिक काळ प्रतीक्षा करावी लागते. अमेरिकेमध्ये दररोज सरासरी ११ लोक किडनी न मिळाल्याने मृत्यूमुखी पडतात आणि यातील बहुतांश रु ग्ण ओ रक्तगटासाठी प्रतीक्षा करत असतात.युनिव्हर्सल किडनी तयार करण्याच्या या प्रक्रियेत, शास्त्रज्ञांनी ए रक्तगटाची किडनी घेउन तिचे ओ रक्तगटाच्या किडनीमध्ये रूपांतर केले. यासाठी त्यांनी काही विशेष एन्झाईमचा वापर केला. या एन्झाईमचे कार्य शास्त्रज्ञांनी मालिक्युलर कात्री प्रमाणे असल्याचे सांगितले आहे.हे जे एन्झाईम आहेत ते रक्तगटाची ओळख दर्शवणारे साखरेचे रेणू काढून टाकतात. युनिव्हर्सल किडनी तयार झाल्यावर, रक्तगट ओ प्रमाणे ती एबीओ अँटिजेन-मुक्त होते. शास्त्रज्ञांच्या मते, हे एखाद्या गाडीचा लाल रंग काढून आतला न्यूट्रल प्राइमर उघड करण्यासारखे आहे. एकदा हे झाल्यावर, रोगप्रतिकारशक्तीला तो अवयव परका वाटत नाही. मात्र, तीन दिवसांनंतर किडनीवर पुन्हा ए रक्तगटाचे काही अंश दिसू लागले, ज्यामुळे शरीराच्या रोगप्रतिकारशक्तीने प्रतिक्रिया दिली. परंतु ही प्रतिक्रिया सामान्य प्रत्यारोपणात होणा-या प्रतिक्रियेपेक्षा खूपच कमी आणि सौम्य होती. शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे की, हे संशोधन मोठे असले तरी, जिवंत व्यक्तींवर चाचण्या सुरू करण्यापूर्वी अजूनही काही आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे. हे महत्त्वपूर्ण संशोधन नेचर बायोमेडिकल इंजिनिअरिंग या प्रतिष्ठित जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.



# 208 नक्षल्यांचे छत्तीसगडमध्ये आत्मसर्पण




**गडचिरोली /प्रतिनिधी :** वरिष्ठ नक्षलवादी नेता भूपती उर्फ सोनूने १५ ऑक्टोबरला आपल्या ६० सहका-यांसह गडचिरोली येथे आत्मसमर्पण केले होते. त्याच गटातील केंद्रीय समिती सदस्य रु पेश याच्यासह आणखी तब्बल २०८ नक्षलवाद्यांनी १५३ अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसह छत्तीसगड मधील जगदलपूर येथे मुख्यमंत्री विष्णू देव साय यांच्या उपस्थितीत शरणागती पत्करल्याने नक्षल संघटनेला दुसरा सर्वात मोठा धक्का बसला आहे. जगदलपूर येथील पोलीस परेड ग्राउंडवर पुना मरगेम (नवी पहाट, नवा रस्ता) या नावाने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री विष्णू देव साय आणि उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री विजय शर्मा यांच्या उपस्थितीत हे सर्वजण समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले. यावेळी भारतीय संविधानाची प्रत आणि गुलाबपुष्प देउन त्यांचे स्वागत करण्यात आले. आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये केवळ संख्येचेच नव्हे, तर चळवळीतील महत्त्वाच्या पदांवरील नेत्यांची संख्या मोठी असल्याने बस्तर विभाग पूर्णपणे नक्षलमुक्त झाल्याचा दावा केला जात आहे.

आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये केंद्रीय समिती सदस्य रु पेश ( ४५, तेलंगणा) याच्यासह दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीचे चार प्रमुख सदस्य भास्कर उर्फ राजमन मंडावी, माड डिव्हिजनची प्रमुख रनिता, राजू सलाम आणि धन्नू वेत्ती उर्फ संतू यांचा समावेश आहे. याशिवाय विभागीय समितीचे २१ सदस्य, एरिया कमिटीचे ६१ सदस्य आणि ९८ सदस्यांनी एकाच वेळी हिंसेचा मार्ग सोडला आहे. भूपतीचा समर्थक आणि गेल्या तीन दशकांपासून चळवळीत सक्रिय असलेल्या आणि रणनीतीकार म्हणून ओळखल्या जाणा-या रु पेशने आत्मसमर्पण करण्यापूर्वी एक व्हिडिओ संदेश जारी करून आपल्या सहका-यांना बदललेली परिस्थिती आणि आत्मसमर्पणामागील कारणे समजून घेण्याचे आवाहन केले होते. गडचिरोलीतही दोन दिवसांपूर्वी पॉलिट ब्यूरो सदस्य मल्लोझुला वेणुगोपाल राव उर्फ भूपतीने ६० जणांसह आत्मसमर्पण केले होते. तत्पूर्वी अबुजमाड आणि गडचिरोलीच्या सीमा भागात भूपती, रु पेश याच्यासह काही महत्त्वाच्या नेत्यांची बैठक झाली होती. यात आत्मसर्पणासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर बैठकीत ठरल्याप्रमाणे भूपती काही सहका-यांसह गडचिरोली पोलिसांकडे शरण आला तर रु पेशला छातीसगडमध्ये आत्मसमर्पण करण्यास सांगितले होते. याबैठकीत मतभेद देखील झाले होते. त्यामुळे काही नक्षल्यांनी आत्मसमर्पणास नकार देत जंगलाची वाट धरली. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार येता काही दिवसात आणखी नक्षलवादी आत्मसमर्पण करण्याच्या तयारीत आहे.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# वलगावजवळ निलगाय अचानक समोर आल्याने दुचाकीस्वार ठार

## दोन स्वतंत्र अपघातांत दोन मृत, दोघे जखमी

**अमरावती/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर आणि वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवारी दोन वेगवेगळ्या अपघातांत दोन जणांचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले आहेत. जखमींवर उपचार सुरू असून, दोन्ही घटनांबाबत पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली घटना नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर घडली. नाशिक जिल्ह्यातील चिंचोली (ता. सिन्नर) येथील अनिल शिवराम उगले (४५), रावसाहेब जाधव आणि माधव उगले हे तिघे कार (क्र. श्प-१५/प्ळ-१७१६) ने प्रयागराजकडे जात होते. दुपारी १६ ऑक्टोबर रोजी कारचा टायर अचानक फुटल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ती थेट डिव्हायडरवर जाऊन आदळली. या भीषण धडकेत माधव उगले यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला, तर अनिल उगले आणि रावसाहेब जाधव हे दोघे जखमी झाले.

या प्रकरणी अनिल उगले यांच्या तक्रारीवरून चालक अंजिक्य सोमनाथ बांगर (२७, पिंपळगाव निपाणी, ता. निफाड, जि. नाशिक) याच्याविरुद्ध नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, दुसरी घटना वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पुसदा पेट्रोलपंपाजवळ दुपारी दुचाकीस्वाराच्या समोर अचानक निलगाय आल्याने अपघात झाला. या घटनेत दुचाकीस्वार अब्दुल समीर अब्दुल जमील (३३, मौलाना आझाद कॉलनी, अमरावती) गंभीर जखमी झाला. नागरिकांच्या मदतीने त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या घटनेबाबत वलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. दोन्ही अपघातांमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# ४.२७ किलो गांजासह तस्कर जेरबंद

## ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त

### चांदूर बाजार पोलिसांची मोठी कारवाई

अमरावती : जिल्ह्यात अमली पदार्थांच्या अवैध व्यापारावर आळा घालण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या मोहिमेत चांदूर बाजार पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. ग्रामीण गुन्हे शाखा आणि चांदूर बाजार पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ४.२७१ किलो गांजा जप्त केला असून, अन्वर हुसेन अहमद हुसेन (३८, ताज नगर, चांदूर बाजार) या तस्कराला अटक करण्यात आली आहे. जप्त केलेल्या गांजाची किंमत तब्बल ८२ हजार ७५० रुपये इतकी आहे.

पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या सूचनेनुसार ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक अमली पदार्थांच्या तस्करीवर लक्ष ठेवून गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. या माहितीनुसार, चांदूर बाजार रेल्वे स्टेशन ते परसोडा फाटा या मार्गावर असलेल्या तिरुपती मंगल कार्यालयासमोर एक व्यक्ती गांजा विक्रीसाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. त्यावर पोलिसांनी परिसरात सापळा रचून संशयित अन्वर हुसेन याला रंगेहात पकडले. त्याच्याकडील बॅगची झडती घेतली असता ४.२७१ किलो वजनाचा गांजा आढळला. आरोपीकडून ताबडतोब माल जप्त करण्यात आला असून, त्याच्याविरोधात चांदूर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, पोलिस निरीक्षक किरण वानखेडे आणि स्टेशन ऑफिसर अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी उल्हास राठोड, मुलचंद भांबुरकर, अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, नरेंद्र मुलतकर, संकेत चोरे आणि चालक संजय प्रधान यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## १ व १० वरिल उर्वरित

### नाशिकमधून झेपावले

आणि ट्रॅक करणे शक्य होते. सीआयटी प्रणालीमुळे मित्र की शत्रू अशी लक्ष्य ओळख त्वरित शक्य होते. एसडीआर रेडिओमुळे सुरक्षित व सॅटेलाइटद्वारे संवाद साधण्याची सुविधा आहे. डिजिटल मॅप जनरेटरमुळे परिसर आणि उंचीची अचूक माहिती मिळते. ईडब्ल्यू स्यूट प्रणाली शत्रूच्या रडारला जॅम करून फसवण्याची क्षमता देते. एसएमएफडी स्क्रीनवर मिशन डेटा, नकाशे आणि अलर्टची थेट माहिती मिळते. डेल्टा विंग डिझाइनमुळे उच्च वेग आणि चपळ उड्डाण क्षमता आहे. क्वाड्रुप्लेक्स डिजिटल फ्लाइट कंट्रोलमुळे अचूक आणि स्थिर नियंत्रण मिळवते.

यावेळी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, लढाउ विमानाची शानदार उड्डाणे झाली. गौरव, अभिमान वाटत होता. ज्यावेळी हा कार्यक्रम संपन्न होत होता, तेव्हा श्रीरामाचे भजन होत होते. श्रेया जोशी या गायिकेने गायले त्यांचे अभिनंदन. या निमित्ताने नाशिकला येण्याचा योग आला. नाशिकची भूमी ऐतिहासिक आहे. नाशिक, त्र्यंबकेश्वर ही भगवान शिवाची भूमी आहे. इथे आल्यावर दिव्य भूमीत आल्यासारखे वाटते. इथे आस्था, श्रद्धा आहे. त्याच वेळी एचएएल हे राष्ट्राच्या संरक्षणाचे प्रतीक आहे. इथे प्रात्यक्षिक बघितले तेव्हा माजी छाती गौरवाने फुलून गेली. हे आत्मनिर्भर भारताचे पाउल आहे. आजवर इतर देशांवर आपला देश अवलंबून होता. आता भारतात ६५ टक्के विमान बनत आहोत. थोड्याच दिवसात आपण १०० टक्के आत्मनिर्भर होणार आहोत असे त्यांनी म्हटले.

### हिंदू मुलींनी जिमला

तपासण्याची मागणी केली आणि सांगितले की, ज्यांच्याकडे ओळखपत्र नाहीत अशा तरु णांची देखील तपासणी झाली पाहिजे. अशा लोकांना कॉलेजमधील प्रवेशावर बंदी घालावी. यासाठी आपल्याला एक मजबूत प्रतिबंधक यंत्रणा तयार करावी लागेल. तेव्हाच अशा घटनांना आळा घालता येईल. भाजप आमदाराच्या या वक्तव्यामुळे वाद वाढण्याची शक्यता आहे आणि राजकीय गदारोळही होउ शकतो. विरोधी पक्ष यावरून भारतीय जनता पक्षाला घेरण्याचा प्रयत्न करू शकतात.

### तलाठी भरतीत महसूल

भरतीमध्ये काही जागा राखीव ठेवून, ज्यांना किमान पाच वर्षांचा अनुभव आहे, त्यांना २५ अतिरिक्त गुण देण्याचा प्रस्ताव मांडला. अधिका-यांनी या प्रस्तावावर सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच शासन निर्णय निघण्याची शक्यता आहे. बैठकीत महसूलमंत्र्यांनी महसूल सेवकांच्या इतर मागण्यांबाबतही सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. पूर्वीच त्यांच्या मानधनात वाढ करण्यात आली असून, सरकार त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवेल, असेही बावनकुळे म्हणाले. पूरस्थितीच्या काळात अनेक महसूल सेवक संपावर असल्यामुळे प्रशासनाला अडचणींचा सामना करावा लागला होता, हेही बैठकीत नमूद करण्यात आले. ऑनलाईन सेवांमुळे महसूल सेवकांचे काम काही प्रमाणात कमी झाले असले, तरी त्यांच्या अनुभवाचा उपयोग राज्य प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी केला जाणार आहे.

### त्याने बुट मारला

बसलेले हिदायतउल्ला खान यांच्यावरही हल्ला झाला होता, याचाही दाखला त्यांनी दिला. ड?. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषित, पीडित वर्गाला जगण्याचा अधिकार दिला. आजही बुरसटलेले विचार कायम आहेत. त्यातून मागासवर्गीयांवर अन्याय, अत्याचार केला जात आहेत. कितीही शिकून मोठे झाले तरी चातुर्वण्य व्यवस्थेनुसार तुम्ही लायकी ही आमच्या पायातील पायताणात आहे, असे आम्ही समजतो हे मनुवाद्यांना दाखवून द्यायचे आहे. परंतु, यापुढे आम्ही शांत बसणार नाही. आमच्यावरील अन्याय, अत्याचार खपवून न घेता प्रतिकार करण्याची ताकद आमच्यात आहे, हेदेखील सतीश पवार यांनी ठणकावून सांगितले.

लक्षवेधी प्रतीकात्मक देखावा-गळ्यात मडके, कंबरेला झाडू बांधलेल्या पाच व्यक्तींचा प्रतीकात्मक देखावा सादर करण्यात आला. या जिवंत देखाव्यातून जसा अत्याचार पूर्वी व्हायचा, तीच मागील परिस्थिती आणण्याचा प्रयत्न सध्या मनुवादी विचारसरणीतून आणल्या जाणार असल्याचे वास्तव दर्शविण्यात आले. तसेच या मोर्चात दंडाला काळ्या फिती बांधून सरन्यायाधीशांवरील हल्ल्याच्या घटनेचा निषेध नोंदविण्यात आला.

तर पोलिस ठाण्याला घेराव- आम्ही जातीवाद मानत नाही, सामनता मानतो. मिश्रा आणि किशोर या वकिलांविरुद्ध बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात तीन दिवसांत देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा; नाहीतर हजारोंच्या संख्येने पोलिस ठाण्याला वेढा घालू, असा इशाराही सतीश पवार यांनी दिला.

### एमडी ड्रग्सचा डिस्ट्रीब्यूटर नागपूरमधून

त्याच्याकडून विचारपूस करत आहे. अजून पर्यंत कोणतीही ठोस माहिती त्याच्या कडून पोलिसांच्या हाती लागली नाही.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया,उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ ,श्याम घुगे ,सहायक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात एपीआय मनीष वाकोडे, पीएसआय गजानन सोनोने, अजय मिश्रा, सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लकडे ,सचिन बहाडे, सुधीर गुडधे, नाझीम शेख ,नईम बेग, विकास गुडधे, चेतन कराडे, सुरच चव्हाण, रंजीत गावंडे, सागर ठाकरे, योगेश पवार, राजीक रायलीवाले आदिनी केली.

### शेतकऱ्यांच्या मदतीसाठी

या सर्व परिस्थितीचा गांभीर्यपूर्वक विचार करून शासनाने शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीपोटी संपूर्ण चांदूर बाजार तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५०००० रू . ची मदत दिवाळीपुर्वी देण्यात यावी . यासाठी सर्व शेतकरी बांधवांसह आज दि . १७ ऑक्टोबर २०२५ रोजी ' शिदोरी आंदोलन ' तहसिल कार्यालयासमोर केले . सदर मागणी पुर्ण न झाल्यास यापेक्षाही उग्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल व यास पुर्णतः शासन जबाबदार राहील याची दखल घ्यावी असे निवेदनातून लेखी कळविले आहे .

सदर आंदोलन काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलू देशमुख यांच्या नेतृत्वात झाले असून या आंदोलनात तालुका अध्यक्ष किशोर देशमुख,खविस अध्यक्ष डॉ.प्रताप किटूकले,बाबूभाई इनामदार,अरविंद लंगोटे,छोटू देशमुख, दादाराव पाथरे, शरद पोहकार ,भाई देशमुख, किशोर कीटूकले, वासुदेव देशमुख,प्रमोद वीचे, राजाभाऊ खडके, अवधूत मातकर, रवींद्र भुयार, श्रीकृष्ण वानखडे, प्रकाश जंवजाळ, मुजफ्फर अहमद ,राजाभाऊ बंड, नंदू भोयर, सलीम शहा ,धनंजय पळसपगार ,विनोद खवले, मंगेश देशमुख ,सचिन हिवराळे, गोपाल रडके, संजय पारवेकर, भोला मदने ,विजय राऊत, पंकज नेहारे ,रवींद्र वैराळे ,योगेश ईशळ, उमेश तायडे, मुरलीधर ठाकरे, निलेश डांगे ,निखिल काटोलकर ,अभिषेक मुंडे ,अंकुश धाकडे, सुरेश अकोलकर, गौरव वैद्य, मनीष बँड ,अब्दुल कलाम ,धनंजय बोरखडे ,मनीष डाखोरे, निलेश ढोक, बंडू खैरकार, अब्दुल हफिज, नंदू देशमुख, विनोद इंगळे, उमेश गवई,नंदू पुनकर पल्लवी वाटाणे, वंदना गवई अलका बोंडे ,मनीषा इंगळे, दीपाताई लेंडे आदी उपस्थित होते.

**सरकारने हवालदिल शेतकऱ्यांची थट्टा करू नये !-** सध्या शेतकरी मरणासन्न अवस्थेमध्ये जगत आहे . आज शेतकऱ्याला मदत करणे गरजेचे आहे . शेतकरी स्वतः मदतीच्या प्रतिक्षेमध्ये असताना त्यांच्याच खिशावर दरोडा टाकून त्यालाच दिल्याचे नाटक चालू आहे . हा निर्णय म्हणजे शेतकऱ्याच्या घरी दिवसा डाका टाकल्यासारखे आहे . हवालदिल शेतकऱ्यांना शासनाने केलेली ह्या तुटपुंजी मदतीमुळे शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला असून यावर्षीची शेतकऱ्यांसाठी काळी दिवाळी असल्याने या सरकारच्या अशा आडमुठे धोरणामुळे सरकारला शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावेच लागेल .

**-बबलु देशमुख, जिल्हा काँग्रेस कमिटी जिल्हाअध्यक्ष**

### दर्यापूर तालुका काँग्रेसचे शेतकऱ्यांच्या

शिरभाते यांच्या उपस्थितीत आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला शहर काँग्रेस, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस , अल्पसंख्यांक काँग्रेस व सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

या आंदोलनातून काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी 'दिवाळी काळी' पाळण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. यावेळी ईश्वर बुंदिले, दत्ता कुंभारकर, असलम मंसूरी, शिवाजी देशमुख, विनोद वानखडे, दिनेश सिंह चव्हाण, मनोज बोरेकर, असलम मंसूरी, जम्मू भाई पठाण, नदीम भाई, वसिम भाई, सागर काळे, कालू भाई, बबलू कुरेशी, दादाराव इंगळे,अ?ड. निशिकांत पाखरे, असलम भाई घाणी वाले, संतोष शिंदे, आरिफ भाई, शिवा इंगळे, मंगल बुंदेले, रामेश्वर तांडेकर, सोनू शहा, सुभाष गावंडे, नितीन गावंडे, निलकंठ साखरे, सचिन धुर्वे,शरद ठाकरे, अनिल बागडे, वैभव बागडे, रामेश्वर चव्हाण,महेश कुरळकर, प्रतिक बुंदेले, अमोल देशमुख, प्रभाकर तराळ, शशांक धर्माळे, इंद्रजित देशमुख,देविदास काळे,बबनराव देशमुख, सुदेश सिंह ठाकुर, मधु घाडगे, उद्धव नळकांडे, राजू देशमुख, राजेंद्र नागपुरे, दिपक मालखेडे, हर्षवर्धन शिंदे आदी पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

### भूकंपाने हादरले शिवणगांव

पसरली होती. अनेक जण घराबाहेर धावत येऊन मोकळ्या जागेवर उभे राहिले होते. दोन वर्षांपूर्वी देखील जमिनीला हादरा बसल्याची घटना घडली होती, असे गावकऱ्यांनी सांगितले. तसेच जून महिन्यात चार तारखेला रात्री नऊ वाजता जिल्ह्यात मध्य प्रदेशच्या सीमेवर रिश्टर स्केलवर ३.८ तीव्रतेचा भूकंप झाला होता, ही माहिती राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने तसेच नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्राने दिली होती. या भूकंपामुळे कोणतेही नुकसान झाले नव्हते. मध्य प्रदेशातील खंडवा आणि बऱ्हाणपूर जिल्ह्यातही भूकंपाचे धक्के जाणवले होते. भूकंपाचा केंद्रबिंदू हा जमिनीपासून दहा किलोमीटर खाली होता. यानंतर शुक्रवारी पुन्हा शिवणगाव फत्तेपूर मध्ये भूकंपाचे सौम्य धक्के लागल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

### सिंभोरा नदीत बुडालेल्या मुलाचा

मृतदेह पाण्याबाहेर काढला. या घटनेमुळे मनोटे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आपत्ती व्यवस्थापन पथकाचे गजानन वाडेकर, सचिन धरमकर,विशाल निमकर, सुमित बांबल, अर्जुन सुंदराडे, गणेश जाधव , प्रियांशू तायवाडे,विवेक सावरकर यांनी सहकार्य केले.

### सक्करसाथ, सराफा परिसरात

प्लास्टिक पिशव्या, कप, प्लेट्स, थर्माकोल वस्तू, प्लास्टिक कंटेनर आणि डिस्पोजेबल सामग्रीचा मोठा साठा आढळून आला. सर्व जप्त सामग्रीची नोंद घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ही मोहीम अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या उपस्थितीत अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रभावीपणे पार पडली.

अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी या वेळी सांगितले की, मनपा प्रशासनाकडून प्लास्टिक बंदीबाबत सातत्याने जनजागृती केली जात असतानाही काही व्यापारी नियमांचे उल्लंघन करीत आहेत. अशा व्यापाऱ्यांवर पुढेही मनपा कठोर कारवाई करणार आहे. हे अभियान केवळ नियमभंग थांबविण्यापुरते नसून पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, अमरावती शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. प्लास्टिक बंदी ही फक्त कायदेशीर बाब नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी अत्यावश्यक पाऊल आहे. मनपाच्या प्रयत्नांबरोबर नागरिकांचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. सर्वांनीच प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर थांबवून कापडी व पेपरच्या पिशव्यांचा वापर करावा.

मनपाच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, पर्यावरण संरक्षणासाठी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर तात्काळ थांबवावा. कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा आणि स्वच्छ, हरित अमरावतीसाठी प्रशासनास सक्रिय सहकार्य करावे.

या विशेष मोहिमेत अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ्य निरीक्षक सय्यद हक, तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व मनपा कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिकेने स्पष्ट इशारा दिला आहे की, प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा, विक्री किंवा वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांवर आणि नागरिकांवर पुढेही कठोर कारवाई करण्यात येईल.

### धावत्या एसटी बसमधून

काढले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.परतवाडा आणि अमरावती हे दोन्ही आगार जिल्ह्यात मोठे आहे. स्वतंत्र दुरुस्तीसाठी यंत्रणा याठिकाणी आहे. त्यामुळे वेळेपूर्वीच कालबाह्य झालेल्या बसगाड्या या मार्गावरून पाठविल्या जातात. कधी चाक निघून पडू लागतात, तर धावत्या बसमधून धूर निघतो. नादुरुस्त बस मार्गावरून धावून प्रवाशांच्या जिवाशी आगर खेळत असल्याचा संतापजनक प्रकार असल्याने प्रवासी संतापले आहे.

**अचानक बंद पडली बस,ढकलून केली सुरू-** महामंडळाच्या बसगाड्या भंगार असताना बुधवारी अचानक बंद पडलेली बस प्रवाशांनी ढकलून सुरू केली. पुढे जाताच या बस मध्ये पुन्हा आग लागली आणि धूर निघाला. प्रवाशांना मागून आलेल्या ईव्ही बसमध्ये पुढील प्रवास करावा लागला.

### संत अच्युत महाराज हार्ट

हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर, सचिव सागर पासेबंद, विश्वस्त मनोज वाडेकर तसेच गुणवंत डहाणे, राजेंद्र दिगंबर, धनंजय मेटे, दत्ता खंदारे यांनी हा पुरस्कार स्विकारला. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने आरोग्य विभागातील अधिकारी व पुरस्कार प्राप्त अन्य संस्थेचे पदाधिकारी आणि व्यक्ती हजर होते. नागरिकांची देखील उपस्थिती होती. हा सन्मान संस्थेचे सर्व कार्यकर्ते, डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक ठरला आहे.

राज्याच्या आरोग्य विभागाच्या राज्य आरोग्य हमी सोसायटी मार्फत राबविण्यात येत असलेल्या एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये श्री संत अच्युत महाराज हॉर्ट हॉस्पिटल अंगीकृत आहे. सदर योजनेतून लाभार्थ्यांवर सन २०२४-२०२५ मध्ये झालेल्या शस्त्रक्रिया/उपचार विचारात घेऊन खाजगी अंगीकृत रुग्णालये या वर्गवारीत हार्ट हॉस्पिटलची निवड उपरोक्त पुरस्कारासाठी करण्यात आली होती. हॉस्पिटलला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संत अच्युत महाराज परिवारामध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

### मुख्यमंत्री सहायता निधीत बाजार

या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीत मदत स्वरूपात रक्कम जमा केली जात आहे.अशात अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीने देखील मदतीसाठी पुढाकार घेतला आहे.बाजार समितीकडून साधारण पाच लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्यात आला आहे. बाजार समितीने दिलेली ही आर्थिक मदत शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी ठरणार आहे. यावेळी खासदार बळवंत वानखेडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश मोरे, उपसभापती भैय्यासाहेब निचळ, प्रताप भुयार, नाना नागमोते, माजी महापौर विलास इंगोले, हरिभाऊ मोहोड , किशोर चांगोले, आशुतोष देशमुख, सतीश गेटे, प्रकाश काळबांडे, प्रवीण अळसपुरे, श्रीकांत बोंडे, मिलिंद तायडे ,राम खरबडे ,रुपेश पाटील, प्रमोद इंगोले, बंडू वानखडे तसेच सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

कर्मचाऱ्यांनी दिला एक दिवसाचे वेतन-

शेतकऱ्यांच्या संकट काळात बाजार समितीने दाखवलेली ही सामाजिक जबाबदारी कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. तसेच कर्मचाऱ्यांनी देखील आपल्या एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये दिले.

### खोलापुरी गेट परिसरात गळफास

शेजारी लोकांच्या मदतीने त्याला खाली उतरून जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तसेच हनुमान नगर परिसरात राहणाऱ्या आकाश राजेंद्र मोकसुके (वय २८) याने आपल्या राहत्या घरी आत्महत्या केली. आकाश गेल्या दीड महिन्यापासून कोणत्यातरी टेन्शनमध्ये होता. तो नवरात्र मध्ये त्याचे मोठे भाऊ अक्षय बेले याच्याकडे मध्यप्रदेश येथील देडतलाई गावांत गेला होता. सोमवारी तो येथून घरी परत आला होता. त्यानंतर तो कोणाशीही जास्त बोलत नव्हता. अशात त्याने गुरुवारी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याचा भाऊ सुरज मोकसूके घरी आला. तेव्हा दाराची कडी आत मधून बंद होती. त्याने आवाज दिला तरी कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, म्हणून त्याने दरवाजा वाजवला तर कडी उघडली. यावेळी किचनमध्ये आकाश गळफास घेऊन लटकलेला दिसला. घटनेची माहिती सुरज मोकसुके ने पोलिसांना दिली. पोलिसांनी तेथे पोहोचवून पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला. आकस्मिक मृत्यूचा गुन्हा पोलिसांनी दाखल केला.

### भाऊसाहेबांच्या जन्मगावी पापळ

अंतर्गत श्री शिवाजी शिक्षण संस्थेस पापळ तालुका नांदगाव खंडेश्वर येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्याची विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात आली आहे.शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जन्म गावी म्हणजे पापळ येथे कृषी महाविद्यालय सुरू व्हावे यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून प्रयत्न करण्यात येत होते. अखेर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या नेतृत्वातील कार्यकारिणीला हे यश मिळाले. शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये काही अटी व शर्तीवर ही मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सत्र २०२५-२०२६ पासून ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्याअटीवर हे कृषी महाविद्यालय कायमस्वरूपी, विनाअनुदानित तत्त्वावर सुरू करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

**पेढे भरून व्यक्त केला आनंद-** दरम्यान श्री शिवाजी शिक्षण संस्थेला पापळ येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्याची परवानगी मिळाल्याने श्री शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये आज आनंद व्यक्त करण्यात आला. संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य ,सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकमेकांचे अभिनंदन करत पेढे भरून आनंद साजरा केला. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयात आज आनंद उत्सव साजरा करण्यात आला यावेळी झालेल्या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष भैय्यासाहेब पाटील पुसदेकर , कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, सचिव प्राचार्य वि.गो. ठाकरे, संस्थेच्या अधीक्षक भावना गावंडे, व सर्व कर्मचारी उपस्थित होते. श्री शिवाजी शिक्षण संस्थेला मिळालेल्या या यशाबद्दल सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - १९११/२०२५
श्री दिपक अधिक तिन विरुध्द निरंक
पुढील तारीख २३.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1) **Deepak Babulal Sathekar,** Age 61 yrs., Occu.- Labour
R/o. S/o Babulal Sathekar, Telangi Pura, Haridas Peth, New Town, Badnera, Tq. & Dist. Amravati.
2) **Prakash Babulaljii Sathekar,** Age 54 yrs., Occu.- Labour
R/o. S/o Babulal Sathekar, Lane No.5, Behind Rathi Hospital, Gadge Nagar, Shivaji Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
3) **Lila Babulal Katialkar,** Age 65 yrs., Occu.- Household
R/o. W/o. Babulal Katialkar, Yavatmal Road, Maduban Colony, Navi Vasti, Badnera, Tq. & Dist. Amravati
4) **Meena Shyam Gondelwar,** Age 43 yrs., Occu.- Household
R/o. Shivaji Ward, Deurwada Road, Arvi Dist. Wardha

-- विरुध्द -

गैरअर्जदार : - निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत बाबुलाल नरसन्ना साठेकर हे दि.०८/०४/२००७ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे व मयत पार्वती बाबुलाल साठेकर ह्या २०.१०.२०१८ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार दिपक अधिक तीन विरुध्द निरंक यांनी** वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री दिपक अधिक तीन विरुध्द निरंक यांनी** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर नोटीस

प्रो.नं.४०१४/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१४/१०/२०२५

**वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.३९०/२०२५ ने.ता.०१.११.२०२५

अर्जदार -
१. **श्रीमती वनमाला ओमप्रकाश शेवतकर,** वय ५६ वर्षे, धंदा - नोकरी
२. **चैतन्य ओमप्रकाश शेवतकर,** वय ३५ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
३. **शुभम ओमप्रकाश शेवतकर,** वय ३१ वर्षे, धंदा - खाजगी नोकरी
सर्व रा.चंडिकापुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **ओमप्रकाश उत्तमराव शेवतकर** हे दिनांक **२०.०३.२०२५ रोजी मरण पावले आहेत.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत ओमप्रकाश उत्तमराव शेवतकर** यांचे नावे मौजा चंडिकापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.१२५,नझुल शिट क्र.२, प्लॉट क्र.१२५, ग्रा.पं.मा.क्र.५७३ यात मृतकाचे क्षेत्र.६५.२४ चौ.मी.
मौजा चंडिकापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.१३२,नझुल शिट क्र.२, प्लॉट क्र.१३२, ग्रा.पं.मा.क्र.५६५ यात मृतकाचे क्षेत्र.९८.२० चौ.मी.
मौजा चंडिकापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.१३६,नझुल शिट क्र.२, प्लॉट क्र.१३६, ग्रा.पं.मा.क्र.५९८/१, यात मृतकाचे क्षेत्र.४७.४७ चौ.मी.
मौजा चंडिकापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.१३८,नझुल शिट क्र.२, प्लॉट क्र.१३८, ग्रा.पं.मा.क्र.५९८ यात मृतकाचे क्षेत्र.१३०.१० चौ.मी.
मौजा चंडिकापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.१४२,नझुल शिट क्र.२, प्लॉट क्र.१४२, ग्रा.पं.मा.क्र.५९९ यात मृतकाचे क्षेत्र.८९.०३ चौ.मी.
मौजा चंडिकापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.३८६,नझुल शिट क्र.४, प्लॉट क्र.३८६, ग्रा.पं.मा.क्र.५७३ यात मृतकाचे सामाईक क्षेत्र.७७.५० चौ.मी.
मौजा चंडिकापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.३९५,नझुल शिट क्र.४, प्लॉट क्र.३९५, ग्रा.पं.मा.क्र.५७३ यात मृतकाचे क्षेत्र.७३.९० चौ.मी.येणे वर्णनाची ग्रामीण भागातील मालमत्ता असून सदर मालमत्तेची अंदाजे किंमत २,००,०००/- इतकी आहे.

आज दि. **१४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

## नगर परिषद कार्यालय चांदुर रेल्वे, जि.अमरावती

**ई - निविदा सुचना**

नगर परिषद चांदूर रेल्वे बांधकाम विभाग व्दारा निविदा सुचना क्र.१३६९/२०२५, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे योजना अंतर्गत ऑनलाईन व्दि-लिफाफा पध्दतीने तसेच बी-१ पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे.सदर निविदेच्या अटी व शर्ती आणि सविस्तर निविदा सुचना सदर प्रपत्र **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर पहावयास उपलब्ध राहतील.

**ई-निविदा प्रक्रियेचा तपशील :**

| | |
|---|---|
| ई-निविदा ONLINE निविदा विक्री | दि.१६/१०/२०२५ पासुन ते दि.२४/१०/२५ पर्यत सायं. ०५.०० वाजेपर्यत |
| ई-निविदा ONLINE निविदा स्विकृती | दि.१६/१०/२०२५ पासुन ते दि.२४/१०/२५ पर्यत सायं. ०५.०० वाजेपर्यत |
| ई-निविदा ONLINE निविदा उघडणे | दि.२४/१०/२०२५ सायं. ०५.०० वाजता किंवा त्यानंतर |

सही/-
**सुप्रिया टवलारे** (म.श.प्र.से.)
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद चांदुर रेल्वे**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# वनरक्षकांना मुख्यालयाची ॲलर्जी

## तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही शून्य, वरिष्ठांची पाठराखण

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

**वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) कारंजा (लाड) यांचे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांतर्गत प्राप्त माहितीनुसार एकूण १ २ वनरक्षक सेवारत आहे. कारंजा मुख्यालय वगळता अन्य मुख्यालयी वनरक्षक वास्तव्य करीत नसल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले.**




'अभिजित वायकोस,उपवनसंरक्षक, वाशीम यांना भ्रमणध्वनीने संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु कॉल उचलला नाही. त्यामुळे व्हाट्सअपच्या मेसेजद्वारे संपर्क साधला असता त्यांनी 'आज कारवाई करणार असल्याचे नमुद केले आहे.'

प्राप्त माहितीनुसार, वनपरिक्षेत्र (प्रा.) कारंजा (लाड) च्या कार्यक्षेत्रांतर्गत वनरक्षकाचे मुख्यालय ठराविक गावी असूनही ते सतत मुख्यालयाबाहेर कारंजा (लाड) याठिकाणी वास्तव्यास असल्याचे आढळून आले आहे. वनक्षेत्रातील सुरक्षेसाठी व वनसंवर्धनासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सेवानियुक्ती मुख्यालयी उपस्थित राहणे अत्यावश्यक असते. मात्र, मुख्यालयी वास्तव्य न करण्यामुळे, वनरक्षकाच्या अनुपस्थितीमुळे स्थानिकांना वेळेवर मदत मिळत नाही आणि वनविभागाच्या कामकाजावरही परिणाम होत आहे, अशी स्थानिकांची तक्रार आहे. 'वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोड, शिकारीसारख्या घटना रोखण्यासाठी वनरक्षकाचे मुख्यालयी वास्तव्य अनिवार्य आहे. मात्र, संबंधित कर्मचारी मुख्यालयाबाहेर वास्तव्य करीत असल्याने ही जबाबदारी पार पडण्यात अडथळे निर्माण होत आहेत.'

वन विभागातील सर्वात महत्त्वाचे व प्रत्यक्षात कार्य करणारे पद म्हणजेच वनरक्षकाचे पद आहे. वनरक्षकाचे प्रामुख्याने कार्य, कर्तव्यभाग म्हणजे त्यांच्या पदनियुक्ती वनपरिक्षेत्रातील कोणत्याही धोक्यांपासून, हानीपासून आणि बेकायदेशीर कृत्यांपासून जंगलांचे संरक्षण करणे .त्याच्या नियंत्रणाखाली वनोपजांचे आणि वन्यजीवांचे संरक्षण करणे. अवैध वृक्षतोडी प्रतिबंधहेतू व वन्यजीव तसेच वन्यपशु हत्या रोखण्यासाठी गस्त घालणे. वन सीमांची दुरुस्ती किंवा अभिजित वायकोस, उपवनसंरक्षक वाशीम यांच्याकडे दि. २७ मे रोजी करण्यात आलेल्या तक्रारीमध्ये 'वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) कारंजा (लाड) या कार्यालया अंतर्गत वनपरिक्षेत्रात कार्यरत वनरक्षक सेवा, पदस्थापनेच्या अनुषंगाने कार्यरत ठिकाणी (मुख्यालयी) वास्तव्य करीत नसल्यामुळे सखोल चौकशी करून संबंधित कर्मचारी विरुद्ध नियमानुसार, शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करणे बाबत अज.' या विषयानुसार संबंधित कर्मचाऱ्यांची मुख्यालयी वास्तव्य अनुपस्थितीची चौकशी करून आवश्यक ती शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीची दखल घेत दि. १० जून रोजी शरयू रुद्रावार, सहाय्यक वनसंरक्षक, वाशीम यांना सखोल चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. वारंवार पाठपुरावा केल्यानंतर प्राथमिक चौकशी सुरू केल्याचा देखावा निर्माण केला. तक्रारीच्या अनुषंगाने अद्यापसुद्धा वनरक्षकांच्या नियुक्ती मुख्यालयाच्या ठिकाणी प्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारची चौकशी करण्यात आली नाही.

तक्रार सादर करून १४० दिवसाचा कालावधी उलटून गेला तरी प्रत्यक्षपणे कार्यवाही करण्यात न आल्यामुळे अभिजीत वायकोस, उपवनसंरक्षक वाशिम, तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही न करता कर्मचाऱ्यांची पाठराखण करण्याच्या वृत्तीची तक्रार वरिष्ठ अधिकारी मानकर साहेब मुख्य वनसंरक्षक यवतमाळ यांच्याकडे सादर करण्यात आली आहे.

बातमी प्रकाशित होईपर्यंत कोणत्याच प्रकारची प्रत्यक्षात कार्यवाही झाली नाही. वनरक्षक या पदांनुसार कार्य करणारे कर्मचारी सेवाकार्य योग्य रीतीने व योग्य ठिकाणी करतात किंवा नाही याकडे लक्ष देणे वनपरिक्षेत्र अधिकारी, कारंजा (लाड ) व उपवनसंरक्षक अधिकारी, वाशिम यांच्या कर्तव्याचा भाग आहे. परंतु या दोन्ही अधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याचा विसर पडला आहे. तक्रार प्रकरणी मुख्य वनसंरक्षक हे तक्रारीला कितपत न्याय देतात हे पाहणे उचित ठरेल.

# मालेगाव शहरात दीपोत्सवाची लगबग!



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

**■ बाजारपेठेत सजल्या मातीच्या पणत्यांच्या दुकाने ■ नागरिकांचा खरेदीसाठी उत्साह**

भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा व आनंदाचा सण म्हणून ओळखला जाणारा दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यानिमित्ताने मालेगाव शहरातील मुख्य बाजारपेठा, गल्लीबोळ, तसेच नगर सणाच्या तयारीने उजळून निघाल्या आहेत. दिपोत्सव साजरा करण्यासाठी शहरभर ठिकठिकाणी मातीच्या पणत्यांची, सजावटीच्या वस्तूंची आणि प्रकाशमालांची दुकाने थाटली असून ग्राहकांची खरेदीची लगबग सुरू आहे.

सदर बाजारपेठेत पारंपरिक मातीच्या पणत्यांसोबतच रंगीत, डिझाइनर, प्रसादाचे दुकाने , नक्षीकाम केलेल्या तसेच इलेक्ट्रिक पणत्यांनाही मोठी मागणी दिसून येत आहे. लहान-मोठ्या विक्रेत्यांनी आपआपली दुकाने आकर्षक सजावटीसह उभारली आहेत. महिलांनी आणि तरुणाईने दिवाळी खरेदीसाठी मोठ्या संख्येने बाजारात गर्दी केली असून सणाच्या आनंदाची चाहूल लागली आहे. दरम्यान, व्यापाऱ्यांच्या मते यंदा महागाईत काहीशी वाढ झाली असली तरी मातीच्या पणत्यांचे दर गतवर्षीच्या तुलनेत स्थिर आहेत. ग्राहकांचा कल मात्र पारंपरिक पणत्यांपेक्षा आधुनिक डिझाइनकडे झुकलेला दिसतो. दिवाळीचा उत्साह जाणवत असून बाजारपेठांमध्ये वातावरण निर्माण झाले आहे.

# वेदांत पब्लिक स्कूलमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

भारताचे माजी राष्ट्रपती, 'मिसाईल मॅन' आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वेदांत पब्लिक स्कूल, कारंजा येथे दि. १५ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. उपस्थित सर्वांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.

यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री गडेकर यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. कलाम यांचे विचार, त्यांची साधी जीवनशैली आणि देशसेवेसाठी केलेले कार्य याचे महत्त्व सांगितले. तसेच, विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श ठेवून देशासाठी कार्य करावे, असे आवाहनही केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन शाळेने अत्यंत प्रेरणादायी पद्धतीने केले होते.

# सुरक्षित दिवाळी सन साजरी करा ! अभिषेक मुंदडा

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**



दिवाळी सनाची लगबग सुरू झाली असून यानिमित्त रोषणाई केली जाते शिवाय विजेचा वापरही वाढतो त्यामुळे दिवाळी सन साजरी करताना सुरक्षा उपायांकडे अजिबात दुर्लक्ष करू नका, असे आवाहन मालेगांव चे उद्योगपती अभिषेक मुंदडा यांनी केले आहे दिवाळी सना निमित्त होणारी सजावट, रोषणाई, आतषबाजी यामुळे अपघात होऊ शकतात त्यामुळे आनंदावर विरझण पडते केवळ आर्थिकच नव्हे तर जीवितहानीसुद्धा होते. सुरक्षेची खबरदारी केल्याने त्या टाळता येऊ शकतात. फटाके उडवतानाही काळजी न घेतल्याने दुर्घटना घडतात घराची उजळवण्यासाठी मोकळ्या जागेतच दिवे लावावेत, पडदे, बिछान्यापासुन ते लांब ठेवावेत मुले आणि पाळीव प्राण्यांपासून दिवे दूर ठेवावे आणि उंचीवर तसेच पंखे, विजतारांपासून दूर ठेवावेत. उच्च दर्जाच्या दिव्यांच्या माळांचा वापर करावा. तुटलेल्या वीज तारा वापरू नयेत, जोड देताना योग्य दर्जाच्या इन्सुलेशनची टेप वापरावी, तुटलेले सॉकेट्स वापरू नयेत, घरात कुणीही नसताना सर्व विद्युत उपकरणे बंद करावीत, फटाके फोडताना ही काळजी घ्या मोकळ्या मैदानात फटाके उडवावेत वीज तारांजवळ फटाके उडवू नयेत विजेच्या उपकरणांजवळ फटाके ठेवू नयेत.

# दिपावलीपूर्वी तात्काळ शहरात स्वच्छता मोहीम राबवा

## वाशिम जिल्हा कॉंग्रेस कमेटीची मागणी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

भारतातील सर्वात मोठा उत्सव असलेल्या दिपावली निमित्त शहरात तात्काळ साफसफाई व स्वच्छतेची मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी वाशिम जिल्हा कॉंग्रेस कमिटीने नगर परिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे. जिल्हा सरचिटणीस उज्वल देशमुख यांच्या पुढाकाराने बुधवार, १५ ऑक्टोबर रोजी नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील अनेक भागांमध्ये। विशेषतः गल्ली-बोळ, बाजारपेठा आणि वस्ती भागात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिगारे साचले असून दुर्गंधीने परिसर अस्वच्छ झाला आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. अलीकडील पावसामुळे रस्त्यांवर खड्डे पडले असून त्यात पाणी साचल्याने माशा-मच्छर, जीवजंतू वाढत आहेत. काही ठिकाणी मृत प्राणी व किटकांमुळे दुर्गंधी आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे. यासह मुख्य बाजारपेठ, पाटणी चौक, रविवार बाजार, बालू चौक, काटीवेस बालाजी मंदिर परिसर, जुनी नगर परिषद परिसर, बागवानपुरा, दंडे चौक, नंदीपेठ, ध्रुवचौक, शुक्रवारपेठ, गवळीपुरा, देवपेठ, गणेशपेठ, चामुंडादेवी रोड, सौदागरपुरा आदी भागांसह शहरातील मुख्य रस्ते अकोला नाका चौक, जेल परिसर, पुसद नाका, रिसोड रोड, लाखाळा



परिसर आणि रेल्वे स्टेशन मार्गावर मोठ्या प्रमाणात कचरा व धुळीचा त्रास नागरीकांना होत आहे. तसेच नवीन रस्त्यांची कामे सुरू असल्याने उडणाऱ्या धुळीमुळे नागरिक त्रस्त आहेत, काही ठिकाणी पाणी वाल्वजवळील गाळ व कचऱ्यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता धोक्यात आली आहे. शहरात मोकाट कुत्री व जनावरे यांमुळेही नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

# प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना अवांतर वाचन संस्कार देणे हा बालविकास मंदिर प्राथमिक शाळेचा स्तुत्य उपक्रम -कलावती ठाकरे



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा मालेगाव येथे भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.तसेच जागतिक हात धुवा दिन विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखवत साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष वैशाली बोरचाटे,प्रमुख पाहुणे छाया कानेड,कलावती ठाकरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेची पूजन व हार अर्पण करून करण्यात आले.

यानंतर उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या प्रतीनुसार पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांच्या मार्गदर्शनात खास वाचन कट्टा सुरू करण्यात आला. त्याचे अनावरण यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तसेच शाळेच्या ग्रंथालया मध्ये विविध १२०० पुस्तकांचा संचय असल्याने विद्यार्थी या पुस्तकांचा सुद्धा उपयोग वाचनासाठी वेळोवेळी करत असतात. तसेच आज जागतिक हात धुवा दिन असल्याने विद्यार्थ्यांना स्वच्छ हाताचे महत्त्व पटवून देऊन वेळोवेळी आपल्या हात कसे स्वच्छ राहतील आणि कशा पद्धतीने आपण हात स्वच्छ धुवावे जेणेकरून आपले आरोग्य चांगले राहील या उद्देशाने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिका द्वारे हात धुवून दाखवून त्याचे महत्त्व पटवून दिले.

# बालगृहातील चिमुकल्यांसोबत दिवाळी साजरी करा

**अकोला :** बालगृह, शिशुगृह, महिला राज्यगृहातील महिलाभगिनी व बालकांना दिवाळी सण साजरा करता यावा यासाठी जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था तसेच, नागरिकांनी पुढाकार घेऊन त्यांच्यासमवेत दिवाळी सण साजरा करावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागाने केले आहे.

बालगृह, राज्यगृहातील महिला, बालके व भिक्षेकरी यांना दिवाळी साजरा करता यावी यासाठी स्वयंसेवी संस्था, पुढारी, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी पुढाकार घेऊन त्यांच्यासोबत दिवाळी सण साजरा करावा.

# बंद पडलेली सव्वाशे वर्षे जुनी जि.प.शाळा प्रगतीच्या दिशेने वाटचाल!

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

मालेगाव येथील सव्वाशे वर्षे वयाची इंग्रजाच्या काळात सुरू केलेली मराठी प्राथमिक शाळा पटसंख्या अभावी २०२४ मध्ये बंद करण्यात आली होती.मात्र आज रोजी शाळा व्यवस्थापन समितीने पालकांचा विश्वास संपादन करून पटसंख्या वाढवण्यासाठी प्रयत्न केला आणि 'पंतप्रधान श्री 'योजने अंतर्गत शासनाकडून शालेय साहित्य उपलब्ध करून दिल्याने शाळेत मुलांची संख्या वाढली आहे.सध्या शाळा प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.



मालेगाव शहरातील जिल्हा परिषदेची शाळा सन १८८९ साली इंग्रज काळात सुरू झाली होती.त्यावेळी वर्ग १ ते ७ पर्यंतचे वर्ग होते.मालेगाव परीसरातील ती त्यावेळी सर्वात मोठी शाळा होती.या शाळेत शहरांसह ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शिकून मोठ्या पदांवर पोहोचले होते.एव्हडेच नव्हे तर, २५ वर्षी पुर्वी या शाळेची पटसंख्या १२०० च्या वर होती.आणि २५ शिक्षक कार्यरत होते.

परंतु २००० साली इंग्रजी शाळांच्या आकर्षणामुळे या मराठी शाळेला अवकळा सुरू झाली. २०२४ मध्ये वर्ग १ ते ७ मध्ये फक्त ३३ विद्यार्थी संख्या व ३ शिक्षक कार्यरत असल्याने ही शाळा बंद करण्यात आली होती.आणि या शाळेतील विद्यार्थी जि.प.मुलीच्या शाळेत स्थलांतरित करण्यात आले होते. जवळपास १३६ वर्ष जुनी शाळा बंद केल्याने अनेक सुज्ञ लोक व गावातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी नाराजी व्यक्त केली होती.

यावर्षी नव्याने गठीत करण्यात आलेल्या शाळा व्यवस्थापन समितीने शाळेला पुर्वीचे दिवस यावं यासाठी प्रयत्न केले.पालकांचा विश्वास संपादन करून विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न केले.

# दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दिव्यांग बांधवांसाठी आनंदाची बातमी



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

नगरपरिषदेच्या वतीने, आमदार सई प्रकाश डहाके यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून दिव्यांग बांधवांसाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. दि. १७ ऑक्टोबर रोजी नगरपरिषद परिसरात 'दिव्यांग कल्याण केंद्रा' चे लोकार्पण सोहळा संपन्न झाला. या केंद्राच्या माध्यमातून कारंजा शहरातील दिव्यांग नागरिकांना विविध शासकीय योजना, सल्ला, मार्गदर्शन तसेच आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हे केंद्र दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी आणि स्वावलंबनासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेला हा उपक्रम दिव्यांग बांधवांसाठी आनंदाची आणि आशेची किरण देणारी बातमी आहे.

# शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने काळी दिवाळी आंदोलन

## अतिवृष्टी बाधींताना शासनाकडुन मदत न मिळाल्याच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

शासनाने शेतकऱ्यांची फसवणुक केली. अजुनही अतिवृष्टीची मदत शेतकऱ्यांच्या हाती आली नसल्याने त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या वतीने वाशीम येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जिल्हाध्यक्ष बाबाराव खडसे पाटील यांच्या नेतृत्वात वाशिम जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अरविंद पाटील इंगोले , वाशीम नगर परिषद माजी उपाध्यक्ष माधवराव अंभोरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये 'काळी दिवाळी'आंदोलन छेडण्यात आले.



यावेळी जिल्हाधिकारी वाशिम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मागील महीन्यात झालेल्या अतिवृष्टींच्या संकटांनी व शासनाच्या फसव्या मदतीच्या सुलतानी संकटाने महाराष्ट्रातील शेतकरी बेजार आहेत या नाकर्त्या सरकारने मदत जाहीर करून दिवाळीपूर्वी मदतीचे पैसे खात्यात टाकू अशी आश्वासन दिले मात्र अद्याप शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाणार असून याला सर्वस्वी जबाबदार महायुतीचे सरकार आहे सरकारने निव्वळ आकड्यांची धुळफेक करून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे.ऐन संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देणे गरजेचे असताना हे सरकार प्रचारात मग्न आहे.त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार गटाचे वाशिम जिल्ह्याच्या वतीने सरकार विरोधात काळी दिवाळी आंदोलन छेडण्यात आले. या याबाबत राज्यशासनाने गांभीर्याने लक्ष घालून शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी असे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून स्पष्ट केले .निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी स्विकारले .

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे, जि.प.माजी अध्यक्ष अरविंद पाटील इंगोले, जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, जि.प.सदस्य अमित पाटील खडसे, जिल्हा उपाध्यक्ष कैलासराव खानझोडे, डॉ. नारायणराव शेंडगे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा वैशालीताई मेश्राम, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष वाशीमचे रमेश पाटील गोटे, कारंजाचे मनीष कानकिरड,मानोराचे काशीराम राठोड, मंगरूळपीरचे राजेश पाटील टोपले, रिसोडचे गजाननराव सरनाईक, मालेगावाचे भगवानराव शिंदे ,रायुकांचे रिसोड तालुका अध्यक्ष माधवराव शेवाळे माजी? पं.स.सदस्य डॉ.गजानन बाजड, मुरलीधर जुनघरे,अनंता देशमुख, गजानन शिंदे, महेश बोरकर, किशोर लहाने, संदीप पाचरणे, सामाजिक न्याय कक्षाचे जिल्हाध्यक्ष गौतम कांबळे, रा.का.सेवादल जिल्हाध्यक्ष गणपतराव भरकड, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष ईमरान फकीरावाले, शेषराव वाझूळकर,शिवा घूगे,चेतन सोळंके, मनोज अडागळे,दिनकर पुंड, गणेश चोपडे,जयंतराव ईरतकर, गुलाबराव पाटील, मनोज उफाडे, मालेगाव पं.स.चे माजी उपसभापती विजय घोडे,आसीफ पठाण यांच्या सह शेकडो कार्यकर्ते ह्या आंदोलनात सहभागी झाले होते.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३१९ ■ शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# वाळू चोरीच्या हप्त्यांमुळे खनिकर्म व पोलिस प्रशासनाचा उदोउदो

## -वाळूघाटांचे लिलाव होण्याआधीच सुरू झाले भ्रष्टाचाराचे कळकट खेळ

### जिल्हाधिकाऱ्यांवर दबाव

**वर्धा रवींद्र लाखे :** वर्ध्यात वाळूमाफियांनी पुन्हा डोके वर काढले आहे. घाटांचे लिलाव बाकी असतानाही अवैध वाळू उपसा आणि वाहतूक धडाधड सुरू असल्याची माहिती बाहेर येत आहे. महसूल आणि पोलिस विभागाच्या छत्राखाली वाळू माफियांच्या ट्रॅक्टर-टिप्पर मार्गांना अभय मिळालं आहे, अशी चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

या वाढत्या घटनांवर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयातील बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त केली. वाळू चोरी झाल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना जबाबदार ठरवले जाईल, असा



स्पष्ट इशारा त्यांनी दिला. बावनकुळे यांनी पर्यावरण परवानगी मिळालेल्या प्रत्येक वाळूघाटाचा लिलाव १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश देत विलंब करणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही दिला.

वना नदीपात्रातून दर रात्री ट्रॅक्टर व टिप्परद्वारे वाळू वाहून नेली जात असतानाही स्थानिक पोलिस ठाण्यांकडून कोणतीही कारवाई होत नाही. एलसीबी चे पथक मात्र सातत्याने कारवाया करत असल्यामुळे येथील दुहेरी प्रशासनाचे चित्र उघड होत आहे. हिंगणघाट ठाणेप्रमुख आणि काही महसूल अधिकाऱ्यांवर हप्ते वसुलीचे आरोपही समोर आले आहेत.खनिकर्म अधिकारी शेळके



खनिकर्म अधिकारी आणि यांच्या मालामाल झालेल्या कारकिर्दीबद्दल वर्तुळे चर्चेत आहेत. वाळू माफियांकडून मोठ्या प्रमाणावर वसुली करून अवैध साठा वाहून नेण्यासाठी मोकळीक दिल्याचे आरोप त्यांच्या विरोधात आहेत. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या नेतृत्वाखाली नेमकी कोणती कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, वाळू माफियांकडून प्रशासनातील काहींना मिळणाऱ्या हप्त्यांमुळे वाळू चोरीला मिळालेले सरकारी संरक्षण नागरिकांमध्ये संताप निर्माण करत आहे.

### एलसीबीच्या अवैध वाळूवर सातत्याने कारवाया, ठाणेप्रमुख, खनिकर्म अधिकारी हप्ते खाऊन सुस्त

एलसीबीचे कर्तव्यदक्ष अधिकारी निष्ठेने काम करत आहेत. अवैध वाळू उपस्यावर त्यांच्या टिमकडून सातत्याने कारवाया केल्या जात आहेत, तर हिंगणघाट ठाणेप्रमुख आणि वर्धा आणि खनिकर्म अधिकारी मात्र हप्ते खाऊन सुस्त बसल्याचे दिसत आहे.

# बचतगटांनी बाजारपेठेत टिकतील अशा वस्तू निर्माण कराव्यात - पालकमंत्री

## -वर्धिनी दिवाळी फराळ महोत्सवाचे उद्घाटन



**वर्धा जनमाध्यम :** बचत गटामार्फत तयार करण्यात येणाऱ्या विविध वस्तू बाजारपेठेत टिकतील अशा स्वरूपाच्या तसेच गुणवत्तापूर्ण व स्पर्धात्मक स्वरुपाच्या असाव्या. यामुळे गटाच्या वस्तूंना बाजारपेठ मिळून महिलांना आर्थिक संपन्न होता येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. भोयर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापक उमेद व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या संयुक्त विद्यमाने बसस्थानक परिसरात पाच दिवसीय वर्धा वर्धिनी दिवाळी फराळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री डॉ .भोयर यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय वाहतुक अधिकारी स्वाती तांबे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात उमेदची चळवळ मोठ्या प्रमाणात असून उमेदमार्फत बचतगटातील महिलांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. बचत गटातील महिलांनी बाजारपेठेच्या मागणीनुसार उत्पादन करुन बाजारपेठेत टिकेल असे वस्तूंचे दर ठेवावे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत उद्योग व्यवसायासाठी कर्ज योजनेंचा लाभ घ्यावा, असे पुढे बोलतांना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले.

यावेळी बचतगटातर्फे निर्मित विविध वस्तूच्या लावण्यात आलेल्या स्टॉलला पालकमंत्री डॉ.भोयर यांनी भेट देऊन गटातील महिलांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैशाली रसाळ यांनी केले. संचलन मिलींद झामरे यांनी केले तर आभार उमेदचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक निरज नखाते यांनी मानले. कार्यक्रमाला बचग गटातील महिला मोठ्या संख्येंने उपस्थित होत्या.

# माध्यमांच्या गतीबरोबर बदला:डॉ.अजीत पाठक

**वर्धा जनमाध्यम :** पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया (झेंएघ) चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजीत पाठक यांनी शुक्रवार, १७ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथील मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र अंतर्गत आयोजित ऑनलाईन पुनश्चर्या प्रशिक्षण कार्यक्रमात 'विकसित भारतात जनसंपर्क आणि जनसंचारची भूमिका' या विषयावर व्याख्यान दिले. डॉ. पाठक यांनी डिजिटल युगात यशस्वी मीडिया व्यवस्थापनाची योजना व अंमलबजावणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की संपर्क, जनसंपर्क आणि व्यावसायिकता हे घटक एखाद्या व्यक्तीला, संस्थेला किंवा कंपनीला उत्कृष्टतेपर्यंत पोहचवू शकतात. म्हणूनच ब्रँडिंग आणि प्रतिमा निर्माण हे प्रगतीची साधने म्हणून वापरली जात आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, एखाद्या संस्थेतील कर्मचारीच त्या संस्थेचे ब्रँड ॲम्बेसेडर असतात. माध्यमांमध्ये होत असलेल्या बदलांविषयी



बोलताना त्यांनी नमूद केले की, माध्यमं काळाच्या वेगाने झपाट्याने बदलत आहेत आणि त्यांची वाढ सुद्धा वेगाने होत आहे. त्यामुळे या गतीशी जुळवून घेणे आवश्यक आहे.

चांगल्या जनसंपर्कासाठी वैयक्तिक आणि मैत्रीपूर्ण संबंध महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. व्याख्यानादरम्यान त्यांनी प्रभावी मीडिया व्यवस्थापन, जाहिरात, ब्रँडिंग, कार्यक्रम आयोजन, विशिष्ट गटासाठी सहली व बैठकींचे आयोजन यांचा उल्लेख केला. डॉ. पाठक यांनी जनसंपर्कात कृत्रिम बुद्धिमत्ता (ंघ) चा उपयोग करण्याचा सल्ला दिला. त्यांनी मशीन लर्निंग, निर्णय घेण्याची क्षमता, डेटा सुरक्षेची आवश्यकता, मीडिया क्षेत्रातील नैतिकता व जबाबदारी, डिजिटल संवाद यासारख्या मुद्द्यांवर भर दिला आणि स्पष्ट केले की, विकसित भारतात मीडिया एक प्रभावी साधन ठरू शकतो.

या प्रसंगी जनसंचार विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. संदीप वर्मा आणि जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात शिक्षक आणि संशोधकांनी ऑनलाईन सहभाग नोंदवला.

# आंजी मोठी मंडळातील गावांना अतिवृष्टी लाभ क्षेत्रात समाविष्ट करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील आंजी मोठी महसूल मंडळातील पवनूर, कामठी, मजरा, बोरगाव, चंडिकापूर, सेवा कामठी, नर्सूला पेठ पुलइ, धुळवा डोरली या गावांतील शेतकरी अतिवृष्टीच्या नुकसानीमुळे हवालदिल झाले आहेत. राज्य सरकारने विविध भागात मदतीची घोषणा केली असली, तरी या गावांचा अतिवृष्टी बाधित



क्षेत्रात समावेश न झाल्याने येथील शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित राहावे लागत आहे.या संदर्भात शेतकऱ्यांनी आज पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांना शासकीय विश्रामगृह येथे निवेदन दिले. या निवेदनावर माजी सरपंच जगदीश संचारिया, रमेश राऊत, सुरज वारुळकर, दिलीप कोंडलकर, प्रफुल कांबळे, राजू इरपाते आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.मुसळधार पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अनेकांनी कर्ज काढले किंवा महिलांनी दागिने गहाण ठेवले आहेत. प्रशासनाने पंचनामाही केला आहे; मात्र अद्याप मदतीचा अधिकार मिळाला नाही. शासनाने आंजी मोठी मंडळातील सर्व गावांना अतिवृष्टी बाधित मंडळात समाविष्ट करावे, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

## शिवसेनेचे नविन पदाधिकारी जाहीर

# वर्ध्यात आता नव्या दमदार नेतृत्वाच्या तयारीला सुरुवात


**वर्धा जनमाध्यम :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने जिल्ह्यातील नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. मुंबईतील बाळासाहेब भवन येथील जिल्हा कार्यालयात आयोजित बैठकीत शिवसेना सचिव संजय मोरे, प्रमुख नेते भाऊसाहेब चौधरी, विदर्भ समन्वयक आमदार नरेंद्र भोंडेकर, संघटक किरण पांडव, संपर्क प्रमुख राज दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हाप्रमुख राजेश सराफ व प्रशांत शहागडकर यांच्या शिफारसीनुसार नियुक्त्यांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.१६ ऑक्टोबर रोजी झालेल्या या बैठकीत लोकसभा सहसंपर्क प्रमुख म्हणून श्रीकांत मिरापूरकर आणि युवासेना लोकसभा अध्यक्षपदी सूर्या हिरेखन यांच्या निवडी जाहीर झाल्या. तसेच विविध विधानसभा मतदारसंघांत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली.वर्धा विधानसभेत उपजिल्हाप्रमुख मिलन गांधी, शहरप्रमुख शार्दुल वांदिले, तालुका प्रमुख प्रमोद पांडे, विधानसभा समन्वयक बादल श्रीवास तर देवळीतील प्रमुखांची जबाबदारी अजिंक्य तांबेकर यांच्याकडे, तर आर्वी व हिंगणघाट परिसरातही नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.या बैठकीचे संचालन प्रसिद्धी प्रमुख दिलीप भुजाडे यांनी केले. बैठकीला वर्ध्यातील सर्व पदाधिकारी आणि असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी निवडणुकीसाठी नव्या नेतृत्वाला शिवसेनेतील कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे.







# दिवाळीचा झगमगाट; बाजारपेठा फुलल्या

## -ग्राहकांची गर्दी, विक्रेत्यांचे सेल-ऑफर्सचा वर्षाव

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीच्या स्वागतासाठी वर्धा शहर आणि ग्रामीणभागात बाजारपेठांना नवसंजीवनी मिळाली आहे. शहरात कपडे, दागिने, सजावटीच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स, फटाके, मिठाई, वाहने आणि किराणा सामानाच्या दुकानांपुढे ग्राहकांची गर्दी उसळली आहे. प्रत्येक विक्रेता ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या सवलती, सेल आणि जाहिरातबाजी करत आहे. यंदा काही जण ऑनलाइन खरेदीकडे वळले असले तरी बहुसंख्य ग्राहक पारंपरिक बाजारपेठांचा आनंद घेत आहेत. दुकानदारांनी रंगीबेरंगी पणत्या, आकर्षक आकाशकंदील आणि विविध लायटींगने दुकान सजवली आहेत. काही व्यापाऱ्यांनी जीएसटी निमित्त किमती घटवल्या तर काहींनी अद्याप जुने दर कायम ठेवल्याने नाराजी व्यक्त होत आहे. कुठे सर्रास खरेदी, कुठे दराचा तिढा, तरीही बाजार वसलेला आणि ग्राहकांचा ऊत्साह ओसंडून वाहतो आहे.

दिवाळीच्या उत्साहाने बाजारपेठ गजबजली असून सर्वांना खास ऑफर्सचा फायदा घ्या, असे विक्रेते सांगत आहेत.दिवाळीची मजा घेण्यासाठी, वर्धा बाजारपेठेत आज फटाके, कपडे, दागिने, लायटींग, मिठाई, वाहने, सजावटीच्या वस्तू अशा सर्व विभागात होतकरू ग्राहकांची प्रचंड वर्दळ पाहायला मिळते. सणासुदीच्या आनंदात बाजार फुलून आला आहे.

# खासदार अमर काळे यांची शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला संवेदनशील भेट

**हिंगणघाट जनमाध्यम:** तालुक्यातील सावली (वाघ) येथील शेतकरी संजय पुंडलीक ठक यांनी शेतीतील सततच्या नापिकी व कर्जाच्या ओझ्याला कंटाळून आत्महत्या केली. ही घटना समजताच खासदार अमर काळे यांनी आपल्या हिंगणघाट दौऱ्यातून वेळ काढून ठक कुटुंबाच्या घरी जाऊन भेट दिली व कुटुंबीयांचे सांत्वन केले.

संजय ठक यांच्या कुटुंबात पत्नी, मुलगा व मुलगी असून दोघेही महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. कुटुंबाचा पूर्ण उदरनिर्वाह शेतीवरच अवलंबून आहे. मात्र सततची नापिकी,



शेतमालाला न मिळणारा योग्य भाव, वाढता उत्पादन खर्च आणि खाजगी बँकांच्या कर्जतगाद्याने ठक कुटुंब आर्थिक विवंचनेत सापडले. या संकटातून कंटाळून संजय ठक यांनी आत्महत्या करण्याचा मार्ग निवडला.शेतकऱ्यांचे प्रश्न ऐकून खासदार काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करताना सांगितले की, शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो, परंतु आज त्याचे वास्तव वेगळीच कहाणी सांगते. सरकारकडून होत असलेली केवळ प्रतीकात्मक मदत शेतकरी कुटुंबांचे वास्तव बदलू शकत नाही, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.या भेटीवेळी सुनिल राऊत, तसेच कार्यकर्ते बालू वानखेडे, महेश झोटींग, दशरथ ठाकरे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# पोलिस दलाच्या आधुनिकतेमुळे गुन्ह्यांची उकल करण्याचे प्रमाण वाढले- पालकमंत्री

## -देवळी येथे सीसीटीव्ही सरव्हेलन्स सिस्टीम, फॉरेन्सिक व्हॅनचे लोकार्पण

**वर्धा जनमाध्यम :** देशासह, राज्यात शांतता ठेवण्याचे काम पोलिस करित आहे. पोलिसांचे काम बघून जहाल नक्षलवादीसुध्दा आत्मसमर्पण करित आहे. पोलिस यंत्रणा अधिक बळकट व सुदृढ करण्याचे काम सातत्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सुरू आहे. मोबाईल फॉरेन्सिक लॅब, वाहने, बसेस, सीसीटीव्ही आदी अत्याधुनिक उपकरणे देऊन पोलिस विभागाचे बळकटीकरण करण्यात येत असून पोलिस दलाच्या आधुनिकतेमुळे गुन्ह्यांची उकल करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

देवळी येथे सीसीटीव्ही सरव्हेलन्स सिस्टीम, फॉरेन्सिक व्हॅनचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते लोकार्पण झाले, त्यावेळी ते बोलत होते. आमदार राजेश बकाने, आमदार समीर कुणावार, माजी खासदार रामदास तडस, पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा नागपूरचे उपसंचालक अश्विन गेडाम, देवळीचे पोलिस निरीक्षक अमोल मंडाळकर याच्यासह पोलिस विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री डॉ.भोयर पुढे म्हणाले, सीसीटीव्ही पोलिसांचा तिसरा डोळा म्हणून काम करतो. सीसीटीव्ही लावण्यात आले तेव्हापासून पोलीस दलाला गुन्ह्यांची उकल करण्यास मदत झाली. गुन्हेगारांच्या मनामध्ये धास्ती निर्माण झाली असून गुन्हेगारीचे प्रमाण कमी होत आहे. देवळीसारख्या छोट्या शहर व परिसरात २२ ठिकाणी ८८ सीसीटीव्ही लावण्यात आले असून



त्यामुळे गुन्हेगारांना पकडण्यासाठी नक्कीच मदत होणार आहे, असे त्यांनी सांगितले. चोरी, दरोडा यासारख्या गुन्ह्यांमध्ये जप्त झालेला मुद्देमाल परत मिळावा म्हणून नागरिकांना चकरा माराव्या लागत होत्या. परंतू आता जिल्हा पोलिस दलाने उत्कृष्ट कामगिरी करुन जप्त केलेला ४१ लक्ष रुपयांचा मुद्देमाल नागरिकांना परत करण्यात येत आहे, यासाठी वर्धा पोलिस दलाचे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी अभिनंदन केले. वर्धा येथे फॉरेन्सिक प्रयोगशाळा लवकरच सुरू होणार आहे. त्यामुळे विविध गुन्हांची उकल लवकर करण्यास मदत होईल. आमदार बकाणे म्हणाले, नागरिक आतुरतेने सीसीटीव्ही लागण्याची वाट पाहत होते. अवघ्या पाच महिन्याच्या कालावधीत देवळी शहर व परिसरातील सीसीटीव्ही कार्यरत झाले, त्यासाठी त्यांनी पालकमंत्री डॉ. भोयर यांचे आभार मानले. देवळी व पुलगाव येथे नवीन पोलिस स्टेशन इमारत व वसाहतीची निर्मिती करावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

आमदार कुणावार म्हणाले, अनेक वर्षांपासून मुद्देमाल परत मिळण्यासाठी फार कालावधी लागायचा. आशा सोडलेल्या लोकांना चांगल्या पोलिसींगव्दारे जप्त केलेला मुद्देमाल लवकर मिळत आहे. पोलिस दलाचे आधुनिकीकरण झाल्यामुळे दिवसेंदिवस गुन्ह्यांची उकल होण्याचे प्रमाण वाढत आहे. नागरिकांना चांगली सेवा देता यावी म्हणून पोलिस भरती सुध्दा होणार असल्याचे ते म्हणाले. माजी खासदार रामदास तडस म्हणाले, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांमुळे नागरिकांना होणारा त्रास सीसीटीव्हीच्या निगराणीमुळे कमी होणार आहे. आगामी पोलिस विभागाच्या क्रीडा स्पर्धा येथे घेण्यात याव्यात, असे म्हणाले.

सुरुवातीस पालकमंत्री डॉ.भोयर यांच्याहस्ते फॉरेन्सिक व्हॅन व बसचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी पोलिस पाटील संघटनेच्यावतीने पालकमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांनी केले तर आभार निरिक्षक अमोल मंडाळकर यांनी मानले.

**नगर परिषद कार्यालय, देवळी, जि.वर्धा**

**ध्वनी प्रदुषण बाबत जाहीर आवाहन**

देवळी शहरातील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, ध्वनी प्रदुषण म्हणजे असा त्रासदायक आवाज, ज्याचा मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर तसेच वर्तनावर दुष्परिणाम होतो. औद्योगिक यंत्रसामग्री, लाऊडस्पिकर, वाहनांचे हॉर्न, फटाके तसेच सतत उच्च आवाज निर्माण करणारी साधने या ध्वनी प्रदुषणाच्या प्रमुख कारणांपैकी आहेत. सदर सुचनेनुसार देवळी शहरामध्ये रात्री १०.०० नंतर क्षमतेपेक्षा जास्त आवाजात लाऊडस्पिकर, फटाके किंवाअन्य ध्वनी प्रदुषण करणारी उपकरणे वापरणे कायदेशीर गुन्हा आहे. असे आढळल्यास **ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००** अंतर्गत आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

| क्षेत्र | ध्वनीची मर्यादा | |
|---|---|---|
| | दिवसाची वेळ (सकाळी ६.०० ते रात्री १०.००) | रात्रीची वेळ (रात्री १०.०० ते सकाळी ६.००) |
| औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| व्यवसाय क्षेत्र | ६५ | ५५ |
| रहिवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| शांतता क्षेत्र | ५० | ४० |

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देवळी,
जिल्हा वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### भाजप आमदार शिवाजी कर्डीले यांचे हृदयविकाराने निधन

**राहुरी**-माजी मंत्री आणि राहुरी मतदारसंघाचे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ आमदार शिवाजी कर्डीले यांचे शुक्रवारी सकाळी



हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार आमदार संग्राम जगताप व माजी महापौर संदीप कोतकर यांचे ते सासरे होते.शुक्रवारी पहाटे तब्येत त्यांना तत्काळ राहुरी येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच सकाळी ८.१० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समजताच राहुरीसह संपूर्ण नगर जिल्ह्यात शोककळा पसरली असून साईदीप हॉस्पिटलसमोर कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली आहे.शिवाजी कर्डीले यांचा जन्म १० जानेवारी १९७० रोजी राहुरी येथे झाला. शिक्षणानंतर त्यांनी शेती आणि दुग्धव्यवसायात काम सुरू केले. नंतरच्या काळात जनसंपर्क वाढवत राजकारणात प्रवेश केला. २००४ मध्ये नगर उत्तरमधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर पहिल्यांदा विजय मिळवला. त्यानंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि तीन वेळा आमदारकी मिळवली. २०१९ मध्ये त्यांचा पराभव झाला होता, मात्र २०२४ मध्ये त्यांनी पुन्हा एकदा विजयश्री खेचून आणली.

### ऐन दिवाळीत कांदा उत्पादकांना आर्थिक फटका

**लासलगाव**-येथील बाजार समितीमध्ये कांद्याला कवडीमोल दर मिळत असल्याने शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. गुरुवार (दि. १६) कांद्याला सरासरी १०५० रुपये प्रति क्विंटल इतका दर मिळाला आहे. येथील मुख्य बाजार समितीत उन्हाळ कांद्याला किमान ४००, कमाल १४०० तर सरासरी १०५० रुपये प्रति क्विंटल दर मिळाले त्यातच आता नाफेडकडून शहरी भागात स्वस्त दरात कांद्याची विक्री सुरू करण्यात आली आहे. या विक्रीमुळे खुल्या बाजारातील दरावर दबाव येत असून, त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसत आहे. आधीच भाव घसरलेले असताना नाफेडच्या स्वस्त विक्री धोरणामुळे दर आणखी खाली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.दीपावलीनिमित्त बाजार समिती सात दिवस बंद राहणार असल्याने बाजार समिती सुरू झाल्यानंतर आवक वाढण्याची शक्यता असल्याने दरात आणखी घसरण होण्याची भीती शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. यंदा परतीच्या पावसाने कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या चाळीत साठवलेला उन्हाळी कांदाही ओलसरपणामुळे खराब झाला आहे. एकीकडे नैसर्गिक आपत्ती तर, दुसरीकडे कांद्याचे घसरलेले दर अशा दुहेरी संकटामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आला आहे. लासलगाव बाजार समितीत सध्या उन्हाळी कांद्याबरोबरच नव्या लाल कांद्याची आवक वाढू लागली आहे. दिवाळीनंतर बाजार पुन्हा सुरू झाल्यावर ही आवक आणखी मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे.

### चितळे डेअरीकडून पूरग्रस्तांसाठी एक कोटीची मदत

**सांगली**-मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टी व पुराने मोडलेले संसार पुन्हा उभे करण्यासाठी चितळे डेअरीकडून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक कोटीची मदत दिली. चितळे डेअरीच्या वतीने भागीदार श्रीपाद चितळे, विश्वास चितळे व व्यवस्थापकीय भागीदार निखिल चितळे यांनी मदतीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.मराठवाड्यातील सोलापूर, लातूर, बीड, धाराशिव जिल्ह्यांत अतिवृष्टी व नद्यांना आलेल्या पुरामुळे शेती व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक संसार उघड्यावर पडले आहेत. अशा पूरग्रस्तांना मदतीचा हात देऊन पुन्हा उभे करण्यासाठी चितळे डेअरीने एक सामाजिक जबाबदारी म्हणून आपला वाटा उचलला आहे. चितळे डेअरी उद्योगाच्या वतीने एक कोटी रुपयांची मदत जाहीर करत मदतीचा धनादेश मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

## पूरग्रस्त शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत करण्याची
# राज्य सरकारची तयारी नसल्याने 'काळी दिवाळी' साजरी करावी-पवार

**बारामती**-महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. फक्त शेतीच उद्ध्वस्त झाली नाही तर शेतीची जमिनही खरडून गेली. यामुळे शेतकरी संकटात सापडला असून या शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत करण्याची राज्य सरकारची तयारी दिसत नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला राज्यभरात आज काळी दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घ्यावा लागल्याचे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. ते बारामाती येथे माध्यमांशी संवाद साधत होते.

शरद पवार म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि सहकाऱ्यांनी बसून आजचा दिवस दिवाळी साजरी करायची नाही असा निर्णय घेतला. कारण, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी झाली आहे. काही ठिकाणी पूर, तर काही ठिकाणी महापूर होता. यात शेती उद्ध्वस्त झाली. नुसती शेती उद्ध्वस्त झाली नाही तर ज्या जमिनीत पिक येते ती जमीनच खरडून गेली. त्यामुळे शेतकरी अस्वस्थ आहे.

त्याच्या दृष्टीने शेतीची जमीनच सर्वस्व आहे. त्याचे सर्वस्व गेले असून तो कोणत्या मनस्थितीत दिवाळी साजरी करणार. त्याच्या या दुःखात आमच्या संघटनेने सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

ते पुढे म्हणाले की, संकटे येत असतात. पण अशा वेळाला



ज्यांच्याकडे राज्याची, देशाची सत्ता असते, त्यांची संकटग्रस्त लोकांना संकटातून बाहेर काढण्यास हातभार लावण्याची जबाबदारी असते. राज्य सरकारने काही तोकडी रक्कम जाहीर केली, पण नुकसानीचे स्वरुप बघितल्यानंतर या रकमेचा उपयोग पुन्हा उभे करण्यासाठी होईल असे वाटत नाही. त्यामुळे राज्य सरकारवर संकटग्रस्त शेतकरी नाराज आहे.

माझा या सगळ्या प्रश्नाकडे बघायचा दृष्टीकोन वेगळा आहे. यात राजकारण आणू इच्छित नाही. संकटग्रस्त लोकांना संकटातून बाहेर काढण्यासाठी सगळ्यांनी मिळून प्रयत्नांची पराकाष्टा केली पाहिजे आणि ती तयारी राज्य सरकारमधील लोकांनी दाखवली.

पण सढळ हाताने मदत करण्याची त्यांची तयारी दिसत नाही. त्यामुळे नाईलाजाने आजचा दिवस साजरा करायचा नाही असा निर्णय आमच्या संघटनेला घ्यावा लागला, असेही पवार म्हणाले.

# बाजार समित्यांची सूत्रे थेट पणनमंत्र्यांकडे
## 'एपीएमसी'वरील सहकार विभागाचे नियंत्रण संपुष्टात

**नवी मुंबई**-राज्यातील महत्त्वाच्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील विद्यमान व्यवस्थापन मंडळाला नामशेष करून या समित्यांची सूत्रे पणनमंत्र्यांकडे सोपवणारा अध्यादेश महाराष्ट्र सरकारने जारी केला आहे. त्यानुसार मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर, सांगली, छत्रपती संभाजीनगरसह आणखी काही प्रमुख बाजार समित्या आता 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' ठरणार असून तेथील राजकीय समीकरणेही सत्ताधारी पक्षांच्या बाजूला सरकण्याची चिन्हे आहेत.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या या शेतमालाच्या खरेदी-विक्रीची महत्त्वाची केंद्रे असली तरी, त्यांना मोठे राजकीय महत्त्वही आहे. या बाजार समित्यांच्या संचालक पदांवर वर्णी लावून घेऊन राजकीय सूत्रे आपल्या हाती ठेवण्याचे प्रयत्न प्रत्येक सत्ताधाऱ्याकडून किंवा त्या त्या भागातील मोठ्या नेत्याकडून केले जात. मात्र, राज्य सरकारच्या नव्या अध्यादेशामुळे हे वर्चस्वच संपुष्टात येणार आहे.

'महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनिमयमन) अधिनियम, १९६३'मध्ये सुधारणा करणारा अध्यादेश राज्य सरकारने राज्यपालांच्या स्वाक्षरीनिशी १३ ऑक्टोबर रोजी जारी केला आहे. त्यानुसार, कृषीमालाची खरेदी-विक्री किंवा त्या अनुषांगिक कामे पार पाडल्या जाणाऱ्या कोणत्याही विद्यमान बाजाराला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' म्हणून दर्जा देण्यात आला आहे.

वार्षिक ८० हजार टन किंवा त्यापेक्षा अधिक कृषीमालाची उलाढाल असलेल्या तसेच दोन किंवा अधिक राज्यांतून येणाऱ्या कृषीमालाचे व्यवहार होत असलेल्या बाजारांनाही 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' म्हणून दर्जा देण्यात येणार आहे.

विद्यमान बाजार समित्यांमध्ये विशेष पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबर व्यवहारांत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे अध्यादेशात म्हटले गेले आहे. मात्र, या अध्यादेशाद्वारे कृषी उत्पन्न बाजारांवरील राजकीय नियंत्रणही कमी करण्यात आले आहे. राज्याचे पणनमंत्री सर्व बाजारांचे पदसिद्ध अध्यक्ष असणार असून पणन राज्यमंत्री उपाध्यक्ष असणार आहेत. त्याशिवाय कृषी आयुक्त, पणन संचालक, राज्य पणन मंडळाचा कार्यकारी संचालक यांचा या समितीच्या सदस्यांत समावेश असणार आहे. त्याखेरीज त्या त्या विभागातील चार शेतकरी, तीन व्यापारी सदस्य या समित्यांमध्ये असणार आहेत. या अध्यादेशाची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# वादग्रस्त अधिकारी सचिन बोरसे यांची अखेर बदली

**ठाणे**-महापालिकेतील भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांची खुलेआम लाचखोरी, बिल्डरांसाठी जनतेच्या पाण्याची होणारी चोरी, वाहतूककोंडी, बेकायदा बांधकामांची बजबजपुरी, गुंडाराज आणि त्याला असलेला सत्ताधाऱ्यांचा पाठिंबा याविरुद्ध शिवसेना आणि मनसेने महामोर्चा काढला होता. या मोर्चाला ठाणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता.

शिवसेना, मनसेने ठाणे महापालिकेवर काढलेल्या मोर्चात महाविकास आघाडीसह हजारो ठाणेकर उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. त्याचा परिणाम दिसत असून शिवसेना, मनसेच्या महा मोर्चानंतर पालिका आयुक्तांनी पहिला दणका देत वादग्रस्त अधिकारी सचिन बोरसे यांची अखेर बदली केली आहे.शिवसेना, मनसेच्या महामोर्चानंतर पालिका आयुक्तांनी पहिला दणका देत वादग्रस्त अधिकारी सचिन बोरसे यांची अखेर बदली केली आहे. सचिन बोरसे यांच्याकडून निवडणुक विभाग काढला असून त्यांच्याकडे परवाना विभाग, जनगणना विभाग आणि नागरी सुविधा केंद्राचा पदभार सोपवण्यात आला आहे. तर कार्यालयीन अधीक्षक बाळू पिचड यांच्याकडे निवडणूक विभागाचा पदभार देण्यात आला आहे. शिवसेना, मनसेसह महाविकास आघाडीने बोरसे यांच्या बदलीची मागणी केली होती. आता सचिन बोरसे यांची बदली करण्यात आली आहे.

### रब्बी हंगामात ६५ लाख हेक्टरवर पेरण्या

**पुणे**-राज्यातील यंदाच्या रब्बी हंगामात सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्रावर पिकांच्या पेरण्या अपेक्षित आहेत. सरासरी क्षेत्रापेक्षा सुमारे १० लाख हेक्टरने वाढण्याचा अंदाज आहे. बि-बियाने, खते आदी निविष्ठाच्या उपलब्धतेचे नियोजन कृषी विभागाने केले असून हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व प्रयत्न कृषी विभागाकडून सुरु असल्याची माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यात यंदा अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे निश्चित प्रकारे शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला. खते आणि बियाण्यांच्या बाबतीमध्ये आम्ही नियोजन केले आहे. युरिया खताची टंचाई जरी असली तरी केंद्र सरकारशी बोलून युरियाचे टंचाई दूर करण्याबाबत निर्णय केला जाईल.अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारच्यावतीने मदत दिली जात आहे. अजूनही पंचनामे करण्याचे काम सुरू आहे. हे साधारणतः सात ते आठ जिल्ह्यातील नुकसानीचे पंचनाम्याचे काम पूर्ण झाले आहे आणि उर्वरित जिल्ह्याचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात काम सुरू आहे. केंद्र सरकारला नुकसानीचा अहवाल द्यायचा आहे तो बिनचूक गेला पाहिजे. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर तो अहवाल केंद्राकडे जाईल. सध्या ही नुकसान भरपाई दोन हेक्टरपर्यंत होती. आता ती आपण तीन हेक्टरपर्यंत देत आहोत. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

# ...तोपर्यंत सरकारला सोडणार नाही- उद्धव ठाकरे

**मुंबई**-महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी काही दिवसांपूर्वी जवळपास ३१ हजार ६२८ कोटींचं पॅकेज जाहीर केलं आहे. मात्र, सरकारने पॅकेज जाहीर करूनही अद्याप शेतकऱ्यांना पैसे मिळाले नसल्याचा आरोप विरोधक करत आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत सरकारने अद्याप कोणताही निर्णय न घेतल्याने विरोधक आक्रमक होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

या संदर्भात बोलताना आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील महायुती सरकारला मोठा इशारा दिला आहे. 'शेतकऱ्यांची कर्जमाफी होईपर्यंत राज्य सरकारला सोडणार नाही', असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. तसेच सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. उद्धव ठाकरे हे मातोश्री या त्यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना म्हणाले आहेत.'आज दिवाळीचा पहिला दिवस आहे. दिवाळीच्या शुभेच्छा देत असताना मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात मला आपत्तीग्रस्त शेतकरी दिसत आहे. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या मागे दुसरे कोणी असो किंवा नसो पण शिवसेना (ठाकरे) त्यांच्याबरोबर कायम असेल. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना कायम शेतकऱ्यांबरोबर राहिल हा शब्द मी याआधी देखील दिलेला आहे', असं उद्धव ठाकरे यांनी म्हटले. 'गेल्या ८ दिवसांपूर्वी मी काही ठिकाणी दौरा केला होता, तेव्हा मी मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शब्द दिला होता की जो पर्यंत कर्जमाफी होत नाही, तो पर्यंत या सरकारला आपण सोडायचं नाही. कारण सध्या राज्य सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करत आहे', अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे.'अतिवृष्टीत खरडून गेलेल्या शेतीला प्रतिहेक्टर तीन ते साडेतीन लाख सरकारने जरूर जाहीर केले, पण मी म्हटले होते की मदत हवी तर दिवाळीनंतर करा, पण त्यातील पहिले एक लाख रुपये



शेतकऱ्यांच्या खात्यावर दिवाळीच्या आधी टाका. शेतकऱ्यांचे कर्ज पूर्ण माफ करा, अशी आपली मागणी होती. मात्र, सरकारने तसे केलें नाही. आता दिवाळीनंतर मी मराठवाडा दौरा करणार आहे. आम्ही कधीही शेतकऱ्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाहीत', असं उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

# महायुती सरकारमुळे अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांची दिवाळी काळी
## वडेट्टीवारांचा आरोप

**नागपूर**-राज्य सरकारने शेतकऱ्यांना भरघोस मदत करणार असे सांगत ३१ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली. आज (दि.१७) दिवाळीला सुरुवात झाली. तरी प्रत्यक्षात मात्र १८०० कोटी पर्यंतच्या मदतीचे जीआर आले आहेत. राज्य सरकारने केवळ हेक्टरी १० हजार रुपये मदत दिली. ही मदत तुटपुंजी असून ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे.सरकारमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची ही काळी दिवाळी ठरणार आहे; अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी बोलतांना केली.

राज्यातील २५३ तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर कालावधीत अतिवृष्टीमुळे नुकसान झाले. सरकारने दिवाळीपूर्वी मदत करू असे सांगितले पण जाहीर केलेली मदत तुटपुंजी आहे. पुरामुळे शेतीपिकांचे नुकसान, शेतजमीन खरडून जाणे, विहिरीचे नुकसान, घर पडली आहेत. २५३ तालुक्यांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. पण या तालुक्यांमधील शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मदत एनडीआरएफच्या निकषांप्रमाणेच आहे, त्यात जास्तीची मदत नाही. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरवडल्या आहेत त्यांना दिलेली मदत तीन वर्षात मिळणार आहे, तोपर्यंत शेतकरी कसा जगणार? त्यामुळे शेतकऱ्यांनी काळी दिवाळी साजरी करून सरकारचा निषेध करावा, असे आवाहन वडेट्टीवार यांनी केले.

कापूस खरेदीला अजूनही सीसीआयकडून परवानगी मिळालेली नाही. त्यासाठी टाकलेल्या अटी जाचक आहेत, त्यामुळे कापूस खरेदी करताना हात आखडता घेतला जाणार आहे, यामुळे शेतकरी बरबाद होऊन जाईल. अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिक गेले आहे त्यात मिळणारा भाव इतका कमी आहे



की शेतकरी उध्वस्त झाला आहे. सरकारने शेतकऱ्यांचा हा छळ करू नये अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. मराठवाड्यात आज ओबीसी समाजाचा मोर्चा निघत आहे, यावर बोलताना काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी या मोर्चाला शुभेच्छा दिल्या आहेत. बीडमध्ये होणाऱ्या मोर्चात सरकार मधील दोन मंत्री आणि धनंजय मुंडे, गोपीचंद पडळकरसारखे पॉवरफुल आमदार उपस्थित राहणार आहे. त्यामुळे इतका मोठा मोर्चा झाल्यावर २ सप्टेंबरचा काळा जीआर रद्द झालाच पाहिजे. हा जीआर सरकारने काढला आहे त्यामुळे तो रद्द करण्याची जबाबदारी या मंत्र्यांवर येते.

# धनत्रयोदशीच्या पूर्वसंध्येला शेअर बाजारात 'दिवाळी'

**मुंबई**-दिवाळीच्या शुभसंकेतासह बाजारातील जबरदस्त सकारात्मकतेमुळे शेअर बाजारात आज वाढ झाली आहे. अखेरच्या सत्रात गुंतवणूकदारांनी राखलेल्या खरेदीसह परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी गुंतवणूक वाढवल्यामुळे आज इक्विटी बेंचमा र्क निर्देशांकात वाढ झाली. सेन्सेक्स ४८४.५३ अंकाने उसळत ८३९५२.१९ पातळीवर स्थिरावला आहे तर निफ्टी १२४.५५ अंकांने उसळत २५७०९ पातळीवर स्थिरावला आहे. आज विशेषतः सकाळच्या घसरणीतील संकेतानंतर बँक निफ्टीने ५७६३१.५० या विक्र मी पातळी गाठल्याने गुंतवणूकदारांनी बँक समभागात मोठा प्रतिसाद दिल्याने शेअर बाजारात रॅली होण्यास मदत झाली आहे. याशिवाय क्षेत्रीय निर्देशांकातील एफएमसीजी (१.३७%), फार्मा (०.६८%), हेल्थकेअर (०.७६%),ऑटो (०.६६%) या शेअर्स मध्ये झालेल्या वाढीमुळे बाजाराथ तेजी मिळवण्यास मदत झाली. दरम्यान मिडिया (१.५६%), आयटी (१.६३%), पीएसयु बँक (०.६५%), मिड स्मॉल आयटी टेलिकॉम (१.१८%) समभागात घसरण कायम राहिली.कालच्या



संमिश्र जागतिक कौलानंतर आजही संमिश्रित कल अखेरच्या सत्रात जागतिक स्तरावर सुरु होता. युएस बाजारातील सुरूवातीच्या कलात तिन्ही बाजारात घसरण सुरू असून आशियाई बाजारातील बहुतांश निर्देशांकात घसरण कायम आहे. निकेयी २२५ (१.५२%), तैवान वेटेड (१.२७%), जकार्ता कंपोझिट (२.६४%), शांघाई कंपोझिट (१.९९% निर्देशांकात झाली आहे. जागतिक अस्थिरतेत सोन्या चांदीच्या जागतिक पातळीवरील गुंतवणूकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने कमोडिटी दरपातळी महागली होती. क च्च्या तेलाच्या किमतीत मात्र घसरलेल्या मागणीमुळे घसरण झाली आहे. डॉलरच्या तुलनेत मात्र आज रूपयात २१ पैशाने वाढ झाली असल्याने परदेशी संस्थात्मक गुंतवणूक दारांनी आपली गुंतवणूक कायम राखली. भारतीय गुंतवणूकदारांनी आगामी तिमाही नि कालादरम्यान सावधगिरी बाळगली आहे.

# गणेश नाईक कसलेले पैलवान, तेच विजयी ठरतील!
## पालघरमध्ये संजय राऊत यांचा दावा

**बोईसर**-गणेश नाईक हे कसलेले पैलवान असून अंतिम तेच विजयी ठरतील. गणेश नाईक यांनी कधी संयम सोडला नाही असा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी भाजपचे नेते व राज्याचे वनमंत्री गणेश नाईक आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सुरू असलेल्या शीतयुद्धाविषयी बोलताना केला.

संजय राऊत हे शिवसेनेच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी पालघर येथे आले होते. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री



एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली. पालघर मध्ये येणारे अनेक प्रकल्प हे नरेंद्र मोदी, अमित शहा आणि अदानीच्या फायद्यासाठी आहेत असा आरोप राऊत यांनी केला. दिवाळी निमित्त शिवाजी पार्कमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना दरवर्षी दीपोत्सवाचे आयोजन करत असते. यावर्षी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या दीपोत्सवाचे उद्घाटन होणार असून ही हे महाराष्ट्राचे राजकारणातील मोठी घडामोड व शिवसेना मनसे युती संदर्भातील प्रगतीची झेप असल्याचे संजय राऊत यांनी सांगितले. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे इथे बद्दल आज संध्याकाळी समजेल असे राऊत म्हणाले. पालघर जिल्ह्यात वाढवण, मुरबे येथे बंदर व केवळ येथे रिलायन्स प्रकल्प येत असल्याबद्दल विचारले असता भूमिपुत्रांच्या छाताडवर हे प्रकल्प लादले जात असल्याचे सांगत या प्रकल्पांमध्ये मोदी शहा यांची वैयक्तिक गुंतवणूक असल्याचे आरोप खासदार संजय राऊत यांनी केले. नुकसान भरपाई च्या नावाखाली नागरिकांची फसवणूक केली जात असून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाची झालेली दूरदशा याबाबत त्यांनी टीका केली.

# पोस्ट ऑफिसमधून काढता येणार रेल्वे तिकीट
## देशभरात ३३३ टपाल कार्यालयांमध्ये बुकिंग सुविधा

**मुंबई**-ग्रामीण आणि निमशहरी भागातील लोक आपल्या जवळच्या पोस्ट ऑफिसमधून रेल्वेचे तिकीट काढू शकतात. जिथे रेल्वे स्टेशन दूर आहे किंवा ऑनलाईन बुकिंगला मर्यादा आहे, तिथे नवी सुविधा उपयुक्त ठरेल. दिवाळी किंवा छटपूजा यांसारख्या उत्सवांत प्रवास करणाऱ्यांसाठी रेल्वेने ही गुड न्यूज दिली आहे. टपाल खात्याने देशभरातील ३३३ पोस्ट खात्यांमध्ये पीआरएस टर्मिनल लावून तिकीट बुकिंगची सुविधा सुरू केली आहे. यामध्ये जनरल, स्लीपर, एसी अशा सर्व



प्रकारच्या रेल्वे तिकिटांचे बुकिंग करता येईल. 'रेल्वे-तिकीट-पोस्ट-ऑफिस' या नवीन प्रणालीअंतर्गत, प्रवासी स्लीपर, एसी आणि जनरलसह सर्व वर्गांसाठी तिकिटे बुक करू शकतात. ही योजना प्रवाशांसाठी मोठी दिलासा देणारी ठरेल, ज्यांना आता तिकिटे बुक करण्यासाठी शहरांमध्ये किंवा रेल्वे काऊंटरवर जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## नक्षलवादमुक्त पाऊल

**भा**रत संपूर्णपणे दहशतवादमुक्त करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली असून देशभरातून नक्षलवादाचे जलदगतीने उच्चाटन होत आहे.३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद संपेल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वारंवार व्यक्त केला आहे. नक्षलवादाने सर्वाधिक प्रभावित असलेल्या जिल्ह्यांची संख्या सहावरून तीनवर आली, तर काही प्रमाणात नक्षलवाद असलेल्या जिल्ह्यांची संख्या १८ वरून ११ पर्यंत कमी झाली. देश दहशतवादमुक्त करण्याकरीता व देशाचा जलदगतीने विकास करण्यासाठी आदिवासीबहुल भागांतही पायाभूत सुविधा निर्माण करून उद्योगधंद्यांचे जाळे विणावे लागणार आहे. या मार्गात सुरुंग पेरण्याचे काम नक्षलवादी करतात. म्हणून त्यांचा बीमोड होणे अत्यावश्यकच आहे. गेली ४५ वर्षे नक्षल चळवळीत सदस्य ते पॉलिट ब्युरो समिती सदस्य या पदापर्यंत मजल मारणारा जहाल नक्षल नेता मल्लोजुला वेणुगोपाल ऊर्फ भूपती ऊर्फ सोनू याने अखेर आपल्या ६० सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण केल्यामुळे महाराष्ट्रानेदेखील नक्षलवादमुक्त भारताच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकले आहे. भूपती हा प्रभावशाली रणनीतिकार मानला जातो.कित्येक वर्षे तो महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील नक्षली प्लाटूनचा मार्गदर्शक होता. त्याने कैक हल्ले घडवले. गेली अनेक वर्षे नक्षलवाद्यांनी शेकडो पोलिस, सीआरपीएफचे जवान, राजकीय नेत्यांना ठार मारले. असंख्य सामान्य नागरिकांना त्यांच्यामुळे जीव गमवावा लागला. पोलिसांबरोबरच्या चकमकीत महासचिव बसवराजच्या मृत्यूनंतर भूपती आणि संघटनेच्या अन्य नेत्यांमधील मतभेद तीव्र झाले होते. भूपतीने सशस्त्र संघर्ष निष्फळ ठरल्याचे मान्य करून, शस्त्रसंधी स्वीकारण्याचे आवाहन केले होते. संघटनेतून अन्य काही नेत्यांचा या भूमिकेस विरोध आहे. या गटाने संघटनेचा महासचिव थिप्पारी तिरुपती ऊर्फ देवजीच्या नेतृत्वाखाली लढा सुरू ठेवण्याची भूमिका घेतली व केंद्रीय समितीने भूपतीला शस्त्रे खाली ठेवण्याचे आदेश दिले.यानंतर भूपतीने संघटनेतून बाहेर पडत असल्याचे जाहीर केले. गेल्या जानेवारीतच भूपतीची पत्नी तारक्का हिने आत्मसमर्पण केले होते. १५ वर्षांपूर्वी भूपतीचा ज्येष्ठ बंधू व नक्षल चळवळीतील प्रमुख नेता किशनजी पोलिसांच्या चकमकीत ठार झाला होता. दंडकारण्यात गेल्या चार दशकांपासून हिंसक कारवाया करणाऱ्या नक्षल चळवळीचा अंतिम प्रवास सुरू झाल्याचे संकेत भूपतीच्या निर्णयावरून दिसत आहेत. गडचिरोली जिल्ह्यात गेल्या दोन दशकांत ७०० पेक्षा जास्त नक्षल्यांनी आत्मसमर्पण केले. छत्तीसगडमध्ये सुकमा आणि कांकेर जिल्ह्यांत तब्बल ७७ नक्षलवाद्यांनी बुधवारी आत्मसमर्पण केले. भूपतीसह अनेकजणांचे आत्मसमर्पण हे दंडकारण्यातील हिंसक चळवळीच्या अंताच्या दिशेने पडलेले महत्त्वाचे पाऊल आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल राज्य सरकारने गडचिरोली पोलिस दलाला एक कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले.मुख्यमंत्र्यांनी नक्षल्यांच्या हाती भारतीय संविधान देऊन त्यांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणले आहे. आजघडीला गडचिरोलीत प्रचंड औद्योगिक गुंतवणूक होत असून, ती आता भारतातील एक पोलादनगरी म्हणून उदयास येत आहे. या उद्योगधंद्यामध्ये स्थानिक तरुण-तरुणींना प्राधान्य दिले जाणार आहे. इतके दिवस बेरोजगार युवावर्गाला फितवून हाती शस्त्र घेण्यास भाग पाडले जात होते. आता व्यवसाय-उद्योगांची भरभराट होणार असून, त्यामुळे हिंसात्मक मार्गाकडे कुणी जाणार नाही, अशी अपेक्षा आहे.वर्षानुवर्षांच्या गरिबीमुळे आणि विकासाच्या मुख्य धारेत आणले न गेल्याने लोक हातात बंदुका घेत होते. आता ग्रामीण व आदिवासी भाग नक्षलमुक्त होत असून, यापुढे खरी लढाई शहरी नक्षलवाद्यांविरुद्ध आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे. ही लढाई शस्त्रांनी नव्हे, तर संविधानानेच जिंकायची आहे, अशीही टिपणी त्यांनी केली. शहरी नक्षलवाद्यांच्या कृत्यांची गंभीर दखल अजून सुशिक्षितांनीही घेतलेली नाही. सरकार, तसेच घटनात्मक संस्थांविषयी आणि एकूणच लोकशाहीविरुद्ध असंतोष निर्माण करणे हे शहरी नक्षलवादाचे मुख्य उद्दिष्ट असते. प्राध्यापक, बुद्धिवादी आणि लेखकवर्गात या मंडळींनी शिरकाव करून घेतला आहे.काहीजण एनजीओच्या बुरख्याखाली वावरत असतात, तर काहीजण सांस्कृतिक मंचाच्या नावाखाली तरुणांची मने भडकावत असतात. काही वर्षांपूर्वी पुणे जिल्ह्यातील कोरेगाव-भीमा लढाईच्या २०० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमावेळी उपस्थितांवर अचानक दगडफेक सुरू झाली. हा प्रकार करून चेहरा झाकलेली मंडळी कुठे पळाली, हे कळालेच नाही. मात्र, या कृत्याद्वारे त्यांनी समाजाच्या दोन घटकांमध्ये काडी लावण्याचे काम केले. शहरी नक्षलवाद हा शब्दप्रयोग प्रथम भाजपप्रणीत एनडीए सरकारने नव्हे, तर काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारचे तत्कालीन गृहमंत्री पी. चिदम्बरम यांनी वापरला होता. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मध्यंतरी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेला मोठा प्रतिसाद मिळाला. पण, त्यांच्या यात्रेत सहभागी झालेल्या १९० पैकी ४० संघटना शहरी नक्षलवाद्यांशी संबंधित होत्या, असा आरोप झाला. दुर्गम भागातील आदिवासींच्या मनात आम्ही स्वतंत्र आहोत, सरकारने आमच्या भागात येऊच नये, अशाप्रकारची भावना या संघटनांनी जाणीवपूर्वक निर्माण केल्याचे सांगितले जाते.आदिवासींनी विकासाच्या वाटेवर येऊच नये, यासाठीची ही युक्ती होती, असेही सांगतात. २०१२-१३ मध्ये महाराष्ट्राचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी राज्यातील ४८ नक्षलवादी संघटनांची यादी जाहीर केली होती. त्याच काळात नक्षलवाद्यांच्या अग्रणी संघटना, म्हणजेच शहरी नक्षलवादी संघटना असे म्हटले जाऊ लागले. शहरी नक्षलवाद्यांचे पुण्यात प्रशिक्षण झाले होते, असा गौप्यस्फोट आर. आर. पाटील यांनी विधानसभेतच केला होता. पंढरपूरकडे निघालेल्या वारीमध्येदेखील शहरी नक्षलवादी घुसल्याचे आरोप काही वारकरी संघटनांनी केले आहेत. या शहरी नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठीच राज्य सरकारकडून जनसुरक्षा विधेयक आणण्यात आले असून, त्याबद्दल मुद्दामच गैरसमज पसरवण्याचे उपद्व्याप केले जात आहेत. तरुणाईची माथी बिघडवून त्यांच्याद्वारे हिंसक कृत्ये घडवण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप आहे. त्याचा बंदोबस्त करण्याचे मोठे आव्हान आहे.

# ऊसतोडीची ‘उचल’ लवकरच कायद्याच्या चौकटीत?

**येत्या हिवाळी अधिवेशनात ऊसतोड मजुरांसाठीच्या कायद्याचे विधेयक विधानसभेत मांडले जाण्याची शक्यता आहे. त्यानिमित्त संख्येने मोठ्या आणि ‘उचली’च्या चक्रात पिचणाऱ्या समूहाच्या प्रश्नांचा वेध...**

**सा**खर उद्योग हा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र या उद्योगाचा पाया असलेला ऊसतोड मजूर मात्र कायमच दुर्लक्षित राहिला आहे. सरकारकडून ऊसतोड मजुरांसाठी स्वतंत्र कायद्याचा मसुदा तयार करून तो येत्या हिवाळी अधिवेशनात मांडला जाण्याची शक्यता आहे. या कायद्याच्या माध्यमातून ऊसतोड मजुरांना आरोग्य, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण प्रदान करण्याबरोबरच ऊस वाहतूकदार, मुकादम व साखर कारखान्यांच्या होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला आळा घालण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करेल, असे दिसते.

ऊसतोड मजुरांचे प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे आणि विविध स्वरूपाचे असले तरी त्यांच्या मुळाशी या व्यवसायामध्ये रूढ असलेली ‘उचल’ हीच प्रमुख समस्या आहे. महाराष्ट्रात ऊसतोडणीचा हंगाम साधारणपणे दसऱ्याच्या सणापासून ते अक्षय तृतीयेपर्यंत असतो. त्याच्या तीन महिने आधीच म्हणजेच श्रावणापासूनच मजुरांना उचल दिली जाते. ती येणाऱ्या हंगामात ऊस तोडून फेडावी लागते. गरिबांना अनेकदा उचल घेण्याशिवाय पर्याय नसतो. सर्वाधिक ऊसतोड मजूर पुरविणाऱ्या बीड जिल्ह्याची ‘जिल्हा मध्यवर्ती बँक’ बुडणे आणि असंख्य मजुरांना ‘उचल’ घेऊन कोयता हातात घेण्यास भाग पडणे, हा योगायोग नसून या व्यवस्थेतील विसंगतीचे प्रतीक आहे.

साखर उद्योग हा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र या उद्योगाचा पाया असलेला ऊसतोड मजूर मात्र कायमच दुर्लक्षित राहिला आहे. सरकारकडून ऊसतोड मजुरांसाठी स्वतंत्र कायद्याचा मसुदा तयार करून तो येत्या हिवाळी अधिवेशनात मांडला जाण्याची शक्यता आहे. या कायद्याच्या माध्यमातून ऊसतोड मजुरांना आरोग्य, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण प्रदान करण्याबरोबरच ऊस वाहतूकदार, मुकादम व साखर कारखान्यांच्या होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला आळा घालण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करेल, असे दिसते.

ऊसतोड मजुरांचे प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे आणि विविध स्वरूपाचे असले तरी त्यांच्या मुळाशी या व्यवसायामध्ये रूढ असलेली ‘उचल’ हीच प्रमुख समस्या आहे. महाराष्ट्रात ऊसतोडणीचा हंगाम साधारणपणे दसऱ्याच्या सणापासून ते अक्षय तृतीयेपर्यंत असतो. त्याच्या तीन महिने आधीच म्हणजेच श्रावणापासूनच मजुरांना उचल दिली जाते. ती येणाऱ्या हंगामात ऊस तोडून फेडावी लागते. गरिबांना अनेकदा उचल घेण्याशिवाय पर्याय नसतो. सर्वाधिक ऊसतोड मजूर पुरविणाऱ्या बीड जिल्ह्याची ‘जिल्हा मध्यवर्ती बँक’ बुडणे आणि असंख्य मजुरांना ‘उचल’ घेऊन कोयता हातात घेण्यास भाग पडणे, हा योगायोग नसून या व्यवस्थेतील विसंगतीचे प्रतीक आहे.

ऊसतोड मजुरांचे अगदी सुरुवातीच्या काळातील हंगामी स्थलांतर हे पाथर्डी, आष्टी, पाटोदा, शिरूर या डोंगराळ व दुष्काळी तालुक्यांमधून पश्चिम महाराष्ट्रातील काही साखर कारखान्यांकडे होत असे. या भागातील निवडक अल्पभूधारक शेतकरी कुटुंबांचा जगण्याचा आणि जनावरे जागविण्याचा ऊसतोड हा केवळ जोडधंदा होता. परंतु अलीकडील काळात राज्यात वाढत असलेले उसाचे क्षेत्र, साखर कारखान्यांची वाढलेली संख्या यामुळे ऊसतोडणी मजुरांची मागणी जास्त आहे. संपूर्ण मराठवाडा, विदर्भातील काही जिल्हे, उत्तर महाराष्ट्रातील मोठा भाग ऊस तोडणीसाठी उचल घेत आहे. मुकादमाकडून घेतलेली उचल फेडण्यासाठी त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, पहाटेपासूनच मेहनत करावी लागते. मजूर जोडप्यांना दिवसभरात सरासरी तीन ते साडेतीन टन ऊसतोड करावी लागते तरीही दिवसाला जास्तीत जास्त ७५० रुपये पदरात पडतात. ऊसतोडणीचा ‘सिझन’ कमीतकमी १४० दिवस चालला पाहिजे परंतु असे होत नाही. गत वर्षी तर केवळ ८३ दिवसच ‘सिझन’ झाला. यामुळे मागील हंगामातील थकबाकी आणि पुढच्या हंगामातील देण्यात येणारी उचल यामुळे मजूर कायमस्वरूपी कर्जाच्या जाळ्यात अडकतात. कोणी रोखीने सर्व उचल फेडून या चक्रातून बाहेर पडू इच्छित असेल, तर मुकादम दरमहा ५ ते १० टक्के व्याज दराने परतफेड करण्यास सांगतात, जे की बहुतांश मजुरांना शक्य होत नाही. परिणामी, ऊसतोडीच्या दुष्टचक्रातून बाहेर पडता येत नाही व वेठबिगारीचे जीवन जगावे लागते. यात कधी मुकादम तर कधी मजूर भरडले जातात. मात्र या सर्व प्रकारात एकट्या मजुराला, मुकादमाला किंवा साखर कारखान्यांना सरसकटपणे दोषी धरता येणार नाही. उलट, ही व्यवस्था सरकारच्या हस्तक्षेपाने आणि स्वतंत्र कायद्याद्वारे सुधारण्याची गरज आहे.

साखर कारखाने दरवर्षी उचलीपोटी कोट्यवधी रुपयांची रक्कम संबंधित ट्रस्टना देतात. हे ट्रस्ट अप्रत्यक्षरीत्या कारखान्यांच्या माध्यमातूनच स्थापन केलेले असतात. पुढे, कारखान्यांकडून मिळालेली रक्कम, या ‘ट्रस्ट’द्वारे ट्रक किंवा ट्रॅक्टर वाहतूकदारांना दिली जाते. ते मुकादमांना आणि मुकादम ऊसतोडणी मजुरांना उचलीच्या स्वरूपात पैसे पुरवतात. या प्रक्रियेत प्रत्येक टप्प्यावर तोंडी किंवा लिखित करार केले जातात. पण, ते कायदेशीर दृष्टिकोनातून किती परिपूर्ण आणि न्याय्य असतात याबद्दल शंका आहे. कारण उचलीची परतफेड होत नाही किंवा मजूर कामावर येत नाहीत तेव्हा करारपत्रांचा आधार घेऊन, कायदेशीर कार्यवाही न होता, बेकायदेशीरपणे वसुली केली जाते. धमकी, मारहाण, डांबून ठेवणे, अपहरण इत्यादी बेकायदेशीर बाबी केल्या जातात. या सगळ्यामुळे प्रचलित उचल पद्धत तातडीने कायद्याच्या कक्षेत आणणे गरजेचे आहे.



आपण मुकादमाकडून उचल घेतली आहे, तर त्याचे पैसे फेडावेच लागतील’ अशी नैतिकता बाळगणारे असंख्य ऊसतोड मजूर आहेत. मात्र याच्या उलट, उचल घेऊनही कामावर न येणारे, हंगाम अर्ध्यात सोडून पळून जाणारे किंवा फसवणूक करणारे मजूरही दिसून येतात. त्यांची झळ साखर कारखाना, वाहतूकदार, मुकादम आणि खुद्द प्रामाणिक मजूर या सर्वांनाच बसते. असे मजूर एकाच वेळी दोन-तीन मुकादमांकडून ‘उचल’ घेतात. परंतु ऊसतोडीसाठी मात्र एकाच मुकादमाबरोबर जावे लागते. परिणामी मजुरांच्या पळवापळवीच्या घटना घडतात. दोन मुकादमांमध्ये संघर्ष होतो. कधीकधी गावपातळीवरील स्थानिक राजकारण, आपापसातील कुरघोड्या यातून मोठा संघर्ष निर्माण होतो. अशा परिस्थितीत मुकादमांकडून साखर कारखान्याला करारानुसार तेवढ्या संख्येने मजूर पुरविले जात नाहीत; परिणामी साखर कारखाने, ऊस वाहतूकदार, मुकादम आणि ऊस उत्पादक शेतकरी यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक तोटा सहन करावा लागतो. अशा घटना रोखण्यासाठी मजूर आणि त्यांचे मुकादम यांचे नोंदणीकरण तसेच ऊसतोडणीचे करार हे ‘ऑनलाइन पोर्टल’च्या माध्यमातून संबंधित तालुक्याच्या शासकीय कार्यालयात करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया बायोमेट्रिक व आधार-लिंक्ड प्रणालीद्वारे होणे बंधनकारक करावे, जेणेकरून मजूर एकाच मुकादमाशी व एकाच कारखान्याशी करार करू शकतील. या शिवाय बायोमेट्रिक कराराच्या वेळी पती, पत्नी या दोघांचीही एकत्रित उपस्थिती आणि नोंद बंधनकारक करण्यात यावी. कराराच्या वेळी दिली जाणारी उचलीची रक्कम थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य असावे. त्यामुळे व्यवहारात पारदर्शकता येईल. उचल कायद्याच्या कक्षेत व सरकारी नियंत्रणाखाली येईल.

त्याचप्रमाणे असा करार केवळ ऊसतोड मजूर व मुकादम यांच्यामध्ये मर्यादित न राहता, साखर कारखान्यालाही करारातील आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करणे बंधनकारक करण्यात यावे. मजूर-मुकादम-कारखाना या तिन्ही घटकांना एकत्र घेऊन केलेले त्रिपक्षीय करार कायदेशीरदृष्ट्या अधिक परिपूर्ण ठरतील. असे केल्याने कारखान्यांची जबाबदारी अधोरेखित होईल आणि मजुरांचे कायदेशीर, सामाजिक व आर्थिक हक्क अधिक बळकट व सुरक्षित होतील. याशिवाय, प्रायोगिक तत्त्वावर काही कारखान्यांकडून काही मजुरांना पारंपरिक ‘उचल’ पद्धतीऐवजी दरमहा किंवा दर पंधरवड्याला वेतन रूपात मजुरी देण्याची व्यवस्था निर्माण करावी. हे वेतन विद्यमान मजुरीपेक्षा अधिक असावे किंवा इतर प्रोत्साहनपर लाभ द्यावेत, ज्यायोगे उचल पद्धतीला पर्याय निर्माण होतील. उचल आणि उचलीची परतफेड यातून निर्माण झालेले शोषण आणि वेठबिगारी संपुष्टात येईल.

बहुतांश ऊसतोड मजूर हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल, पारंपरिकदृष्ट्या मागासलेल्या आणि शेतमजुरीवर अवलंबून असलेल्या वंचित जातींमधून येतात. त्यामुळे त्यांना जमिनीची मालकी, आर्थिक स्थैर्य किंवा शैक्षणिक संधी मिळत नाहीत. अलीकडील काळात धुळे, नंदुरबार जिल्ह्यांतील सीमावर्ती भागातून येणारा आदिवासी मजूर, ऊसतोडीच्या कामात अगदीच नवखा आहे. त्यांना आर्थिक व्यवहार फारसा समजत नाही. म्हणून अतिशय कमी उचल देऊन त्यांना आणले जाते. या आदिवासींसह सर्वच ऊसतोड मजुरांचे श्रम पुरेशा सोयीसुविधा न देता स्वस्त दरात खरेदी केले जातात. यात वर्गीय विषमता ठळकपणे दिसते. स्त्रियांची स्थिती आणखी बिकट आहे. आर्थिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग जवळजवळ शून्य असतो. शिवाय लैंगिक आणि मानसिक छळालाही त्या बळी पडतात. कौटुंबिक हिंसाचार, आरोग्याच्या समस्या, मुलांचे संगोपन, घरगुती जबाबदाऱ्या आणि त्यासोबत ऊसतोडीचे कष्टप्रद काम, याचा अधिकचा ताण स्त्री म्हणून तिच्या वाट्याला येत असतो. अशाप्रकारे जातीय संरचना, वर्गीय विषमता आणि पितृसत्ताक व्यवस्था लक्षात घेऊन धोरणात्मक हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. त्यांच्या हक्कांचे संरक्षण, सुरक्षित कामाची हमी, आरोग्य-शिक्षण सुविधा आणि स्त्री-पुरुष समानतेसाठी ठोस कायदेशीर उपाय आवश्यक आहेत. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकास बहाल केलेला सामाजिक न्याय, श्रमाची प्रतिष्ठा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार शाबूत राखणे ही या व्यवसायात मोठ्या संख्येने असणाऱ्या दलित, आदिवासी, भटके, महिला आणि कष्टकरी समुदायाची मूलभूत गरज आहे. अशाप्रकारे ऊसतोड मजुरांसाठी स्वतंत्र कायदा तयार करत असताना अनेक बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. त्याची व्याप्ती सर्वसमावेशक असली पाहिजे. त्याकरिता कायदा निर्मितीच्या प्रक्रियेत ऊसतोड मजूर, त्यांच्या संघटना, संशोधक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांचा सक्रिय सहभाग असणे अत्यावश्यक आहे.

**डॉ. निशिकांत वारभुवन**

## लक्ष्मीपूजन

लक्ष्मीपूजन ही भारतीय संस्कृतीतील एक वैशिष्ट्यपूर्ण पूजा आहे. ही पूजा अश्विन महिन्यातील अमावस्येला, संध्याकाळी केली जाते.शास्त्रानुसार, जेव्हा उपासक लक्ष्मीपूजन करतो, तेव्हा त्या पूजेतून लक्ष्मीचे तत्त्व उपासकाकडे प्रक्षेपित होते. हे तत्त्व आपण सतत साधनेच्या रूपात अंगीकारले, तर लक्ष्मी आपल्या सोबत राहते. परंतु उपासकाच्या मनात ‘अहं’ निर्माण झाला, तर ती लक्ष्मी निघून जाते.खऱ्या अर्थाने लक्ष्मीपूजनाचा आनंद घ्यायचा असेल, तर आपण लक्ष्मीचे तत्त्व असलेल्या प्रत्येक गोष्टीत तिचे रूप पाहून त्याचा योग्य उपयोग करायला हवा.जल हे लक्ष्मीला अतिशय प्रिय आहे, कारण ती समुद्राची कन्या आहे. समुद्रमंथनातून लक्ष्मी प्रकट झाली. त्यामुळे दैनंदिन जीवनात आपण वापरत असलेले जल योग्य पद्धतीने वापरले, तर लक्ष्मी स्थिर राहते.

धनलक्ष्मी-आपण लक्ष्मीला धनाची देवी मानतो. म्हणून धनाचा योग्य विनियोग करून, दानधर्म करणे, तसेच सत्पात्राला दान देणे हे आवश्यक आहे. यामुळे लक्ष्मी स्थिर राहते.धान्य म्हणजेच लक्ष्मी. अन्नाचीही ती देवता आहे, जिची आपण ‘अन्नपूर्णा’ म्हणून पूजा करतो. अन्न वाया न घालवता, आवश्यक तेवढाच उपयोग केल्यास लक्ष्मी प्रसन्न राहते आणि आपल्या घरी स्थिर होते.

लक्ष्मीपूजन दिव्याच्या प्रकाशात केले जाते. दिवा पाहून लक्ष्मी येते असे मानले जाते. दिवा म्हणजे प्रकाश . आजच्या काळात हा प्रकाश म्हणजे वीज. आपण वीज योग्य प्रकारे वापरली, तरही लक्ष्मी आपल्या घरात स्थिर राहते.‘दिवाळी’ म्हणून एका दिवसापुरता खर्च करून मिळणारा आनंद क्षणिक असतो; पण लक्ष्मीपूजनाचा खरा आनंद रोज लक्ष्मीचे स्मरण ठेवून योग्य कृती करण्यात आहे.

**रमा देशमुख**

## दिवाळीचा उत्साह अभूतपूर्व

यंदा देशाच्या काही राज्यांसह महाराष्ट्रात ढगफुटीसारख्या पावसाने सर्वत्र हजेरी लावत शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले.हातातोंडाशी आलेली पिके नष्ट झाली तर रौद्ररुप धारण करुन अनेक नद्यांना महापूर आणला.त्यामुळे नदीकाठची गावे उद्ध्वस्त झाली आहेत. काही ठिकाणी जिवीतहानी तर कुठे वित्तहानी झाली आहे. दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा या उक्तीप्रमाणे हा सण संपूर्ण विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा केला जातो. पण,यंदाची दिवाळी साधेपणाने साजरी करून जे लोक पूरग्रस्त आहेत त्यांना आर्थिक सहकार्य करुन नव्या संसारासाठी नवी दिशा देणे अपेक्षित आहे. आपापल्या परीने जे शक्य आहे ते साह्य करुन त्यांना आशेचा किरण दाखवावा म्हणजे खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे वाटेल.

**राजू जाधव**

## काँग्रेसचा आत्मघाती निर्णय

कर्नाटक राज्य मंत्रिमंडळाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन नियम बनवण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्याने राज्यातील राजकीय आणि वैचारिक वातावरण तापले आहे. या निर्णयानुसार, सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांवर किंवा शासकीय जागांवर आता प्रशासनाच्या परवानगीशिवाय पथसंचलन किंवा शाखा घेता येणार नाही. राज्याचे आयटी मंत्री आणि काँग्रेसचे नेते प्रियांक खर्गे खर्गे यांनी या निर्णयाची माहिती दिली.विशेष बाब म्हणजे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे हे सुपुत्र आहेत. यापूर्वीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्याची मागणी केली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही केवळ एक सामाजिक संघटना नसून तिची विशिष्ट राजकीय विचारधारा आहे. सरकारी शिक्षण संस्थांचे स्वरूप धर्मनिरपेक्ष आणि राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त असले पाहिजे. त्यामुळे या संस्थांमध्ये आरएसएसच्या कार्यक्रमांना परवानगी देणे म्हणजे शिक्षण प्रणालीचे ’भगवीकरण’ करणे आहे असे त्याचे मत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही निःसंशयपणे भारतातील सर्वात मोठी आणि प्रभावशाली हिंदुत्ववादी सांस्कृतिक संघटना आहे, जी राष्ट्र आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी समर्पित आहे. मात्र, काँग्रेस पक्षाने या हिंदुत्ववादी विचारधारेला नेहमीच तीव्र विरोध केला आहे.‘एकीकडे काँग्रेस देशभक्त संघटनेवर टीका करत आहे, तर दुसरीकडे त्यांचे काही नेते अप्रत्यक्षपणे हमाससारख्या दहशतवादी संघटनांच्या बाजूने उभे राहतात.’ काँग्रेसचा हा विरोधाभास ’राष्ट्रवादा’ऐवजी ’दहशतवाद’ आणि ’पाकिस्तान’ समर्थक धोरणांकडे झुकत असल्याचं दर्शवत आहेत. काँग्रेस पक्षाचा हा आर एस एस द्वेष इतका वाढला आहे की, ते देशासाठी कार्य करणाऱ्या एका राष्ट्रवादी संस्थेला विरोध करत आहोत, याचे भान ठेवत नाहीत.

जर सरकारने ही बंदी लागू करण्याचा किंवा नियम अत्यंत कठोर करण्याचा प्रयत्न केला, तर आरएसएस या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण, शांततापूर्ण मार्गाने संघटित होण्याचा आणि आपले विचार मांडण्याचा अधिकार भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिला आहे.विशेषतः, राजकीय दृष्ट्या काँग्रेस पक्षासाठी हा निर्णय ‘आत्मघाती’ ठरू शकतो. कारण, भारताच्या इतिहासात यापूर्वी ज्या ज्या वेळी काँग्रेस सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी लादली आहे (उदा. महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर, आणीबाणीच्या काळात), तेव्हा बंदी उठल्यानंतर आरएसएस अधिक वाढल्याचे आणि अधिक मजबूत झाल्याचे सर्वश्रृत आहे.कर्नाटक सरकार द्वारा घेतलेल्या निर्णयाला ‘विनाशकाले विपरीत बुद्धी’ङङचे लक्षण मानले जाईल.

**अविनाश देशपांडे**

## भारताची यशस्वी कामगिरी

संरक्षण उत्पादन सुमारे दहा वर्षांपूर्वी सुमारे ४६ हजार कोटीवरून आज एक लाख पन्नास हजार कोटीवर गेले आहे . या उत्पादनाबरोबरच निर्यातीत सुद्धा मोठी आघाडी आपण घेतली आहे .आज सुमारे २४-२५ मध्ये आपली निर्यात २२ हजार कोटीहून अधिक आहे.कोटीची निर्यात असून नजीकच्या काळात म्हणजे २०२९ पर्यंत ती ५० कोटीपर्यंत जाण्याची शक्यता आहे संरक्षण उत्पादन याच काळात सुमारे ३ लाख कोटी पर्यंत जाईल. संरक्षण उत्पादनात खाजगी क्षेत्राचा वाटा सुमारे ३३ हजार कोटी एवढा आहे या आकडेवारीवरून एक गोस्ट प्रामुख्याने नजरेसमोर येत आहे कि संरक्षण क्षेत्रात आपण मोठी आघाडी घेतली आहे . खाजगी उत्पादनाला वाव दिल्यामुळे देशातील कुशल कर्मचाऱ्यांना रोजगार मिळाला आहे . अनेकांना नवीन उद्योग काढण्याची प्रेरणा मिळाली आहे . सरकारने संरक्षणाचा विचार करताना संभाव्य धोक्याचा विचार केला आहे आज आपल्या समोर चीनच्या सतत सीमाप्रदेशात कुरबुरी आहेत . शेजारी पाकिस्तान दशहत वाद पसरवून मधून मधून कुरापतीद काढत आहे . त्यांचा विचार करून संरक्षणाचे धोरण ठरविले आहे . जगात अर्थव्यवस्थेत सुद्धा आपण प्रगती करत असून त्या बरोबर संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेचे धोरण राबविले जात आहे . पुण्यात गुरुवारी भारताचे संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरते कडे गतीचा उल्लेख केला आहे एकूणच भारताची संरक्षण क्षेत्रातील वाटचाल उल्लेखनीय आहे.

**शांताराम वाघ**

# सायबर पोलीस स्टेशनतर्फे तक्रारदारांना पंधरा लाख रुपये परत

## राष्ट्रीय सायबर गुन्हे रिपोर्टिंग पोर्टलद्वारे यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांना दिलासा

**जनमाध्यम प्रतिनिधी**




यवतमाळ - सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आर्थिक दिलासा मिळावा या उद्देशाने यवतमाळ जिल्हा पोलीस दलातर्फे सायबर पोलीस स्टेशनमार्फत आज एकूण पंधरा लाख रुपये तक्रारदारांना परत करण्यात आले.

हा कार्यक्रम विशेष पोलीस महानिरीक्षक रामानाथ पोकळे (अमरावती परिक्षेत्र) यांच्या हस्ते पार पडला. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, ASP पुसद बी. जे. हर्षवर्धन, ASP पांढरकवडा बन्सल, तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रीय सायबर गुन्हे रिपोर्टिंग पोर्टल (NCCRP) च्या माध्यमातून ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या तक्रारी नोंदविल्या जातात. या पोर्टलचा वापर 2019 पासून सुरू असून 2023 पासून तो प्रभावीपणे राबवला जात आहे. 2023 मध्ये 1055 तक्रारींची नोंद होऊन 39 लाख रुपये होल्ड करण्यात आले होते, तर 2024 मध्ये 1956 तक्रारींवर कारवाई करत 4 कोटी रुपये होल्ड करण्यात आले. चालू वर्ष 2025 मध्ये आतापर्यंत 1585 तक्रारी प्राप्त झाल्या असून 90 लाख रुपये होल्ड करण्यात आले आहेत. यातील 42 तक्रारदारांना आज 15 लाख रुपये परत देण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन पोलीस निरीक्षक श्रीमती यशोदरा मुनेश्वर व त्यांच्या सायबर टीमने केले. त्यांनी NCCRP पोर्टलद्वारे नोंदविलेल्या तक्रारींवर तत्परतेने काम करून ही रक्कम परत मिळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. रामानाथ पोकळे यांनी या प्रसंगी नागरिकांना आवाहन केले की "ऑनलाईन व्यवहार करताना सावधगिरी बाळगा, कोणत्याही संशयास्पद लिंक किंवा कॉलवर विश्वास ठेऊ नका. सायबर फसवणुकीचा बळी ठरलात तर त्वरित NCCRP पोर्टलवर तक्रार नोंदवा." होल्ड केलेली उर्वरित रक्कम कोर्टाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तक्रारदारांच्या स्वाधीन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस प्रशासनाने दिली.

## नितीन राठोड यांच्या अन्नत्याग, दफन कफन आंदोलनाला यश

# अखेर तिसऱ्या दिवशी आंदोलन मागे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी - पावसाच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यावर असंख्य मोठे संकट आले असून आज प्रत्येक शेतकरी हवालदिल झाला आहे पहिलेच शेतकऱ्यावरती कर्जाचे बोजे असताना त्यातच निसर्गाच्या अतिवृष्टीमुळे झालेला या प्रकोपामुळे शेतकऱ्यांचे मनोबल ढासळले आहे अशातच शेतकऱ्याच्या बाजूने शासनाने मदतीचा हात पुढे करावा त्यांचे मनोबल वाढवावे अशा वेळेस सरकारने शेतकऱ्यांसाठी तुटपुंजी मदत जाहीर करून जणू काही शेतकऱ्यांच्या जखमेवरती मीट चोळण्याचे काम केले आहे.

म्हणून शेतकऱ्यांना न्याय मिळावा शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी मौजा तिवसाळा तालुका घाटंजी जिल्हा यवतमाळ येथे वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष संघपाल कांबळे यांच्या नेतृत्वामध्ये दिनांक 14/ 10/ 2025 पासून अन्नत्याग करून दफन कफन आंदोलन तालुक्याचे महासचिव नितीन राठोड यांनी आंदोलन सुरू केले होते आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी घाटंजी तालुक्याचे तहसीलदार विजय साळवे साहेब यांनी आंदोलनाला भेट दिली सोबत कृषी अधिकारी रंजना बोबडे कृषी सहाय्यक कोपलवार मॅडम यांच्या समक्ष आदरणीय तहसीलदार विजय साळवे साहेब यांच्या विनंतीला मान देऊन व त्यांच्या आश्वासनाने वंचित बहुजन आघाडीचे महासचिव नितीनभाऊ राठोड यांनी अखेर तिसऱ्या दिवशी आंदोलन मागे घेतले यावेळी तहसीलदार साळवे साहेब यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना आपल्या शेतीची झालेल्या नुकसानाची संपूर्ण माहिती व त्यांच्या स्वतःच्या खात्याची माहिती ही आपापल्या गावच्या पटवाऱ्यांकडे तात्काळ सादर करा अशी सूचना तहसीलदारांनी दिली व त्यांनी सांगितले की जसे शासनाकडून मदत जाहीर झाली किंवा मदत आमच्यापर्यंत आली ती मदत तात्काळ आमच्या स्तरावरून 24 तासाच्या आत शेतकरी बांधवांच्या खात्यामध्ये टाकू किंवा त्यांना ती मदत पोहचवू असे आश्वासन इथल्या तहसीलदारांनी दिले. या आंदोलनामध्ये दिवसाला गावातील शेतकरी वर्ग वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी हितचिंतक यांच्यासहित आजूबाजूच्या गावातील नागरिकांचा व शेतकऱ्यांचा मोठा असा पाठिंबा या आंदोलनाला होता या आंदोलनामध्ये मनोज भाऊ मुनेश्वर, गणेश राठोड तंटामुक्ती अध्यक्ष, बाबुलाल महाराज,रामू राठोड, विनोद नाईक, दत्ता पळते, दत्ता मेसेकार,विठ्ठल पवार, सुरेश पवार, सुभाष राठोड, राजू महाराज, मनोज राठोड, उकंडा राठोड, रमेश लढे, आनंद देवतळे, राजू बनसोड, अशोक शेलुकार, अनिल लोहकरे, खुशाल सुरूकर, अरुण चव्हाण, वासुदेव राठोड, बंडूभाऊ गणेश राठोड,सुभाष पवार, प्रकाश राठोड, देविदास राठोड, किशोर अडकिने, नारायण चव्हाण, गजानन चव्हाण, गणेश चव्हाण, छगन राठोड, गणेश नाईक, बाळू पाटील वानखडे, राहुल मुनेश्वर,रतन चव्हाण, सदाशिव अविनाश चव्हाण, विलास चव्हाण,धनराज जाधव, शंकर राठोड,पुरुषोत्तम नारनवरे इत्यादी असंख्य कार्यकर्ते या आंदोलनामध्ये सहभागी होते.

## दारव्हा तालुक्यातील गौळपेंड येथील सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाला पोलीस दलाकडून आदर्श मंडळ पुरस्कार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



दारव्हा : जिल्हा पोलीस दलातर्फे ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत आयोजित आदर्श दुर्गा उत्सव मंडळ स्पर्धेत तालुक्यातील गौळपेंड येथील सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाची आदर्श मंडळ म्हणून निवड झाली आहे. या यशाबद्दल मंडळाला प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

नवदुर्गा उत्सव हा नवचैतन्याचा उत्सव मानला जातो. या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्हा पोलीस दलाने जिल्हास्तरावर आदर्श दुर्गा उत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत गोळपेड येथील सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळाने उत्कृष्ट कामगिरी करीत आदर्श मंडळाचा मान मिळवला. यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या वतीने मंडळाला प्रशस्तीपत्र प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाधिकारी श्री विकास मीना साहेब तसेच पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता व ज्ञानोबा देवकते साहेब वाहतूक पोलीस निरीक्षक यांनी मंडळाचे हार्दिक अभिनंदन केले. त्यांनी मंडळाच्या सामाजिक बांधिलकी आणि उत्सवाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल कौतुक केले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त करत यापुढेही सामाजिक उपक्रम आणि उत्सवाचे आदर्श आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला. या यशाबद्दल गौळपेंड येथील सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळावर सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# कारच्या धडकेत दुचाकीवरील महिला जागीच ठार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - समोरून भरधाव वेगात येणाऱ्या कारने एका दुचाकीवर जाणाऱ्या पती -पत्नी ला धडक दिल्याने ५० वर्षीय महिला जागीच ठार झाल्याची घटना आज सकाळी ८ वाजता दरम्यान नागपूर - तुळजापूर महामार्गावरील येथून जवळच असलेल्या चिल्ली गावाजवळ घडली.

अकिला बी . अमीर बेग मिर्झा ( ५० ) रा . सुकळी (ज ) ता . उमरखेड असे मृतक महिलेचे नाव असून तिचा पती अमीरबेग मिर्झा (५८ ) हा गंभीर जखमी झाला आहे.

आज सकाळी दोघे पती - पत्नी एम एच २६ एपि .०९०१ टिव्हिएस दुचाकीने नांदगव्हाण कडे जात असतांना समोरुन भरधाव वेगाने येणाऱ्या मारुती सुझुकी कार क्रमांक एम एच ३१ डिसी ५०३२ ने समोरा समोर जोरदार धडक दिली . या धडकेत दुचाकी ही डिवायडर वर फेकल्या गेल्याने दुचाकी वरील अकिला बी . यांना डोक्याला जबर मार लागला त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला तर तिचा पती अमीरबेग मिर्झा हा गंभीर जखमी झाला आहे.


घटनेची माहिती मिळताच उमरखेड पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा करून गंभीर जखमी व मृतक हिला उपजिल्हा रुग्णालयात आणले असून पूढील तपास ठाणेदार शंकर पांचाळ, पिएसआय मुंडे करित आहेत.

याप्रकरणी मृतकाचा मुलगा इब्राहिम बेग याने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# गुटखा सेवनाने तरुण होत आहे व्यसनाधीन

## पोलीस व अन्नऔषधी प्रशासनकुंभकर्णी झोपेत

**जनमाध्यम प्रतिनिधी**



दिग्रस : गुटखा विक्रीवरशासनाने बंदी केली असताना शहरव तालूक्यात राजरोसपणे ख़ुलेआमगुटखा विक्री सुरू आहे. कोठेही सहज गुटखा मिळतअसल्याने तरुण पिढी व्यसनाकड़ेवळत आहे. यावर अंकुश लावणारे पोलीसतसेच अन्न व औषधी प्रशासन विभाग याकड़े दुर्लक्ष करताना दिसत आहे. ग्रामीण भागात छोट्या व मोठ्याशहरात व तालुक्यातील दुकानदारांना गुटखा पुरविला जातो.ग्रामीण खेडेगावात सहज मिळत त्यांना पोलिसांची भिती नसल्याचेअसलेल्या गुटख्याच्या आकर्षणामुळे स्पष्ट होते. महिलासह अल्पवयीन मुले, मुलीविद्यार्थी गुटखा सेवनाच्या आहारीजात आहे.

मागील दिवसात उपविभागीयपोलीस अधिकारी यांनी लाखोंचागुटखा जप्त करून काही गुटखातस्करावर कारवाई केली होती. कारवाई करून एक दोन महिने होतनाही तर पुन्हा बंदी झुगारून मोठ्याप्रमाणात गुटखा विक्री खुलेआम सुरूआहे. शहरात काही होलसेल गुटखामाफियाकडून विक्रेत्यामार्फत व शहरासह तालुक्यातील लहानमोठे दुकानदार खुलेआम गुटख्याचीविक्री करताना दिसत आहे.

बंदीअसतानाही सर्रास गुटखा विक्रीकरणा्यांना पोलीस प्रशासनानेसंरक्षण तर दिले नाही ना, असा प्रश्नउपस्थित होत आहे. संबंधितविभागाच्या अधिकार्यांनी गुटखाविक्री लक्ष घालून कड़क कारवाईकरावी, अशी मागणी पालक वविद्यार्थीमधून होत आहे.

# शासकीय निरीक्षणगृह बालगृह मुलांचे नवीन इमारतीत स्थलांतर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था, पुणे अंतर्गत कार्यरत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यवतमाळ यांच्या शासकीय निरीक्षण गृह व बालगृह (मुलांचे), यवतमाळ यांचे कार्यालय नवीन प्रशस्त इमारतीत स्थलांतरित करण्यात आले आहे.

यवतमाळ शहराच्या मध्यवर्ती भागात, बस स्टँड चौकापासून केवळ २०० मीटर अंतरावर, जिल्हा परिषद क्वार्टर मार्ग, पोलीस कवायत मैदान रोड, पळसवाडी येथे ही नवीन इमारत वसलेली असून, नागरिकांसाठी अतिशय सोयीचे ठिकाण ठरते आहे. बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत ६ ते १८ वयोगटातील विधी संघर्षग्रस्त व संरक्षणाच्या गरज असलेल्या बालकांसाठी येथे विविध सेवा पुरविल्या जातील. त्यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सेवा, औपचारिक व व्यावसायिक शिक्षण, समुपदेशन यांचा समावेश आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अधीक्षक गजानन जुमळे यांच्या संकल्पनेतून, बालकांसाठी खेळ, शिक्षण व संस्कार यांचा समतोल राखणारे वातावरण निर्माण करण्यात आले आहे.

इमारतीमध्ये पक्षी, प्राणी, निसर्गचित्रे, प्रेरणादायी विचार, संस्कारपर भित्तीचित्रे व आकर्षक रंगरंगोटी यांचा वापर करून बालस्नेही, आनंददायी व प्रेरणादायी वातावरण तयार करण्यात आले आहे. १५ ऑक्टोबर २०२५ पासून नवीन इमारतीतून कार्यालयीन व्यवहार सुरू झाले असून, बाल न्याय व्यवस्थेशी संबंधित सर्व यंत्रणांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन अधीक्षक गजानन जुमळे यांनी कळविले आहे.

# जिल्हा न्यायालयात दीपोत्सव उत्साहात साजरा

## न्यायप्रकाशाने उजळला न्यायालय परिसर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - जिल्हा न्यायालय, यवतमाळ येथे दिवाळी निमित्ताने दीपोत्सव कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. जिल्हा न्यायालय, वकील संघ तसेच अधिवक्ता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय प्रमुख जिल्हा न्यायाधीश नागेश नाव्हकर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश देशपांडे उपस्थित होते. व्यासपीठावर जिल्हा न्यायाधीश बघेले साहेब, अधिवक्ता परिषद यवतमाळचे जिल्हा अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर गायनार, जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. मोहन गिरटकर, ॲड. मनमोहन ठाकरे तसेच जिल्हा सरकारी वकील ॲड. नीती दवे यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन आणि भारतमाता पूजनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. प्रारंभी ॲड. प्रवीण हर्षे यांनी प्रास्ताविक करताना दीपावली व न्यायदान यांचा परस्परसंबंध अधोरेखित केला. त्यांनी सांगितले की, "आपल्या न्यायालयीन परिवारातील प्रत्येक सदस्याच्या मनात कर्तव्यभावना, समरसता आणि सकारात्मकतेचा दीप प्रज्वलित होऊ दे." अध्यक्षीय उद्बोधनात प्रमुख जिल्हा न्यायाधीश नाव्हकर साहेबांनी दीपाचे ज्ञान, सत्य आणि न्यायाचे प्रतीक म्हणून वर्णन केले. "जसा दीप अंध:कार दूर करून प्रकाश पसरवतो, तसा आपल्या न्यायालयीन कार्यातून समाजात सत्याचा आणि न्यायाचा प्रकाश पसरावा," असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. जीवन लढी यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. शीतल जयस्वाल यांनी मान्यवरांचे केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात ॲड. बदनोरे, ॲड. उत्पल महाजन, ॲड. उदय पांडे, ॲड. मनीष हणमंते, ॲड. भास्कर चव्हाण, ॲड. लक्ष्मीकांत सानप, ॲड. नरेंद्र गायकी, ॲड. वरुण भुतडा, ॲड. निरंजन राठोड, ॲड. आकाश मंगतानी, ॲड. नितीन मांगुळकर, ॲड. निलिमा जोशी, ॲड. रिता पुंडलिक, ॲड. कोमल मजेठीया, ॲड. दीपाली पचारे, ॲड. प्रतीक्षा बोडे आदींसह अनेक वकिलांनी सहभाग नोंदविला.


# आत्मोन्नतीचा मार्ग सामुदायिक प्रार्थनेत प्राप्त होतो : प्रा. खैरे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - श्रीरामपूर येथे राष्ट्रसंत तुकडोजी आत्मोन्नतीचा मार्ग सामुदायिक प्रार्थनेत प्राप्त होतो : प्रा. खैरे श्रीरामपूर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यस्मरण दिन साजरा जगातील सर्व जाती,धर्म,पंथाचे लोक जर सामुदायिक प्रार्थनेच्या अधिष्ठानाखाली एकत्र येणार नाही तर निसर्गाच्या भट्टीत व युद्धात होरपळून जातील, कुणाचा द्वेष न करणे हे अध्यात्म सामुदायिक प्रार्थनेतुन साध्य होते, आत्मोन्नतीसाठी उपासना हा मार्ग आहे राष्ट्रसंतांनी सामुदायिक ध्यान व सामुदायिक प्रार्थना उपासना मानव जातीला दिली. सकल मनुष्याचे घडविणारी हि प्रार्थनेनुसार आचरण केल्यास नर जन्माचे सार्थक होईल व विश्वात शांतता नांदेल असे प्रतिपादन ग्रामगितेचें गाढे अभ्यासक प्रा. नंदकुमार खैरे यांनी श्रीरामपूर येथे प्रार्थना प्रसंगी केले.

दरवर्षीप्रमाणे श्री. गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर यांच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यस्मरण दिन अर्थात सर्व संत स्मृतिदिन भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संवेदना सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते किरण देशमुख, आकृती बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ रोगे, पोलिस पाटील पंडीत अडतकर, नादब्रम्ह संगीत विद्यालयाचे संस्थापक प्रमोद जयस्वाल,रूपक संगीत विद्यालयाचे संस्थापक प्रशांत आत्राम, ज्ञानेश्वर ताकतोडे गुरुजी, ग्रामगीताचार्य किसन गरडे, दिगांबर डोके माहुर, रमेश सरागे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून गुरुदेवांच्या प्रतीमेस पुष्पहार व अधिष्ठानास पुष्पांजली अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. ग्रामगीताचार्य स्मिता धर्माळे यांच्या सूचनेनुसार भव्य सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. गुरुदेव उपासकांनी सामूहिक मौन श्रद्धांजली अर्पण करुन समर्थ आडकोजी महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची आरती करुन जयघोष घेण्यात आला. यावेळी अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी येथून नुकतीच सन्मानाची ग्रामगीताचार्य पदवी कमी वयात प्राप्त करणारी कु. प्रियंका गरडे हिचा सत्कार योग शिक्षीका रंजना किन्हेकर व पुष्पाताई वाकडे यांच्या हस्ते,कवी किर्तनकार गजानन कवाने यांचा सापत्निक सत्कार किरण देशमुख व प्राचार्य डॉ. संजय गुमळे यांच्याहस्ते तर यवतमाळ जिल्ह्यातून आदर्श प्रचारक पुरस्कार प्राप्त झालेले शिवशंकर नागरे यांचा सत्कार रामभाऊ रोगे व पंडित अडतकर यांच्या हस्ते गुरुदेव दिनदर्शिका शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.




# वेचक

## पत्नीचा छळ करून जाळून ठार मारणाऱ्या नराधम पतीस जन्मठेप

पांढरकवडा - मौजा शिवला,ता. झरी,जि. यवतमाळ येथे पत्नीचा छळ करून तिला जाळून ठार मारणाऱ्या नराधम पतीस सत्र न्यायालय, केळापूर यांनी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. घटनेची हकिकत अशी की, दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी सायंकाळी सुमारास आरोपी राहुल विशाल मरस्कोल्हे (वय २८) यांनी पत्नी सौ. आराधना राहुल मरस्कोल्हे हिच्यावर भाजी लवकर तयार केली नाही, या कारणावरून रागाच्या भरात घरात ठेवलेले डिझेल तिच्या अंगावर टाकून पेटत्या दिव्याची वात लावून तिला जाळले. त्यामुळे गंभीररीत्या भाजलेल्या आराधनाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.या घटनेनंतर मृताची आई हिने पोलीस ठाणे पाटण येथे फिर्याद दाखल केली. त्यावरून भा.दं.वि. कलम ३०७, ४९८(अ), ३०२ अन्वये गुन्हा क्रमांक १०/२०२३ दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीप ए. पाटील यांनी केला.तपासाअंती आरोपीविरुद्ध सबळ पुरावे मिळाल्याने सत्र न्यायालय,केळापूर येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सरकारी बाजूने अतिरिक्त शासकीय अभियोक्ता प्रशांत अ.मानकर यांनी काम पाहिले.अभियोग पक्षाने सादर केलेल्या नऊ महत्त्वाच्या साक्षीदारांच्या जबाबांनंतर न्यायालयाने आरोपी दोषी असल्याचे मान्य केले.न्यायालयाने आरोपीस भा.दं.वि. कलम ३०२ अंतर्गत जन्मठेप व १०,००० रुपये दंड (दंड न भरल्यास सहा महिने सश्रम कारावास) तसेच कलम ४९८(अ) अंतर्गत तीन वर्ष सश्रम कारावास व ५,००० रुपये दंड (दंड न भरल्यास तीन महिने सश्रम कारावास) अशी शिक्षा ठोठावली. सर्व शिक्षा एकत्र भोगावयाच्या आहेत.ही शिक्षा सत्र न्यायाधीश श्री.अभिजित देशमुख यांच्या न्यायालयाने दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सुनावली. आरोपीच्या बाजूने ॲड. सिद्धार्थ लोढा यांनी तर पैरवी अधिकारी म्हणून पो. हे. कॉ. अनिल कवाडे (ब. क्र. १२५४) यांनी साक्षीदार हजर करण्याचे काम पाहिले.

## सुमती किशोर डहाळे यांचे निधन



महागाव : येथील सुवर्णकार तथा भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते व महागाव तालुका पत्रकार संघाचे सदस्य विशाल डहाळे आणि अमरावती कारागृह अधीक्षक एडवोकेट कीर्तीताई राजेश चिंतामणी यांच्या मातोश्री यांचे काल दिनांक १७ ऑक्टोंबर रोजी दु:खद निधन झाले आहे. आज त्यांच्या पार्थिव देहावर दि. १८ ऑक्टोंबर रोजी सकाळी नऊ वाजता महागाव येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## माजी सैनिक दत्ता मेटकर यांचे निधन

यवतमाळ - भारतीय सेनेतील माजी सैनिक दत्ता केशव मेटकर रा.पापीनवार ले-आऊट पुसद.यांचे दिनांक 13/10/2025 रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. वयाच्या ९१व्या वर्षी काल त्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दत्ता मेटकर यांनी भारतीय सेनेत कार्यरत राहून देशसेवेत आपले आयुष्य समर्पित केले. भारत–चीन युद्धातील त्यांच्या पराक्रमामुळे ते स्थानिक पातळीवर तसेच कुटुंबात अभिमानाचे स्थान होते. त्यांच्या मागे मुलं,मुली,नातवंडं व परिवारातील सदस्यांचा मोठा परिवार आहे.

## शेतकरी मेळाव्यात गुलाबी बोंडअळी नियंत्रणाबाबत मार्गदर्शन

यवतमाळ : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन रणनीतीचा प्रसार या प्रकल्पाअंतर्गत मौजे आष्टी, तालुका कळंब येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला), केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर, आणि कृषी विभाग, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या मेळाव्यास संतोष डाबरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, डॉ. दीपक कच्छवे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, डॉ. शिवाजी थुबे, वरिष्ठ शास्त्रज्ञ (कीटकशास्त्र), केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर, सचिन कुबडे, सरपंच, आष्टी डॉ. प्रमोद नागोराव मगर, शास्त्रज्ञ (कीटकशास्त्र), कृषी विज्ञान केंद्र, सुरेशराव कुबडे, प्रगतिशील शेतकरी, आष्टी व प्रवीण चंदनशिवे, सहाय्यक कृषी अधिकारी, आष्टी आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद मगर यांनी केले. तांत्रिक सत्रात डॉ. शिवाजी थुबे यांनी कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी मिलन व्यत्यय तंत्रज्ञान यावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच डॉ. सुरेश नेमाडे, निवृत्त सहयोगी प्राध्यापक, पीडीकेव्ही अकोला यांनी कापूस पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

### वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात

# ‘काळी दिवाळी आंदोलन’ आक्रमक

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची पिके उद्ध्वस्त झाली आहेत. मेहनत, घाम आणि संपूर्ण हंगामाची आशा वाहून गेली आहे. मात्र सरकारकडून फक्त घोषणा आणि फोटोसेशनपुरतीच मदत मिळत असल्याने शेतकऱ्यांचा रोष तीव्र झाला आहे.फडणवीस सरकारने केवळ ८,५०० प्रति हेक्टर इतकी मदत जाहीर करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे केले आहे. या अन्यायकारक निर्णयाविरोधात माजी आमदार वीरेंद्र भाऊ जगताप यांच्या नेतृत्वाखाली चांदुर रेल्वे येथे आज भव्य आणि आक्रमक ‘काळी दिवाळी आंदोलन’ पार पडले.

एस.डी.ओ. कार्यालया समोर शेतकरी, महिला, युवक आणि काँग्रेस कार्यकर्त्यांचा प्रचंड जनसागर उसळला होता.सर्व शेतकरी काळ्या फिती बांधून, काळे झेंडे हातात घेऊन शासनाविरोधात ठामपणे उभे राहिले.शेतकऱ्यांनी आपल्या घरातून भाकर, ठेचा आणि बेसन आणून प्रतीकात्मक काळी दिवाळी साजरी केली.यावेळी ‘५० हजार हेक्टरी मदत द्या!’, ‘पूर्ण कर्जमाफी करा!’, ‘शेतकऱ्यांशी राजकारण थांबवा!’ अशा मागण्या रेटून धरल्या. वीरेंद्र जगताप यांनी भाषणातून ‘ही काळी दिवाळी नाही, हा शेतकऱ्यांच्या असंतोषाचा ज्वालामुखी आहे असून शासनाने शेतकऱ्यांच्या अश्रूंशी खेळणं थांबवावे, अन्यथा ही लढाई आता गावागावात पेटेल.’असे सांगितले. या आंदोलनात युवक काँग्रेसचे जिल्हा प्रभारी अक्षय राऊत यांनी भाषण करत संपूर्ण सभा गाजवली.आंदोलनात वीरेंद्र




जगताप यांच्यासोबत तालुका व शहर काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस तसेच असंख्य शेतकरी बांधव व भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग होता. एस.डी.ओ. कार्यालयाचा परिसर काळ्या झेंड्यांनी आणि घोषणांनी दुमदुमला होता.सभेचे संचालन अशोक चौधरी यांनी केले.

यावेळी गणेश आरेकर सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, गोविंद देशमुख, अध्यक्ष खरेदी विक्री संघ, प्रभाकर वाघ माजी सभापती, जिल्हा काँग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष मोहन सिंघवी,अमोल होले तालुकाध्यक्ष काँग्रेस, परीक्षित जगताप प्रदेश उपाध्यक्ष युवक काँग्रेस, श्रीनिवास सूर्यवंशी शहराध्यक्ष काँग्रेस, पंकज वानखडे तालुका अध्यक्ष काँग्रेस, प्रदीपमुंदडा शहराध्यक्ष काँग्रेस, निशिकांत जाधव तालुकाध्यक्ष काँग्रेस, अमोल धावसे शहराध्यक्ष काँग्रेस, कविता गावंडे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती धामणगाव, श्रीकांत गावंडे जिल्हा बँक संचालक, बबनराव मांडवगणे अध्यक्ष खरेदी-विक्री संघ, सुरेश निमकर,प्रकाश हिंजळकर, अक्षय पारस्कर नगराध्यक्ष नांदगाव खंडेश्वर, शिटू सूर्यवंशी माजी नगराध्यक्ष,वर्षा देशमुख अध्यक्ष महिला काँग्रेस,अनिता मेश्राम अध्यक्ष महिला काँग्रेस,सीमा जाधव अध्यक्ष महिला काँग्रेस नांदगाव खंडेश्वर मीनाक्षी ठाकरे, पंकज शिंदे उपाध्यक्ष दीपक सवई, खरेदी विक्री संघ, हर्षल वाघ अध्यक्ष विविध कार्यकारी सोसायटी, देवानंद जी खुणे, नितीन कनोजिया उपाध्यक्ष न प चांदूर रेल्वे, रुपेश पुडके शहराध्यक्ष युवक काँग्रेस, प्रफुल कोकाटे माजी उपाध्यक्ष, अनिस सौदागर, अतुल चांडक, विनोद जगताप, भीमा पवार, श्याम पंपालिया, नितीन दगडकर,बंडू जगताप, अरुणराव शेळके, मुरलीधर सराड, सुशील थोरात, सारंग देशमुख, पंकज मेश्राम, सागर राऊत, गोपाल अविनाश, सागर भोंडे, अर्जुन देशमुख सांग, रितेश शेळके,भावेश देशमुख, सक्षम वानखडे, करण मेश्राम, प्रतीक भैसे, महेश कलावटे, सुमित सरदार, नरेंद्र मेश्राम, सतपाल वरठे, महादेव सहारे, संजू कोल्हे, बालू देशमुख आदी कार्यकर्ता उपस्थित होते.

### कौशल्य विकास केंद्राच्या रोजगार मेळाव्यात

# १६८ तरुणांचा सहभाग

### ६२ जणांची प्राथमिक निवड

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती आणि मॉडेल करिअर सेंटर अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्लेसमेंट ड्राईव्ह चे आयोजन नुकतेच करण्यात आले. या रोजगार मेळाव्यामध्ये जिल्ह्यासह परिसरातील विविध तालुक्यांमधून १६८ उमेदवारांनी सहभाग नोंदविला.

उमेदवारांसाठी ऑनलाइन तसेच ऑफलाइन अशा दुहेरी पद्धतीने नोंदणीची सोय उपलब्ध करण्यात आली होती. मेळाव्यात दहावी, बारावी, पदविका धारक, पदवीधर तसेच तांत्रिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार मिळावा यासाठीएकूण ६ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. यामध्ये रेमंड लक्झरी कोटन प्रा.लि. अमरावती,सहयोग मल्टी बँक लि.अमरावती, प्लास्टी सिमैक आय टी, प्लास्टी सर्ज अमरावती, जाधव गियर्स प्रा.लि. आणि सत्या माइक्रो फायनान्स प्रा.लि. अमरावती यांसारख्या कंपन्यांचा समावेश होता. या कंपन्यांनी विविध क्षेत्रातील एकूण १२८ पदांसाठी मुलाखत प्रक्रिया राबवली. विविध कंपन्यांचे प्रतिनिधी थेट मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून त्यांनी १२६ उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली. या प्लेसमेंट ड्राईव्हद्वारे ६२ उमेदवारांची प्राथमिक निवड आणि ३ उमेदवारांची अंतिम निवड जागेवरच करण्यात आली.

# मेळघाटात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

### तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

**धारणी/वार्ताहर**

मेळघाट परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे हजारो शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांपुढे आर्थिक संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने मेळघाट विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार राजकुमार दयाराम पटेल यांच्या मार्गदर्शनात तहसीलदार कार्यालयात निवेदन सादर करून शेतकऱ्यांना तत्काळ मदत देण्याची मागणी केली आहे.

अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे शासनाने तात्काळ पंचनामे करून मदत देणे अत्यावश्यक असल्याचे माजी आमदार पटेल यांनी निवेदनात नमूद केले आहे.काँग्रेस पक्षाने मेळघाटातील



सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण सरकारी नुकसान भरपाई जाहीर करावी, अतिवृष्टीमुळे नष्ट झालेल्या शेती पिकांसाठी प्रती हेक्टर ५०,००० इतकी नुकसानभरपाई देण्यात यावी, ज्यांचे पिकांचे पूर्ण नुकसान झाले आहे, त्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत व भरपाई देण्यात यावी,या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास काँग्रेस पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.या प्रसंगी तालुकाध्यक्ष महेंद्रसिंग गैलवार, सभापती रोहित पटेल, पंकज मोरे,शेख मुक्तार,राजकुमार मालवीया,मलिक शेख, राजकिशोर मालवीय, कालू मालवीय, विजय मालवीय, दीपक मालवीय, कैलास पटेल, विनोद वानखेडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अवैध सावकारी व्यवहारात शेतकरी कुटुंबियांनी तक्रार करावी-ॲड.हेलोंडे

**अमरावती/का.प्र.**

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश केशवराव हेलोंडे पाटील यांनी महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ अंतर्गत अवैध सावकारी तक्रारी संबंधात नुकताच आढावा घेतला. विदर्भ व मराठवाडा विभागात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बाधंवांचे अतोनात नुकसान झालेले असल्यामुळे शेतकरी व त्यांचे कुटुंबीय आर्थिक विवचंनेत आहेत. शेतकरी व त्यांचे कुटुंबीयांची अवैध सावकारी व्यवहारात पिळवणूक होऊ नये यासाठी त्यांनी शेतकरी बांधवांनी व व त्यांचे कुटुंबीयांनी निर्भिडपणे तक्रार करावी ,असे आवाहन केले आहे.

अवैध सावकारी व्यवहारात शेतकरी व त्यांचे कुटुंबियांचे फसवणूक, पिळवणूक होत असल्यास त्यांनी अमरावती सहकार विभागात अवैध सावकारी करणाऱ्या सावकाराविरूध्द तक्रार संबंधीत जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक, सरकारी संस्था याचे कार्यालयात तसेच अमरावती जिल्ह्याकरीता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती व उपनिबंधक सहकारी संस्था, तालुका अमरावती सहकार संकूल, कांतानगर अमरावती - ४४४६०२कार्यालयीन ईमेल क्रमांक ddr_amr @rediffmail.com/dyr.amr.amravati@ gmail.com यावर करण्यात याव्यात तसेच तालुका स्तरावरील सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयातही तक्रार नोंदवू शकतात.

जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार, उपनिबंधक सुधीर खंबायत,सहायक निबंधक गजानन डावरे, कार्यालय अधीक्षक अनिरुद्ध राऊत, सत्यजीत पोले, दिपक गासे, प्रशांत ढोके, सचिन शहाकार, सतिश समर्थ व कार्यालयीन कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

### हलाल मुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी

# हिंदू जनजागृती समितीचे राष्ट्रीय जनजागृती अभियान



**अमरावती/का.प्र.**

भारतात केवळ ‘अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण’ आणि ‘अन्न व औषध प्रशासन’ या शासकीय संस्थांनाच उत्पादनां साठी प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे. असे असतांना काही खासगी संस्थांकडून बेकायदेशीर पणे ‘हलाल प्रमाणपत्र ’ दिले जात असून, यातून एक समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे. एकेकाळी केवळ मांसाहारी उत्पादने आणि मुस्लिम देशांतील निर्यातीपुरती मर्यादित असलेली ‘हलाल’ संकल्पना आज साखर, तेल, पीठ, मिठाई, औषधे, सौंदर्यप्रसाधने अशा अनेक उत्पादनांवर लादली जात आहे. हा हिंदू, शीख, जैन, बौद्ध आणि अन्य गैर-मुस्लिम समाजावर अन्याय आहे.

या अवैध हलाल प्रमाणपत्रांच्या माध्यमातून मिळणारा पैसा देशविघातक कार्यांसाठी, विशेषतः आतंकवाद्यांना कायदेशीर साहाय्य करण्यासाठी वापरला जात आहे. उत्तर प्रदेश सरकारने अशा अवैध हलाल उत्पादनांवर बंदी आणली आहे, तसेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही ‘सरकारव्यतिरिक्त कोणालाही प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नाही’, असे स्पष्ट केले आहे. धर्मनिरपेक्ष भारतात धर्माच्या आधारावर उत्पादनांचे प्रमाणीकरण करणे चुकीचे आहे. असे प्रतिपादन हिंदू जनजागृती समितीचे अमरावती समन्वयक निलेश टवलारे यांनी याप्रसंगी केले. खाद्यपदार्थ आणि अन्य उत्पादनांवर दिल्या जाणाऱ्या अवैध ’हलाल प्रमाणपत्रां’च्या विरोधात यंदा देशभरात ‘हलाल मुक्त दिवाळी’ अभियान राबवण्यात येत आहे. ‘हिंदू जनजागृती समिती’ आणि अन्य समविचारी संघटनांनी एकत्र येत या देशव्यापी अभियानाची घोषणा केली आहे. या अभियानातून नागरिकांनी राष्ट्रीय भावनेतून सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. अभियानांतर्गत देशभरात ‘हलाल सक्ती विरोधी आंदोलने’, शासनाला निवेदन देणे, सह्यांची मोहीम आणि ऑनलाईन याचिकांद्वारे व्यापक जनजागृती केली जात आहे. केवळ दिवाळीपुरते मर्यादित न राहता, ‘हलाल मुक्त भारत ’ होईपर्यंत हा लढा सातत्यपूर्ण रितीने चालू ठेवण्याचा निर्धार संघटनांनी व्यक्त केला आहे.

या आंदोलनात शिवसेनेच्या महिला शहर प्रमुख वृंदा मुक्तेवार, धर्म जागरणचे पप्पु मिश्रा,सुनिल मुन्डे (बजरंग दल सदस्य, चिखलदरा), दिलीप पाटील, हिंदू जनजागृती समितीतर्फे निलेश टवलारे, सचिन वैद्य, प्रदिप गर्गे, आनंद डाउ, रमेश वरुडकर, ऋषीकेश ठेलकर, चंदा बागडे, बेला चव्हाण, उषा कांबळे, आश्विनी श्रीराव यांनी उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवला.

# श्री गणेशदास राठी विद्यालयात पर्यावरण पूरक दीपोत्सव

**अमरावती/का.प्र.**

श्री गणेशदास राठी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक दिवाळी( इको फ्रेंडली दिवाळी) साजरी करण्याचा संकल्प करत शाळेत दिवाळी साजरी केली.

विद्यार्थ्यांचा उत्साह खूपच ओसंडून वाहत होता. सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी आज रंगीबेरंगी फुलपाखरू सारखे दिसत होते.विद्यार्थ्यांनी कचऱ्यातून कला, टाकाऊतून टिकाऊ याप्रमाणे स्वतः कागदी निरनिराळे डिझाईनचे पर्यावरण पूरक आकाश कंदील बनवून आणले होते. तर विद्यार्थिनींनी मातीचे दिवे डेकोरेट करून आणले होते. खरंच विद्यार्थ्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच. अप्रतिम आकाश कंदील व दिवे सजवलेले होते. गणेशदास राठीचे प्रांगण रांगोळीने सुंदर सजलेले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य भट्टड, प्रमुख अतिथी उपप्राचार्या मालाणी,पर्यवेक्षक सुताणे व ज्येष्ठ शिक्षिका दीक्षित, सदाशिवे मंचावर उपस्थित होत्या. शाळेचे प्राचार्य नवनीत भट्टड व उपप्राचार्य माननीय मालाणी, पर्यवेक्षक सुताणे तसेच जेष्ठ शिक्षिका दीक्षित,सदाशिवे यांच्या



हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी या उद्देशाने वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, बलिप्रतिपदा, लक्ष्मीपूजन व भाऊबीज या पाचही दिवसांची माहिती शितल गांधी यांनी विस्तृतपणे सांगितली. पाचवीची विद्यार्थिनी स्वरा पाटेकरने लक्ष्मी देवीची सुंदर अशी वेशभूषा केली होती तसेच वर्ग पाचवीच्या विद्यार्थिनींनी भाऊबीजेवर आधारित‘सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती’ या गाण्यावर तीर्था खांडेकर व तस्मयी खांडेकर या दोघी बहिणींनी अप्रतिम नृत्याचे सादरीकरण केले. दीपोत्सवाचे महत्त्व सांगत असताना ‘लक्षदीप हे उजळले घरी’ या गाण्यावर वर्ग पाचवीच्या विद्यार्थिनींनी अप्रतिम नृत्याचे सादरीकरण केले. यामध्ये कृणाली गवळी तीर्था,तस्मयी खांडेकर, अवनी भिडे ,सायली हरडे, वंशिका तायडे ,स्वरांजली ठाकरे ह्या विद्यार्थिनी सहभागी होत्या.

यानंतर वर्ग सहावीच्या परिधी भडके, नंदिनी मनवर, जानवी सोयम या विद्यार्थिनींनी सुद्धा दीपोत्सवावर नृत्य सादर केले. नीता मुंदडा यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक दिवाळीचे महत्त्व व पर्यावरण पूरक दिवाळी साजरी का करावी याचे महत्वही समजावून सांगितले. अर्चना लाहोटी यांनी विद्यार्थ्यांसाठी काही अतिशय मजेशीर गेम घेतले. हर्षदा काळीकर यांनी ‘आली दिवाळी’ या गाण्याचे अतिशय सुमधुर आवाजामध्ये सादरीकरण केले. अर्चना वऱ्हाडपांडे यांनी दिवाळीच्या फराळाचे संमेलनावर कविता सादर केली. संगीता शर्मा यांनी सुद्धा कविता सादर केली .यावेळेस विद्यार्थ्यां करीता भेट कार्ड वर टाकाऊतून टिकाऊ आकाश कंदील बनवणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .आकाश कंदीलावर व भेटकार्डावर विद्यार्थ्यांनी प्रदूषण मुक्त दिवाळी,आवाज विरहित फटाके ,प्रदूषण टाळा यासारखे संदेश दिले. प्रथम पारितोषक संविधान वासनिक,द्वितीय पारितोषक श्रुती मोहोळ, तृतीय पारितोषक लिचवी मोहोळ, प्रोत्साहन पर पारितोषिक क्षितिज खेडकर या विद्यार्थ्यांनी पटकावले. विद्यार्थ्यांनी रंगबिरंगी दिव्यांची आरास केली होती व दिवे ही लावले होते.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या प्राचार्या मालानी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करत सर्व विद्यार्थ्यांना गिफ्ट सुद्धा दिले. आयोजक टीमचे ही कौतुक व अभिनंदन करीत त्यांनाही गिफ्ट देण्यात आले. वंदना व्यास व काही विद्यार्थिनींचा आज वाढदिवस सुद्धा शाळेत त्यांना गिफ्ट देऊन साजरा करण्यात आला. तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी मेघा,सोनू व शाळेचे गार्ड यांना दिवाळीनिमित्त गिफ्ट देण्यात आले.तसेच शाळेचे प्राचार्य भट्टड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना दीपोत्सवाची माहिती सांगताना पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करा असा संदेशही दिला.

शाळेच्या या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना श्री गणेशदास राठी छात्रालय समितीचे अध्यक्ष वसंतकुमारजी मालपाणी, संस्थेचे सचिव डॉ. गोविंद लाहोटी तसेच संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व दिवाळी निमित्त शुभेच्छा दिल्या. संचालन निधी व्यास तर आभार प्रदर्शन पवन राठी यांनी केले. सुरजुसे यांनी अप्रतिम असे फळ्यावर पर्यावरण पूरक दिवाळीचे चित्र रेखाटले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीते करता सर्व शिक्षकांचे,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आयोजन अर्चना वऱ्हाडपांडे व सुनीता सदाशिंवे यांनी केले.

## संक्षिप्त

### डॉ.अब्दुल कलाम यांची जयंती



**खल्लार-** छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची ९४ वी जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.रविंद्र इचे होते.तर मार्गदर्शक डॉ.प्रविण सदार उपस्थित होते.संचालन,प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमअधिकारी डॉ.आशिष काळे यांनी आभार प्रदर्शन गोपाल पवार यांनी केले.कार्यक्रमाला प्रा.अतुल चऱ्हाटे, संजय सोळंके,अविनाश कडू रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.

### मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती अर्ज; शाळांना नोंदणीचे निर्देश

**अमरावती-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्याकरिता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ऑनलाईन महाडीबीटी प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. इयत्ता ९ वी, १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती, साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती, तसेच ५ वी ते १० वी मधील अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती यांसारख्या महत्त्वाच्या योजनांचा यात समावेश आहे.या योजनांची ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरिता शाळेतील मुख्याध्यापकांनी http://prematric.mahait.org/Login/Login- या महाडीबीटी प्रणाली वेब लिंकवर मुख्याध्यापक लॉगीन वापरून शाळेचे, मुख्याध्यापकांचे व लिपीकांचे प्रोफाइल तसेच विद्यार्थ्यांचे वैयक्तिक व शैक्षणिक माहितीचे प्रोफाइल तातडीने अद्ययावत करावे. या अनुषंगाने, महाडीबीटी प्रणालीमध्ये पात्र असलेल्या सर्व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची नोंदणी मुख्याध्यापकांनी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील योजनांचे ऑनलाईन अर्ज तात्काळ भरण्यात यावेत, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी ज्ञानबा पुंड यांनी केले आहे.

### जिल्हा महिला लोकशाही दिन सोमवारी

**अमरावती-** जिल्हा महिला लोकशाही दिन सोमवार, दिनांक २७ऑक्टोबर,२०२५रोजी(महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी) सकाळी ११वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.तरी संबंधितांनी अहवालासह व्यक्तिश: उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

### मनपात डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती साजरी

**अमरावती-** माजी राष्ट्रपती स्व. डॉ.ए.पि.जे. अब्दुल कलाम जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. माजी राष्ट्रपती स्व. डॉ.ए.पि.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्य महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचे हस्ते डॉ.ए.पि.जे. अब्दुल कलाम यांचे प्रतिमेस हारार्पण महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे करण्यात आले.यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, हरीष संतोसिया, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### ग्रामीण भागात कलम ३७(१) व (३) लागू

**अमरावती-** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. २३ ऑक्टोबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हादंडाधिकारी अनिल भटकर यांनी कळविले आहे.

### तलावावर संस्था नोंदणी करण्याबाबत आवाहन

**अमरावती-** जिल्ह्यातील अमरावती तालुक्यातील ५०० हेक्टरखालील पाटबंधारे जलसंधारण विभागाचे धानोरा दिग्रस तलाव (४४ हे) हा तलाव मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. या तलावावर शासन निर्णयानुसार संस्था नोंदणी करावयाची आहे. यासाठी तलाव परीसरातील स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त व महिला यांना संधी मिळणार आहे. तरी धानोरा दिग्रस तलाव (४४ हे) या तलावावर संस्था नोंदणी करण्यास इच्छुक असलेल्या स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त व मच्छिमार महिला यांनी सहाय्यक निबंधक, (सहकारी संस्था), अमरावती या कार्यालयाशी संपर्क साधून बातमी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत संस्था नोंदणी करीता प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय एम. एम. मेश्राम यांनी केले आहे.

### भाजपा किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी राजाभाऊ वडनेरकर



**अंजनगाव बारी-** मांजरी म्हसला येथील राजाभाऊ सुधाकर वडनेरकर यांची भाजपा किसान मोर्चा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. नियुक्ती आमदार प्रताप अडसड आणि किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष भुयार यांनी नियुक्ती केली. यावेळी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख ज्येष्ठ नेते सुरेश भाऊ गायधने उपस्थित होते.राजू वडनेरकर हे धामणगाव मतदार संघातील आ.प्रदाप अडसर यांचे सहकारी मार्गदर्शक म्हणून परिचित असून ते केंद्रीय मानवाधिकार संघटना महाराष्ट्र प्रदेश मुख्य सचिव पदावर कार्यरत आहे.

# दिवाळी पर्व म्हणजे सकारात्मक विचार



दिवाळीशी प्रत्येकाचे बंध काही वेगळेच असतात. ते एकाच वेळी संपत्ती, सामर्थ्य, ऐश्वर्य, सत्ता, संस्कार यांचे महत्त्व सांगतात तर दुसरीकडे माणसा-माणसातील नातेसंबंधाची वीण मजबूत करतात. हा सण दान, परोपकार, समाजभान, पर्यावरण जतन या विषयांना स्पर्श करून जातो. म्हणूनच या सर्व अर्थाने महत्त्वपूर्ण सणाचे अर्थात दिवाळीचे सहर्ष स्वागत करण्यासाठी प्रकाशाच्या पायघड्या घालू या. दिवाळी जशी दिवे, मिठाई आणि फटाके यांची आहे, तशीच भारतीय संस्कृतीचे प्रतीकही आहे. हे आनंददायी आणि रंगीबेरंगी पर्व अंधःकारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि अज्ञानावर ज्ञानाचा विजय साजरा करणारे आहे. भारतातील प्रत्येक राज्यात, प्रत्येक भागात दिवाळी वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जात असली तरी तिचा गाभा एकच असतो; तो म्हणजे समृद्धी, स्नेह, कृतज्ञता आणि नवप्रेरणा... तेव्हा आपणही दिवाळीचा उत्सवी दिवसांमधील पुराणकथा, आरोग्य, नातेसंबंध, निसर्गप्रेम आणि सामाजिक संदेश अशा विविध पैलूंचा सुंदर मिलाफ जाणून घेऊ या. दिवाळीचा पहिला दिवस पारंपरिक धारणेनुसार वसुबारसाचा. 'वसु' म्हणजे धन आणि 'बारस' म्हणजे द्वादशी. या दिवशी आपण गाईचे पूजन केले. भारतीय संस्कृतीत गाईला 'गोमाता' म्हणतात, कारण ती आपल्या दैनंदिन जीवनाशी अगदी घट्ट जोडलेली आहे. दूध, दही, लोणी, शेण, मूत्र या पंचगव्यांनी ती आपले शरीर आणि मन दोन्ही शुद्ध करते. तेव्हा तिच्याप्रती आदरभाव व्यक्त करत दिवाळीची सुरुवात होते. अर्थात या दिवसाचे महत्त्व केवळ धार्मिक नाही तर हा दिवस पर्यावरणपूरक आणि शाश्वत जीवनशैलीचाही संदेश देतो. आधुनिक कृषी क्षेत्रात रासायनिक खतांपेक्षा शेणखताला आणि सेंद्रिय पद्धतींना मिळत असणारे महत्त्व आपण जाणतो. वसुबारस साजरे करताना याची वीण आपल्यापुढे स्पष्ट होते. या दिवसाच्या निमित्ताने काही गावांमध्ये तसेच शाळांमध्ये गोधन संवर्धन मोहीम राबवली जाते. ही बाब ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी ठरते.

धनत्रयोदशीच्या दिवशी आपण धनाची तसेच आरोग्य रक्षक असणाऱ्या धन्वंतरीची पूजा करतो तसेच यमदीपदान करून अपमृत्यूचा धोका दूर करतो. नरक चतुर्दशी हा दिवाळीतील एक महत्त्वाचा दिवस. अंधःकाराचा नाश आणि मनःशुद्धीचा आरंभ या दिवसापासून होतो, असेही म्हणता येईल. पुराणकथेनुसार या दिवशी भगवान श्रीकृष्णाने नरकासुराचा वध करून सोळा हजार कन्यांची सुटका केली. त्यामुळे या दिवसाचे प्रतीक म्हणून अंधःकारावर प्रकाशाचा विजय साजरा करण्यासाठी भल्या पहाटे दीपप्रज्वलन केले जाते. या दिवशी अभ्यंगस्नानाला विशेष महत्त्व आहे. आधुनिक संदर्भात पाहता नरकचतुर्दशी म्हणजे मनातील नकारात्मक विचारांचा, लोभ-राग-द्वेषरूपी नरकाचा नाश करण्याचा दिवस असाही अर्थ आपण घेऊ शकतो. दिवाळीतील सर्वात तेजस्वी रात्र म्हणजे लक्ष्मीपूजनाची अमावास्या. या दिवशी लोक घरे, कार्यालये आणि दुकाने सजवतात. घरामध्ये तसेच व्यावसायिक आस्थापनांमध्ये देवी लक्ष्मीची पूजा केली जाते. ही अमावास्या दिव्यांनी उजळून निघते. देवी लक्ष्मी ही धन, सौभाग्य आणि समृद्धीचे प्रतीक असल्यामुळे या मुहूर्तावर व्यापारी नवीन हिशेबपुस्तकांची सुरुवात करतात. हा नवीन आर्थिक वर्षाचा शुभारंभमानला जातो. अर्थात आजच्या युगात लक्ष्मीपूजनाचा अर्थ केवळ पैशांमध्ये मर्यादित नाही तर एका अर्थी हे श्रमाचे, प्रामाणिकतेचे आणि उद्यमशीलतेचेही पूजन आहे. कष्टाशिवाय लक्ष्मी मिळत नाही, हे तत्त्व या दिवसाने अधोरेखित झाले आहे. म्हणूनच या दिवशी केरसुणीलाही सन्मानित केले जाते.

पुराणकथेनुसार, राजा बळी हा अत्यंत दानशूर आणि न्यायप्रिय होता. भगवान विष्णूने वामन रूप धारण करून त्याची परीक्षा घेतली आणि त्याला पाताळात स्थान दिले. मात्र बळीच्या भक्तीमुळे विष्णूने त्याला दर वर्षी एक दिवस पृथ्वीवर येण्याची परवानगी दिली. त्यामुळे या दिवशी लोक बळी राजा येतोय, बळीचे राज्य येणार असे मानतात आणि आनंद साजरा करतात. एका अर्थी हा दिवस जनतेचा आणि समानतेचा सण आहे. बळी राजा लोककल्याणाचे प्रतीक असल्यामुळे या दिवशी अनेक सामाजिक संस्था रक्तदान, अन्नदान, वस्त्रदान यासारख्या उपक्रमांचे आयोजन करतात. या दिवशी पत्नी पतीला ओवाळते. प्रेमाने औक्षण करते. पती, पत्नीला भेटवस्तू देतो. त्यामुळेच हा पती-पत्नीतील नातेसंबंधांचा सन्मान करणारा, त्यांच्यातील प्रेम बलवान करणारा दिवसही ठरतो. यानंतरच्या म्हणजेच भाऊबीजेच्या दिवशी बहीण भावाला ओवाळते आणि त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ तिला भेट देतो. यमराज आणि त्याची बहीण यमी यांच्या भेटीची कथा यामागे सांगितली जाते, म्हणून हा दिवस 'यमद्वितीया' या नावानेही ओळखला जातो. शहरीकरणामुळे कुटुंब दूर गेली असली तरी तंत्रज्ञानाने नाती जपणे, जोडणे शक्य झाले आहे. व्हिडिओ कॉलवर 'व्हर्चुअल ओवाळणी', डिजिटल भेटवस्तू, सोशल मीडियावरील शुभेच्छा पोस्ट हा त्याचाच भाग म्हणता येईल. यातून हा दिवस आता नव्या रूपात साजरा होताना दिसतो आहे. काही प्रदेशांमध्ये विशेषतः उत्तर भारतात, कार्तिक पौर्णिमेला 'देवदिवाळी' साजरी केली जाते. या दिवशी देवता पृथ्वीवर येऊन दिवाळी साजरी करत असल्याचे मानले जाते. अशा या दिवाळीला काळानुरूप नवसंस्कारही जोडले जात आहेत. आजची दिवाळी केवळ धार्मिक राहिलेली नाही तर एक संस्कृती, अर्थव्यवस्था आणि पर्यावरणाशी जोडलेली सामाजिक चळवळ बनली आहे. सध्याच्या काळात दिवाळीचे काही नवे प्रवाह दिसून येतात आणि त्यातून पर्यावरणपूरक दिवे आणि मातीच्या कंदिलांना प्राधान्य, प्लास्टिकविरहित सजावट, स्थानिक कारागिरांच्या वस्तूंची खरेदी, घरगुती मिठाई आणि देशी उत्पादनांचा सन्मान करणे, 'ग्रीन दिवाळी' मोहिमा, वृक्षारोपण उपक्रम आदींची रुजवण केली जाते. हे आणि यासारखे अनेक बदल दिवाळी हा केवळ उत्सव नसून सामूहिक जबाबदारी आणि नैतिकतेचा उत्सव असल्याचे निर्देशित करतात. दिवाळीतील प्रत्येक दिवस आपल्याला काही तरी शिकवून जातो. जसे की, वसुबारस निसर्गाची पूजा करण्याचा संकेत देते. नरकचतुर्दशी मनाचा अंधार घालवण्यास सांगते. लक्ष्मीपूजन श्रमाचे पूजन करण्यास सांगते. बलिप्रतिपदा न्याय तसेच समतेचा आदर्श जपण्याचे सूचित करते तर भाऊबीज नात्यांचे सौंदर्य जपणे हे पूजनाचेच एक रूप असल्याचे सांगते. तेव्हा दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे आंतरिक प्रकाश, सकारात्मक विचार आणि एकमेकांबरोबर आनंदात जगणे हा आहे.



# दिवाळीचा आनंद

दिवाळी हा भारतातील हिंदूंचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा सण आहे. त्याचे केवळ आध्यात्मिक महत्त्व नाही तर त्यात नात्यांची गोड गुंफण घातलेली आहे. दिवाळी हा सण शास्त्र समजून केला तर आपल्याला आनंदाबरोबरच चैतन्याची अनुभूती देखील येते. हा सण प्रकाशाचा, चांगुलपणाचा, प्रेमाचा, ज्ञानाचा, शौर्याचा, विजय साजरा करण्याचा सण आहे. हिंदू पंचांगानुसार दिवाळी अश्विन महिन्याच्या त्रयोदशी पासून कार्तिक महिन्याच्या द्वितीया पर्यंत पाच दिवस चालणारा उत्सव आहे. श्रीलक्ष्मी, श्रीकृष्ण, यमदेव यांचे स्मरण करणारा हा दीपोत्सव आहे. दिवाळीचा सण श्रीराम अयोध्येला रावणावर विजय मिळवून १४ वर्षांने परत आले तेव्हा अयोध्यावासियांनी त्यांचे स्वागत दिव्यांची आरास करून केले. दिवाळी हा पाच दिवस चालणारा उत्सव आहे. धनत्रयोदशीला ऐश्वर्यप्राप्त होण्यासाठी धनलक्ष्मी ची पूजा करतात. आणि वर्षभर योग्य मार्गाने धन मिळवून वार्षिक उत्पन्नाचा सहावा भाग धर्म कार्यासाठी अर्पण करावा. याच दिवशी संध्याकाळी दक्षिण दिशेकडे तोंड करून दिवा लावून अपमृत्यू टाळण्यासाठी यमदेवाला प्रार्थना करावी.

भगवान धन्वंतरीचे पूजन करून उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करावी. नरक चतुर्दशी या दिवशी अभ्यंग स्नान करावे. श्रीकृष्णाने या दिवशी नरकासुराला ठार मारले याचे स्मरण म्हणून श्रीकृष्णाला कृतज्ञता व्यक्त करावी. स्वतःतील आणि समाजातील वाईट प्रवृत्ती म्हणजे नरकासुर नष्ट होऊ दे अशी प्रार्थना करावी. लक्ष्मीपूजन या दिवशी प्रदोष काळी लक्ष्मीपूजन करावे. घरात लक्ष्मी स्थिर राहण्यासाठी प्रार्थना करावी. या दिवशी लक्ष्मी तत्व अधिक कार्यरत असते. बलिप्रतिपदा या दिवशी राक्षस कुळात जन्म घेऊन श्रीविष्णू भक्ती करणाऱ्या बळीराजाचे स्मरण करावे. यालाच दिवाळी पाडवा ही म्हणतात. यावेळी पत्नी पतीला ओवाळते. भाऊबीज, बहिण भावातील प्रेमाचे नाते वृद्धिंगत होणारा हा दिवस आहे. अशा प्रकारे पाच दिवसांची दिवाळी साजरी केली जाते. प्रेम, एकता, सुसंवादाचा हा सण आहे. हा सण आपल्याला स्वच्छता, साधेपणा, आपुलकी शिकवतो. हा सण आपल्याला एकोप्याचे आणि सकारात्मकतेचे महत्त्व शिकवतो.

दिवाळी आपल्या जीवनातील अंधार दूर करून उज्वल भविष्य दाखवते. पण या सुंदर सणाला काही अपप्रकारांनी गालबोट लागते. कर्ण- कर्कश्य फटाके संध्याकाळ पासून मध्यरात्री पर्यंत फोडले जातात. त्यामुळे प्रचंड ध्वनी प्रदूषण होते. वृद्ध व्यक्ती, लहान मुले यांना यामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागतो. त्याचबरोबर या फटाक्यांचा प्रचंड धुर वातावरणात पसरतो. त्यामुळे श्वसनाचे त्रास मोठ्या प्रमाणात होतात. फटाक्यांमुळे बरेच छोटे-मोठे अपघात होतात. डोळ्यांना दुखापत होऊ शकते. खूप महागड्या फटाक्यात पैसा वाया घालूवून त्यापासून सर्वांना त्रास होणार असेल तर आपण खऱ्या अर्थाने दिवाळी सण साजरा करत आहोत का? याचा विचार केला पाहिजे. आपला आनंद हा दुसऱ्यांना त्रास देऊन साजरा करण्यापेक्षा दुसऱ्यांच्या आनंदात आपला आनंद शोधून दिवाळी साजरी केली तर दिव्यांच्या प्रकाशासारखे आपले जीवन सुद्धा उजळून निघेल.

**माधवी पत्की**

# फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या!

दिवाळी सण म्हणजे दिव्यांचा सण, प्रकाशाचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या कालावधीत पणत्या, मेणबत्त्या, आकाशकंदील, नवी खरेदी, नवे कपडे, मिठाई, रांगोळी, दिवाळी अंक, धार्मिक गोष्टी, मित्र-मैत्रीणी, नातेवाईकांच्या भेटी, कौटुंबिक संमेलन आणि फटाके या साऱ्या गोष्टी आल्या. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे फटाके. फटाके आणि दिवाळी हे तर जणू समीकरणच झाले आहे. फटाक्यांशिवाय दिवाळीच साजरी होऊ शकत नाही अशी आजची अवस्था आहे. दरवर्षी दिवाळीत फटाके उडवू नका, फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्पिणामांचा फटका केवळ मानव जातीलच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीला बसतो त्यामुळे दिवाळीत फटाके उडवू नका. फटाके उडवायचेच असेल तर हरित फटाके उडवा असे आवाहन सरकारतर्फे तसेच अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांकडून केले जाते मात्र त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते.

आधीच आपल्या देशाची हवा प्रदूषित आहे. मुंबई - दिल्लीसारख्या शहरांच्या हवेने धोक्याची पातळी गाठली आहे त्यात जर फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली तर लोकांना श्वास घेणेही मुश्कील होईल तसे झाले तर त्याचा परिणाम केवळ मानवाच्याच नव्हे तर



संपूर्ण सजीव सृष्टीच्या आरोग्यावर होईल. कॉपर, कॅडियम, लेड, गंधक, फॉस्फरस, सल्फर, मॅग्नेशियम, सोडियम, झिंक, नायट्रेट आदी रसायनांपासून फटाक्यांची निर्मिती केली जाते. ही रसायने मानवी आरोग्यास घातक आहेत. फटाक्यातील कॉपरमुळे श्वसनमार्गात दाह होतो. त्यामुळे दम्याच्या रोगांच्या आजारात वाढ होते. हृदयविकार आणि फुफ्फुसांचे आजार होण्याची शक्यता असते. मज्जासंस्थेवर परिणाम करते. कॅडीयम मूत्रपिंडाचे नुकसान करते. सल्फर हे वनस्पतींसाठी घातक आहे. ही फळे खाण्यात आल्यास खणाऱ्यांना विषबाधा होण्याचा धोका असतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांना खूप त्रास होतो. सतत चार ते पाच दिवस कानठळ्या बसवणाऱ्या आवाज ऐकल्यावर कायमचे बहिरेपणा येण्याची शक्यता असते. शिवाय फटाके फोडताना योग्य ती काळजी घेतली नाही तर अपघात होऊन कायमचे अपंगत्व येण्याची शक्यता असते. ऐन दिवाळीत फटाक्यांच्या दुकानांना किंवा कारखान्यांना आग लागून दुर्घटना घडल्याचे आणि त्यात जीवित आणि वित्त हानी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत हे देखील विसरता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार केला तर फटाके किती घातक आहेत हे लक्षात येईल. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची वेळ आली आहे. वाढत्या प्रदूषणाला आळा घालता येईल शिवाय आरोग्यही चांगले राहील.

**श्याम ठाणेदार**

# गोसंपदेचा गौरव उत्सव

भारतीय कृषी संस्कृतीत गाईला मातेचे स्थान आहे. ही गाय शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीसाठी बैल देते. तिच्या शेण, गोमूत्राच्या खतावर पिकांची वाढ होते. पिके जोमदार येतात, धान्याचे उत्पादनही वाढते. जमिनीची सुपीकता कायम राहते. गाईच्या दूध, दही, तूप, लोण्यावर घरातल्या मुला-बाळांना पोषक अन्न मिळते. गाईचे दूध तर आईसारखेच असल्याने लहान बाळांना गाईचे दूध त्यांच्या शारीरिक वाढीसाठी दिले जाते. गाईचे दूध हे साक्षात अन्न असल्याने आयर्वेदात गोमूत्राचा वापर जलोदर, त्वचारोग, उदररोगावर प्रभावी औषधीसाठी केला जातो. अलीकडच्या काळात तर गोमूत्र आणि गाईच्या शेणाचा रंग, विटा यासह विविध वापरही सुरू झाला आहे. अशी ही गोमाता म्हणजे साक्षात कामधेनू. देव आणि दानवांनी केलेल्या समुद्र मंथनात जी रत्ने निघाली त्यात नंदिनी ही गाय होती. गाईला नंदिनी याच देवस्वरूपाने पूजिले जाते. भारतीय संस्कृतीत घरादाराला आरोग्यदायी संपन्न, समृद्धतेचे वरदान देणाऱ्या गाई आणि वारसा च्या पूजेने वसुबारस म्हणजेच दीपावलीच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी कृतज्ञतेने पूजा केली जाते. गोसंपदेचा गौरव उत्सव म्हणजे वसुबारसचा सण.



श्रीकृष्ण यशोदेच्या घरी गोकुळात वाढत असताना आपल्या सवंगड्यांसमवेत गाई राखत असे. त्यामुळेच गोपाल नंदन असे नाव श्रीकृष्णांना मिळाले. गोपाळां समवेत श्रीकृष्ण बासरी वाजवायला लागले, की त्या मधुर सुराने गाई आणि वासरे धावत. श्रीकृष्णाच्या भोवती येत आणि त्या बासरीच्या सुरांनी मंत्रमुग्ध होत असा हा प्राचीन काळापासूनचा भारतीय संस्कृतीतला गोमातेचा अपार महिमा. प्राचीन काळात ज्या राजाकडे गाईंचा कळप मोठा तो श्रीमंत समजला जाई. दिवाळीचा हा पहिला दिवस गाईसाठी कृतज्ञतेने समर्पित केला जातो. सवत्स धेनू म्हणजे समृद्धता, संपन्नता, सुफलतेचे प्रतीक. आपल्याला कुटुंबाला आणि प्रजेचेही पालनपोषण करणाऱ्या गोमातेच्या पूजेचा हा अनोखा उत्सव सोहळा उत्तानपाद या राजाने आपली पत्नी सुनीतीसह गाईची विधिपूर्वक पूजा केल्याची कथा पुराणात आहे. अशी ही हजारो वर्षांची परंपरा अखंडपणे सुरू आहे.

देशातल्या आदिवासी भागात गोपालन हाच आदिवासी समाजाचा प्रमुख व्यवसाय आहे. आदिवासी समाजातही गाईला देवतेचे स्थान आहे. गाईचे दूध हे त्यांचे प्रमुख अन्न. अश्विन कृष्ण पक्षाच्या बाराव्या दिवशी वसुबारस हा सण उत्साहाने साजरा होतो. शेणाने सारवलेल्या अंगणात पणत्यांच्या मंद प्रकाशात संध्याकाळी गाई आणि वासराची पूजा कृतज्ञतेने केली जाते. दसऱ्याच्य सुमारास शेतातल्या धान्याची कापणी सुरू होते आणि मळणी केलेले हे धान्य म्हणजेच शेतातली ही लक्ष्मी दिवाळीला घरी येते. गाय, बैल, वासरे आणि घरातले धनधान्य हीच शेतकऱ्याची खरी श्रीमंती असल्याने गोममातेची तिच्या वासरांसह पूजा करताना हे गोमाते तू आमच्यावर अशीच कृपा कायम ठेव. आमचे घर धनधान्याने, समृद्धीने अखंड भरू दे. शेतात चांगले धान्य पिकू दे अशी प्रार्थनाही या नंदिनी देवतेला केली जाते.

**श्रीहरी**

# आयुर्वेदाचे आद्य वैद्यः धन्वंतरी देवता

अश्विन कृष्ण पक्षात धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, आणि भाऊबीज या सलग येणाऱ्या पाच सणांच्या समूहास दिवाळी असे म्हणतात. या काळात शरद ऋतूला प्रारंभ झाला असतो. शेतकऱ्याच्या घरात अन्नधान्याची सुबत्ता असते. गरीब, श्रीमंत, शेतकरी, कामगार, मजुर, बुद्धीजीवी आदी सर्वजण या सणाची आतुरतेने वाट पाहत असतो. शरद ऋतुच्या या काळात दिवस लहान व रात्र मोठी असते. कृष्ण पक्षात अंधाराचा प्रभाव असतो, त्यावर मात करण्यासाठी दिवाळीच्या दिवशी लक्ष.. लक्ष दीप प्रज्वलित करून प्रकाशाचे पर्व निर्माण केल्या जाते.

दिवाळी हा सण दिव्यांचा सण म्हणून जगभरात ओळखला जात असला तरी, दिवाळी ही तन-मन-धनाने मानवास समृद्ध करीत असते. दिवाळी ही धार्मिक, सांस्कृतिक, आत्मिक लाभ देणारी, चैतन्यदायी आरोग्य बळ प्रदान करणारी मंगलदायी असते. आज दिवाळीचा पहिला दिवस, म्हणजेच धनत्रयोदशी. तद्वतच आयुर्वेदाचे आद्य वैद्य धन्वंतरी देवता यांची जयंती. आपण जेव्हा एखाद्या चिकित्सालयात अथवा दवाखान्यात जातो, तेव्हा आपल्याला मोठी उभी असलेली चतुर्भुज मूर्ती दिसते. तीच धन्वंतरी देवता होय. धन्वंतरी देवतेच्या संदर्भात विष्णुपुराणांमध्ये एक आख्यायिका आहे की, समुद्रमंथनाच्या वेळेला ज्या वेळी देव आणि दानव वासुकी साप आणि मेरू पर्वताच्या साह्याने समुद्रमंथन करीत होते. त्यावेळेस समुद्रातून चौदा रत्ने निघाली. त्यामध्ये लक्ष्मी, कौस्तुभ मणी, कल्पवृक्ष, मोराणी, धन्वंतरी, चंद्रदेव, कामदेव, ऐरावत, रंभा-मेनका, सात घोडे असलेले सूर्यदेवाचे वाहन, हलाहल विष, धनुष्य, शंख, आणि अमृतकुंभ ही चौदा रत्ने निघाली होती. त्या पैकी एक धन्वंतरी देवता होय. विष्णुपुराणा प्रमाणेच श्रीमदद्भावतात व गरुड पुराणातही समुद्रमंथनाच्या कथेचा उल्लेख आढळतो. धन्वंतरी देवतेला भगवान विष्णूचा अवतार मानल्या जाते.

पुढे धन्वंतरी देवतेचा जन्म मानव लोकात झाला असेही मानतात. वाराणसी (काशी)या राजवंशात मनुष्य रूपाने जन्मले. काश, दीर्घतपा, धन्वंतरी देवता, केतूमान, भीमरथ्य, देवदास या वंशपरंपरेतील धन्वंतरी देवता होय. या वंशपरंपरेतील देवदास यांनी जगातले पहिले चिकित्सालय काशीमध्ये उभारले होते. आयुर्वेद हे तीन हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात आले आहे असे मानले जाते. धन्वंतरीने आयुर्वेदाचे आठ भाग केलेले आहे. काया (शरीर विज्ञान )बालवैद्य, ग्रह (भूतपिशाच झालेल्या पीडीत्याचे वैद्य) उर्ध्वांग( शिरोभागात व तेथील इंद्रिया पर्यंतचे विकार )शल्य (शस्त्रक्रिये संबंधी चिकित्सा)दंशा (विष चिकित्सा)जरा (आरोग्य वाढवणारे रसायन) आणि वृष (वाजीकरण) अशा आठ भागात आयुर्वेदाचे वर्गीकरण केले आहे. आणि त्याद्वारे रोगोपचार केले जातात. धन्वंतरी देवता ही चतुर्भुज असून तिच्या हातात शंख, चक्र, अमृताचा कलश आणि जडीबुटी (जळू) आहे.

मानवी जीवन तन- मन-धनाविना अपूर्ण आहे. हीच मानवाची भौतिक गरज आहे, ज्यामुळे आपल्या जीवाचे पोषण सुरू आहे, त्या धनाची पूजा लक्ष्मीपूजनाच्या दिवशी करतात. नीती मार्गाने प्राप्त केलेले धन म्हणजे लक्ष्मी. या लक्ष्मी देवतेची पूजा दिवाळीच्या दिवशी करतात. तर आपल्या आरोग्याचे रक्षण करणारी धन्वंतरी देवतेची पूजा धनत्रयोदशीच्या तिथीला वैद्यक करीत असतात.



धनत्रयोदशीचा दिवस हा धन्वंतरी देवतेचा जन्मदिवस होय. आयुर्वेद शास्त्रानुसार कडुनिंबाची उत्पत्तीअमृतापासून झालेली आहे आणि धन्वंतरी देवता अमृततत्त्व देणारी आहे. म्हणून कडुनिंबाच्या पानाचे तुकडे आणि साखर प्रसाद म्हणून धनत्रयोदशीच्या दिवशी दिला जातो. कडुलिंबाची दररोज चार-पाच पाने खाल्ली तर कुठल्याही व्याधी मानवास बळावत नाही, एवढे कडुनिंबाचे महत्त्व. म्हणून धन्वंतरीला प्रसाद म्हणून साखर आणि कडूलिंबाचे पान देण्याचा प्रघात आहे. एकंदरीत धन्वंतरी देवता मानवास आरोग्य बळ प्रदान करणारी आहे.

**शशिकांत तोटे,**
दारव्हा, जि. यवतमाळ
मो :९१३०८३५४५८

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे 'काळी दिवाळी' आंदोलन

■ प्रतिनिधी | अकोला ■

***महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात आणि महायुती सरकारच्या कथित खोट्या कृषी पॅकेजच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) यांच्या वतीने 'काळी दिवाळी' आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष संग्राम भैया गावंडे आणि महानगराध्यक्ष रफिक सिद्दीकी यांनी केले. आंदोलनात पक्षाचे विविध पदाधिकारी, महिला आघाडीच्या सदस्यांनी तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. सर्वांनी काळ्या पट्ट्या, झेंडे आणि बॅनर घेऊन सरकारविरोधात जोरदार निषेध नोंदवला.***

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात राज्य सरकारने जाहीर केलेले ३६,५०० कोटींचे कृषी पॅकेज पूर्णपणे खोटे आणि दिशाभूल करणारे आहे, कारण ही मदत प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीमुळे उद्धवस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने योग्य भरपाई देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.यात शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५० हजार रुपये थेट आर्थिक मदत, जमिनीचा कटाव झालेल्या क्षेत्रासाठी प्रती



हेक्टर ४ ते ४.५ लाखांची मदत, विहिरींसाठी १.५ लाख, पशुधनासाठी १ लाख आणि घरांसाठी ?२.५ लाखांची मदत, तात्काळ सर्वसामान्य कर्जमाफी, पिक विमा ट्रिगर पुन्हा सुरू करून प्रत्यक्ष नुकसानभरपाई आदी मागण्या करण्यात आल्यात.यावेळी जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे म्हणाले 'सरकारने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना दिलासा द्यायला हवा होता, पण त्यांनी फक्त आश्वासनांचा खेळ खेळला. म्हणूनच आम्ही आज 'काळी दिवाळी' साजरी केली आहे.' महानगरा ध्यक्ष रफिक सिद्दीकी म्हणाले'सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राज्यव्यापी मोठे आंदोलन उभारेल.'या आंदोलनात प्रदेश उपाध्यक्ष शामबाबु अवस्थी, जेष्ठ नेते प्रा.कांबळे डॉ.आशाताई मिरगे, संग्राम गुलाबराव गावंडे ग्रामीण जिल्हाध्यक्ष, मो रफिक सिद्दिकी महानगरअध्यक्ष, जावेद जकारिया प्रदेश संघटक सचिव, आनंद वानखडे जिल्हा महासचिव, सैय्यद युसूफ अली कार्याध्यक्ष, देवाभाऊ ताले, कार्याध्यक्ष, जि प सदस्य विशाल गावंडे, गणेश राऊत, अजय पागृत, सतीश गावंडे, किरण ठाकरे, कैलास गोंडचोर, श्रेयस चौधरी, मर्दानेजी, राम कोरडे, मेहमूद खान पठाण पश्चिम विधानसभा अध्यक्ष, पापाचंद पवार, अँड संदीप तायडे, बाबासाहेब घुमरे, शौकत अली, मोहम्मद साफिक उर्फ पप्पु भाई, रजिक इंजिनियर खान, अल्ताफ खान, चंदू भाई चांदखां, मेहबूब भाई मंटूवाले, मिलिंद गवई, उमेश खंडारे, रमजान शेख, शाहीद सिद्दीकी, वसीम खान, रमेश नाईक, अमन घरडे, सय्यद तनवीर अकोट, रामेश्वर विश्वनाथ वाघमारे, चैतन्य रमेश तार्वे, प्रेम गावंडे, गजानन बाबुरावजी आखारे, रुपेश कांबळे, सुगत तायडे, सौ विद्या अंभोरे, सौ कोकिला माहूरवाघ, सरला ताई वरघट, सुनिता ताठोड, सरोज इंगळे, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष गजानन भटकर, कार्याध्यक्ष सुनील वनारे, सुनील महल्ले, शामराव वाहूरवाघ, रशीद शाहू, जॉन्सन वरघत, मंगेश कुकडे तालुका अध्यक्ष मोतीजापूर, इंजी. निजामभाई, राजेंद्र मोहोळ, गोपालराव कडाळे, चंद्रमणी तायडे, गणेश राऊत, अमोल शिंदे, सागर कावरे, गोपाल वाघमारे, शिवाजी म्हैसणे, अक्षय भगेवार, विष्णू लोडम आनंद पवार, विकी लाखे यांच्या समवेत जिल्हाभरातील व महानगरातील शेकडो पदाधिकारी, उपस्थित होते.



# तब्बल दीड कोटींच्या नकली सोने-चांदी प्रकरणातील आरोपी पिता-पुत्रास जामीन मंजूर

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्वतःचे सोने–चांदीचे दुकान नसतानाही दुसऱ्याच्या दुकानाचा आधार घेत तब्बल दीड कोटी रुपयांचा नकली सोने–चांदीचा ऐवज विकून फसवणूक करणाऱ्या आरोपी पिता–पुत्रास न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

घटनेचा सविस्तर तपशील असा की, रामदासपेठ पोलीस ठाणे हद्दीतील नर्गिस शब्बीर हुसेन कादियानी यांनी तक्रार दाखल केली होती की, आरोपी अमोल मनोहर नेरकर आणि त्यांचे वडील मनोहर शालिग्राम नेरकर या दोघांनी विश्वास संपादन करून वारंवार पैसे घेतले व त्याबदल्यात १ किलो ४३० ग्रॅम सोने, फिर्यादींच्या मुलीस २५० ग्रॅम सोने, तसेच ३७ किलो चांदीचे दागिने दिले.

सदर ऐवज 'आयुष ज्वेलर्स' या दुकानातून तयार केल्याचा बनाव आरोपींनी केला होता. मात्र, काही दिवसांनी सोने–चांदीबाबत शंका आल्याने फिर्यादींनी त्याची गुणवत्ता तपासली असता सर्व ऐवज नकली असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर त्यांनी रामदासपेठ पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली. तक्रारीनुसार पोलिसांनी आरोपी पिता–पुत्रांविरुद्ध भारतीय न्यायसंहिता (BNS) कलम ३१८ (४), ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली होती. न्यायालयीन कोठडी संपल्यानंतर आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. या प्रकरणात आरोपींचे विधीज्ञ अमोल चक्रे, विधीज्ञ विद्यासागर अलोणे, विधीज्ञ विजय वानखडे, विधीज्ञ संजय कमल आणि अशोक देशमुख यांनी केलेल्या प्रभावी युक्तिवादानंतर मुख्य न्यायदंडाधिकारी एस. ए. बजाज यांच्या न्यायालयाने १५,००० रुपयांच्या जातमुचलक्यावर दोन्ही आरोपी पिता–पुत्रांना जामीन मंजूर केला आहे.

## जिल्हा उद्योग केंद्राच्या कर्ज संदर्भात मार्गदर्शन शिबिर

**अकोला :** स्थानिक अकोट फैल परिसरातील इराणी मोहल्ला येथे जिल्हा उद्योग केंद्राचे मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले. माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरात जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी प्रसन्न रत्नपारखी उपस्थित होते.

## २६ ऑक्टोबरला राज्यस्तरीय मराठा उपवर युवक - युवती परिचय मेळावा

**अकोला जिल्हा मराठा मंडळ व पाटील सेवा समितीचे आयोजन**



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्हा मराठा मंडळ व पाटील बहुउद्देशीय सेवा समिती ची संयुक्त बैठक अकोला जिल्हा मराठा मंडळ कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीत सामुहिक विवाह, कमीत कमी खर्चात लग्न सोहळे, शैक्षणिक, सामाजिक विषयावर मंथन झाले.दरवर्षी प्रमाणे दिवाळी सुटीत राज्य स्तरीय मराठा उपवर युवक युवती परिचय मेळाव्या चे आयोजन रविवार दि. २६ ऑक्टोबर ला स्व. नामदेवराव पोहरे स्मृती सभागृह, मराठा मंडळ रामदास पेठ येथे केले आहे.

मुला मुलींचे लग्न जुळविणे ही समाजा समोर एक गंभीर समस्या उभी ठाकली आहे. गेल्या तीन चार दशकां पासुन अकोला जिल्हा मराठा मंडळ व पार्टील बहुउद्देशीय सेवा समितीने या कार्यासाठी पुढाकार घेऊन दरवर्षी उपवर युवक युवतीं चे परिचर संमेलन आयोजित करून एक विचारपीठ उपलब्ध करून दिले आहे. सुरुवातीला जिल्ह्या पुरता सिमित असलेल्या मेळाव्याने आता राज्य स्तरीय रूप धारण केले आहे. शेजारच्या मध्यप्रदेशा, छतीसगढ, कर्नाटक, तेलंगणा, गुजरात मधुन मोठ्या प्रमाणात समाज बांधव या मेळाव्यास उपस्थित असतात. हा राज्यस्तरीय परिचय मेळावा आयोजनासाठी कृषीकीर्तनकार महादेवराव भुईभार, महाबीज चे संचालक डॉ. रणजीत सपकाळ, पाटील बहुउदेशीय सेवा समिती चे सचिव श्रीकृष्ण विखे, अकोला जिल्हा मराठा मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटील, दिवाकर पाटील आदी परिश्रम घेत आहेत.

# बाबूजी देशमुख वाचनालय वक्तृत्व स्पर्धा



**शालेय गटात प्रभातची आनंदी मोडक तर महाविद्यालय गटात नथमल गोयनका लॉ कॉलेजची निकीता दुबे प्रथम**

■ प्रतिनिधी | अकोला ■

बाबूजी देशमुख वाचनालय अकोला चे वतीने महात्मा गांधी जयंती निमित आयोजित वक्तृत्व स्पर्धेत शालेय गटात प्रभात स्कुल ची कु. आनंदी राजेश मोडक व महविद्यालय गटात नथमल गोयनका लॉ कॉलेजची कु. निकीता अरुणकुमार दुबे प्रथम क्रमांक व रनिंग ट्रॉफी ची मानकरी ठरली. बाबूजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार यांचे हस्ते विजेत्या स्पर्धकांना स्मृती चिन्ह व रनिंग ट्रॉफी देवून सन्मानीत करण्यात आले.

शालेय गट - विषय - 'गांधीजींचे चरित्र आणि कार्य' - प्रथम क्रमांक- कु. आनंदी राजेश मोडक( प्रभात किड्स स्कुल ), व्दितीय क्रमांक -स्मित सचिन भोयर( स्कुल ऑफ स्कॉलर अकोला), तृतीय - कु शार्वी राजेश ओळंबे ( कोठारी कॉन्व्हेंट )महाविद्यालय गट - विषय - 'आजच्या काळात गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता ' प्रथम क्रमांक -कु. निकिता अरुणकुमार दुबे( नथमल गोयंका लॉ कॉलेज), व्दितीय क्रमाक - आदित्य महादेव डोळे (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र राधादेवी गोयनका महाविद्यालय ), तृतीय क्रमांक -कु.मयुरी राजेश वाहने (श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला ) यांना पुरस्कार मिळाला.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. विवेक हिवरे, प्रा. एम. पी.मिश्रा, प्रा. बबनराव कानकिरड यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. मोहन खडसे यांनी केले. ग्रंथपाल सुरेश टेके, सतिश डंगवाले, जुगल शिरसाट, नितीन कदम, स्वप्नील ताथोड, सुनिल मिश्रा यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी अथक परिक्रम घेतले.

# निकुंज भाला याची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

■ प्रतिनिधी | अकोला ■

निकुंज भाला याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.त्याने अमरावती विभागीय १४ वर्षाखालील शालेय बुद्धिबळ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करीत घवघवीत गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला.या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची महाराष्ट्र राज्य शालेय बुद्धिबळ स्पर्धा २०२५ साठी निवड झाली आहे.ही स्पर्धा वसंत देसाई जिल्हा स्टेडियम येथे पार पडली.या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र राज्य शालेय क्रीडा विभाग व अकोला जिल्हा क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.निकुंज हा स्पर्धेत ११ वा मानांकित खेळाडू असून त्याने सर्वांना प्रभावित करणारे सशक्त प्रदर्शन सादर केले.स्पर्धे दरम्यान त्याने आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडूचा पराभव करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. निकुंज याचे प्रशिक्षक प्रवीण हेंड यांनी सांगितले की, 'निकुंज हा अत्यंत मन लावून सराव करणारा आणि खेळाबद्दल प्रचंड आवड असलेला विद्यार्थी आहे.



# शासकीय आदिवासी आश्रम शाळेत शिक्षकांच्या रिक्त जागा बाह्यस्त्रोताद्वारे भरणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

आदिवासी विकास आयुक्तांच्या आदेशान्वये शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांची रिक्त असलेली पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात येत आहेत.

त्यासाठी मे. छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था आणि मे, महाराष्ट्र विकास ग्रुप या संस्थांना आदेश देण्यात आला आहे. या संस्थांमार्फत शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत आहे. या संस्थांमार्फत शासकीय आश्रमशाळेवर याआधी नियुक्ती देण्यात आलेल्या शिक्षकांपैकी काही शिक्षक हे अद्याप शाळेवर हजर झाले नाहीत. त्यामुळे अकोला, वाशिम व बुलढाणा या कार्यक्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा आढावा घेण्यात आला. जे शिक्षक अद्याप हजर झालेले नाहीत त्या जागांचा विचार करून विषयानुसार रिक्त जागांनुसार पुन्हा अर्ज मागविण्यात आले आहेत. पात्र उमेदवारांना दि. २० ते दि. ३१ ऑक्टोबर दरम्यान ऑनलाईन अर्ज करता येतील.

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८९२/२०२५ प्रोसेस नं. १७११५/२०२५
चौ.ता. २६/११/२०२५ दिनांक : ०९/१०/२०२५

**अर्जदार :** १. तृप्ती प्रकाश काकड २. अवंती प्रकाश काकड ३. सुमित्रा विठ्ठलराव काकड सर्व रा. अष्टविनायक कॉलनी, मंगरूळपीर रोड, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रकाश विठ्ठलराव काकड
**पत्ता :-** रा. अष्टविनायक कॉलनी, मंगरूळपीर रोड, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रकाश विठ्ठलराव काकड यांचे दि. ०७/०९/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २६/११ / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८८८/२०२५ प्रोसेस नं. १७४६१/२०२५
चौ.ता. २८/११/२०२५ दिनांक : १६/१०/२०२५

**अर्जदार :** विजय मधुकर जोशी रा. रा. संत तुकाराम हॉस्पिटलच्या मागे, सरस्वती नगर, रिंग रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मालती मधुकर जोशी
**पत्ता :-** रा. संत तुकाराम हॉस्पिटलच्या मागे, सरस्वती नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मालती मधुकर जोशी यांचे दि. ०९/०८/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारसं नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# महावितरणमधील ग्राहकसेवा कार्यालयांच्या पुनर्रचनेला अकोला परिमंडळात प्रारंभ

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

महावितरण अंतर्गत थेट ग्राहकसेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार मनुष्यबळ पुनर्रचना करण्यात आली आहे. या पुर्नरचनेला अकोला परिमंडळात सोमवारपासून प्रारंभ झाला आहे. इज ऑफ लिव्हींगनुसार महावितरणमधील बदल ग्राहकाभिमूख आणि कर्मचारीभिमूखही असून अभियंते व कर्मचारी या बदलाला तेवढ्याच सक्षमतेने आत्मसात करतील असा विश्वास मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी व्यक्त केला आहे.

महावितरणमध्ये उपविभाग व शाखा कार्यालयांद्वारे नवीन वीजजोडणी, मासिक वीज बिल, सुरळीत वीजपुरवठ्यासाठी वीज यंत्रणेची नियमित देखभाल, तांत्रिक बिघाडांची दुरुस्ती, वीजबिलांची थकबाकी वसुली, वीजहानी कमी करणे आदी कामे करण्यात येतात. त्यामुळे अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांना एकाच वेळी १० ते १२ प्रकारची कामे करावी लागत आहे. ही रचना सुमारे २५ वर्षांपूर्वीची आहे व त्यावेळच्या ग्राहक संख्येनुसार करण्यात आली होती. पूर्वीच्या रचनेचा परिणाम गेल्या काही वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर आणि ग्राहकसेवेवर देखील झालेला दिसून येत आहे. त्यामुळे सरसकट कामांचा ताण कमी करून निवडक कामांची जबाबदारी द्या अशी मागणी गेल्या १० वर्षांपासून कर्मचार्‍यांच्या विविध संघटनांद्वारे करण्यात येत होती. व्यवस्थापनाने त्यासाठी विशेष समिती स्थापन करून कर्मचारी संघटनांशी वेळोवेळी चर्चा करून पुनर्रचनेचे प्रारूप तयार केले आहे. प्रामुख्याने थेट ग्राहक सेवा देणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयांच्या पुनर्रचनेवर भर देण्यात आला आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९४०/२०२५ प्रोसेस नं. १७५३७/२०२५
चौ.ता. २९/११/२०२५ दिनांक : १७/१०/२०२५

**अर्जदार :** १. विजय भावसिंग राठोड रा. सोनल निवास, आनंद नगर, हिंगणा रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. प्रशांत विजय राठोड उर्फ प्रशांत विजय आडे रा. सोनल निवास, आनंद नगर, हिंगणा रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. हेमंत विजय राठोड उर्फ हेमंत विजय आडे रा. सोनल निवास, आनंद नगर, हिंगणा रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुनंदा विजय राठोड
**पत्ता :-** रा. सोनल निवास, आनंद नगर, पो. गांधीनगर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुनंदा विजय राठोड यांचे दि. ०२/११/२०२४ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्रास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. चंद्रशेखर रामचंद्र देशपांडे, रा. गुरूदत्त नगर, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला यांच्या मालकीची व ताब्यातील रजि. खरेदीखत क्र. ३६४४/२०१६ अन्वये विकत घेतलेली मौजे जि.प. पं.स.र.सी. र.डी. अकोला ग्रा.पं. भौरद चे जुन्या हद्दीतील व आताच्या अकोला म.न.पा. च्या हद्दीतील मौजे तपलाबाद, प्र. ता. जि. अकोला येथील शेत सर्वे नं. १३/४ चे जमीनीचे वि.एस.डी.ओ. साहेब, अकोला यांचे फाईलवरील रे.के.नं. एन. ए.पी. ३४/ तपलाबाद/२०/ १९९७-९८ नि.ता. ०८/०५/१९९८ प्रामणे गुरूदत्त नगर या नावाने पास झालेल्या लेआउट नकाशातील अ.नं. ८३ चा खुला प्लॉट यापैकी माझे मालकीचा पुर्व पश्चिम वाटणीने दक्षिणेकडील भागाचा प्लॉट व त्यावरील घर.

इतका प्लॉट व या प्लॉटवर ग्रा.पं. भौरदचे ठराव क. ६ ने दि. २८/०७/२००४ नुसार बांधकाम परवानगी घेववून ग्राउंड फ्लोअरचे ७३.९१ चौरस मिटर त्यातील असलेल्या ३ रूम, संडास बाथरूम तसेच ग्रा.पं. भौरदचे ठराव क. ६ ने दि. ०२/०९/२००६ नुसार बांधकाम परवानगी घेवून पहिल्या माळयाचे ३६.४३ चौरस मिटर त्यातील असलेल्या २ रूम, संडास बाथरूम असे दोन्ही मिळून एकुण क्षेत्रफळ ११०.३४ चौ. मिटरचे आर.सी.सी.चे पक्के स्लॅबचे बांधकाम असलेले घर त्यातील इलेक्ट्रीक मिटरचे ट्रान्सफर हक्कासह, बोअरवेल मोटरसह, दरवाजे, खिडक्या व इतर सर्व तदंगभुत वस्तुसह स्थावर मालमत्ता घर.

त्यास चतु:सिमा : पुर्वेस - अ.नं. ८२ चा प्लॉट, लेआउट रोड पश्चिमेस- लेआउट रोड. उत्तरेस - श्री. अंजनकार यांचे यातील प्लॉट, दक्षिणेस - लेआउट रोड. याचे एकुण क्षेत्रफळ : ९३.९६ चौ.मिटर १०११.०० चौ. फुट

वरील चतु:र्सिमेतील प्लॉट व घर आमचे पक्षकार यांच्या ताबा व मालकीचा असुन सदरहु मालमत्तेचा कोणीही कोणासही खरेदी विक्री किंवा व्यवहार करू नये. सदरहु मालमत्तेचा जिल्हा उपनिबंधक कार्यालय, अकोला येथे आशिष बाबाराव सरदार याचे विरूध्द अवैद्य सावकारीचे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. सदरहु मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये. केल्यास सदर खरेदी विक्री ही बेकायदेशीर ठरविल्या जाणार. त्यास होणाऱ्या परिणामास व खर्चास तुम्ही स्वतः जबाबदार राहाला.

अकोला
दि. १८/१०/२०२५

**ॲड. पी.आर. तायडे,**
मुख्य पोस्ट ऑफीस समोर, गोयंका कॉम्प्लेक्स,
पहिला मजला, ३ रे चेंबर, अकोला,
ता. जि. अकोला. मो.नं.८७६७५९१९२८, ९०९६९१४२४०

# मुर्तिजापूर नगर परिषद मुर्तिजापूर

## निविदा सुचना क्रमांक बांधकाम / २०२५-२०२६

नगर परिषद मुर्तिजापूर जिल्हा अकोला चे वतीने मुख्याधिकारी नगर परिषद मुर्तिजापूर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खालील कामाची निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | अनामत रक्कम रुपये | निविदा प्रपत्राची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | **योजनेचे नाव :- जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२०२६ अंतर्गत** | | | | |
| १ | मुर्तिजापूर शहरात प्रभाग क्र. १२ मध्ये साबू यांचे घरापासून ते मेन रोडपर्यन्त नालीसह स्लॅब कलव्हर्टचे बांधकाम करणे पुढे ठाकरे यांचे घरापासून ते मेन नाल्यापर्यंत नाली व रपटा बांधकाम करणे. | १०,००,०००/- | १०,०००/- | १०००/- | ६ महीने |
| २ | मुर्तिजापूर शहरात प्रभाग क्र. ०७ मध्ये सरोदे यांचे घरापासून ते मेन रोडपर्यन्त नालीचे बांधकाम करणे. गुल्हाणे यांचे घरापर्यंत नाल्याचे बांधकाम करणे. | १०,००,०००/- | १०,०००/- | १०००/- | ६ महीने |
| ३ | प्रभाग क्र ०२ मध्ये गुल्हाने यांचे घरापासून ते बनारसे याचे घरापर्यंत नाली व रपटा बांधकाम करणे. | ५,००,०००/- | ५०००/- | ५००/- | ६ महीने |
| ४ | प्रभाग क्र १२ मध्ये वाघ यांचे घरापासून डी.पी रोड पर्यंत नाली व रपटा बांधकाम करणे. | ५,००,०००/- | ५०००/- | ५००/- | ६ महीने |
| ५ | प्रभाग क्र १२ मध्ये तिडके यांचे घरापासून मेन नाल्या पर्यंत नाली व रपटा बांधकाम करणे. | ५,००,०००/- | ५०००/- | ५००/- | ६ महीने |
| ६ | प्रभाग क्र ०२ मध्ये गुप्ता यांचे घरापासून ते गुल्हाने याचे घरापर्यंत नाली व रपटा बांधकाम करणे. | ५,००,०००/- | ५०००/- | ५००/- | ६ महीने |

**निविदा व तसेच आवश्यक कागदपत्रे सादर करावयाचा दिनांक व वेळ**

| | |
|---|---|
| निविदा प्रकाशित करण्याची दिनांक | १८/१०/२०२५ सकाळी सकाळी ११.०० |
| निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ आवश्यक कागद पत्रे जमा करण्याचा अंतिम दिनांक | २७/१०/२०२५ सकाळी ५.०० वाजे पर्यन्त |
| अनामत भरणा करण्याची दिनांक | २७/१०/२०२५ सायंकाळी ५.०० वाजे पर्यन्त |
| ऑफलाइन निविदा उघडण्याची दिनांक व वेळ | २८/१०/२०२५ दुपारी ५.०० वाजता |

सदर कामाच्या अटी व शर्ती कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर पाहावयास मिळेल.

क्रमांक नपमु / मुअ / बावि / २७/२०२५
दिनांक :- १७/१०/२०२५

**मुख्याधिकारी**
नगर परिषद मुर्तिजापूर

# बोरगावच्या सत्तासंतुलनाचा खेळ उलटा

## नव्या चेहऱ्याच्या एन्ट्रीने जुन्या पक्षांत भगदाड, भेटवस्तूंचं राजकारण तापलं

**वर्धा/जनमाध्यम**
बोरगावचा राजकीय पट सध्या अक्षरशः पेटलेला आहे, अंबिका हिंगमिरे या नव्या चेहऱ्याच्या एन्ट्रीनं इतकी झळ दिली की, जुन्या राजकीय मंडळींनी चप्प बसणंच पसंत केलं आहे. पारंपारिक काँग्रेस आणि भाजपच्या वर्चस्वाखालील हा मतदारसंघ अचानक नव्या समीकरणांच्या भोवऱ्यात अडकला आहे. गिफ्ट पॉलिटिक्स नंतर आगीवर तेल ओतल्यासारखं काम केलंय! नागरिकांमध्ये भेटवस्तूंचं वाटप सुरू होताच राजकीय चर्चांना ऊत आला आहे. हिंगमिरे यांच्या प्रचाराचे तंत्र वेगळं आणि धारदार आहे. त्यांनी गेल्या काही महिन्यांत समाजकल्याणाचे नवनवीन उपक्रम हाती घेतले.

विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्यवाटप, महिलांसाठी आरोग्य शिबिरे, तरुणांसाठी क्रीडा साहित्य, रक्तदान आणि वृक्षारोपण मोहिम या सर्व कार्यक्रमांद्वारे त्यांनी जनतेशी थेट नाळ जोडली आहे. पारंपारिक नेत्यांची केवळ भाषणे आणि आश्वासनांच्या पलीकडे जाऊन ती थेट कृतीत उतरली आहे. त्यामुळे विशेषतः युवक व महिलावर्ग त्यांच्या कार्यशैलीकडे आकर्षित होत आहे.येत्या निवडणुकीत बोरगावमध्ये त्रिकोणी



लढतीचे पूर्ण संकेत दिसत आहेत. काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांचे काही गट अजून आरक्षणाच्या निर्णयाची वाट पाहत शांत आहेत. आरक्षण उलटं पडलं, तर आमची खुर्ची गेलीच अशी भीती काही सत्ताधारी नेत्यांच्या चेहऱ्यावर जाणवते. उलट, हिंगमिरे यांनी या गोंधळात स्वतःचा प्रचार जोरात सुरू ठेवत नव्या उमेदीचा झेंडा रोवला आहे.विरोधक मात्र तिच्या गिफ्ट वितरण मोहिमेवर टीका करत म्हणतात की, जनतेला मोहात पाडण्याचं नवं साधन सुरू झालं आहे. पण जनतेच्या मनात वेगळीच हवा आहे. ती काम करण्यासाठी आलीय, आश्वासनं देण्यासाठी नाही, अशी भावना बोरगावच्या गल्लीबोळांत स्पष्ट ऐकू येते.स्थानिक विश्लेषकांचं मत एकमतानं आहे की, या वेळी बोरगावात राजकीय समीकरणं पूर्णपणे बदलू शकतात. हिंगमिरे यांच्या एन्ट्रीनं पारंपारिक सत्तासंघर्षाचं चित्र मोडून काढलं आहे. काँग्रेस-भाजपच्या गोटांत अस्वस्थता पसरली असून अनेक वरिष्ठ नेते परिस्थितीवर बारीक नजर ठेवून आहेत. बोरगावच्या या सत्तासंतुलनाच्या खेळात आता नवा खेळाडू मध्यभागी उतरला आहे. जनता उत्सुकतेने विचारत आहे, या नव्या चेहऱ्याचा दम एवढाच की सत्तेचा दरवाजा उघडायचा येणाऱ्या निवडणुकीत या प्रश्नाचं उत्तर मिळणार, पण एक मात्र स्पष्ट बोरगावचं राजकारण आता झोपणार नाही.

# गांजाची अवैध विक्री उघडकीस; गुन्हे शाखेची कारवाई

**कारंजा (घा.)/जनमाध्यम**
वर्धा जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्री रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने मोहिम सुरू केली असून, या मोहिमेअंतर्गत कारंजा (घा.) येथे गांजा विक्री करणाऱ्या महिलेसह दोन जणांना अटक करून मोठा गांजा साठा जप्त करण्यात आला आहे.

दि. १६ ऑक्टोबर रोजी गुन्हे शाखेचे पथक कारंजा (घा.) हद्दीत गस्त घालत असताना, दुर्गा नगर वार्ड नं. १ येथील रहिवासी कमल सोनी हि गांजा विक्रीचा अवैध व्यवसाय करत असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे तिच्या घरावर छापा टाकण्यात आला. कारवाई दरम्यान सोनीसोबत गांजा खरेदीसाठी आलेला क्रिष्णा मिसरीलाल कंजर (रा. इतवारा बाजार, वर्धा) हाही ठिकाणी आढळला.झडती



दरम्यान ३ किलो १४५ ग्रॅम गांजा, ५१ हजार रुपये रोख, दोन मोपेड आणि दोन मोबाईल असे एकूण ३ लाख ४ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासात समोर आले की सोनीला तिचा जावई सुजीत सोनी (रा. कारंजा) याने हा गांजा पुरवला होता, तर कंजर हा संगीता कंजर (रा. इतवारा बाजार) हिच्या सांगण्यावरून गांजा खरेदीस आला होता.या प्रकरणी सर्व आरोपींविरुद्ध एन.डी.पी.एस. कायदा अंतर्गत कारंजा (घा.) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कार्यवाही पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, पो.नि. विनोद चौधरी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली.

या पथकात सलाम कुरेशी, अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, निलीमा उमक, रवि पुरोहित आणि अभिषेक नाईक यांचा समावेश होता.

## संक्षिप्त

### पेट्रोल-डिझेलचा काळाबाजार करणारे गळाला

**सेलू-** सेवाग्राम पोलिसांनी पवनार भागातील शाही तडाका धाबा भागात १५ रोजी धडक कारवाई करून पेट्रोल-डिझेलचा सुरू असलेला काळाबाजार उघडकीस आणला. या कारवाईत पोलिसांनी २७ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शिवाय पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे सेवाग्राम पोलिसांच्या चमूने पवनार शिवारातील शाही तडका धाबा परिसरात छापा टाकला. या ठिकाणी पोलिसांनी बारकाईने पाहणी केली असता तेथे पेट्रोल-डिझेलचा काळाबाजार केला जात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी संबंधित ठिकाणाहून एम. एच. ३२ ए. एस. ४८४३ क्रमांकाची कार, १२ कॅनमधील पेट्रोल तर ८ कॅनमधील डिझेलचा ट्रॅकर, ट्रॅकर मधील ३७०० लीटर डिझेल, एम. एच. ३७ ए. बी. ११९९ क्रमांकाची दुचाकी असा एकूण २७ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. संबंधित प्रकरणी ईस्ताक मेहबुब शेख रा. विकास चौक सेलू, अतुल आनंद बागडे रा. मध्यप्रदेश, शुभम लिलाधर आगासे रा. तिरोडा जि. गोंदिया, ब्रिजेशकुमार अंगप्रसाद पटेल रा. मध्यप्रदेश, अजमद खान आरिफ खान रा. बेलगाव ता. सेलू यांच्याविरुद्ध सेवाग्राम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चोरट्याने पळविल्या चार म्हशी

**कारंजा -** अज्ञात चोरट्याने शेतशिवारात बांधून असलेल्या चार म्हशी चोरून नेल्या. ही घटना कारंजा तालुक्याच्या धामकुंड येथे घडली असून पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या घटनेमुळे गोपाल पांडुरंग कालोकार रा. धामकुंड यांच्या मुलीचे ४८ हजारांचे नुकसान झाले आहे.

### गोठ्यातील दोन शेळया लंपास

**वर्धा-** अज्ञात चोरट्याने गोठ्यात बांधून असलेल्या दोन शेळया चोरून नेल्या. ही घटना वर्धा तालुक्यातील जऊळगाव शेत शिवारात घडली असून तक्रारीनंतर उघडकीस आली. या प्रकरणी प्रशांत दिगांबर चौधरी यांनी सेवाग्राम पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### आजाराला कंटाळून आत्महत्या

वडनेर - आजाराला कंटाळून ७५ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केली. ही घटना वडनेर पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील काचनगाव शिवारात घडली. हरिभाऊ रामराव घुगुसकर रा. काचनगाव असे मृताचे नाव आहे. हरिभाऊ यांनी कीटकनाशक प्राशन केल्याचे लक्षात येताच त्यांना सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान हरिभाऊ यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी वडनेर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

# दिवाळी सण साजरा करतांना खबरदारी घेण्याच्या सूचना

**वर्धा/जनमाध्यम**
दिवाळी सण साजरा करतांना नागरिकांनी आग सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा, आरोग्य आणि आपत्कालीन तयार, इमारत व विद्युत सुरक्षा बाबत खबरदारी घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश खताळे यांनी केले आहे.

**आग सुरक्षा** - फक्त परवानाधाक फटाके विक्रेत्यांकडून फटाके खरेदी करावे, फटाके मोकळया जागेत आणि ज्वलनशील वस्तूपासून दूर फोडावे, जवळ पाण्याची बादली, वाळू आणि अग्नशामक यंत्र ठेवा, मुलांना फटाके फोडतांना प्रौढांचे मार्गदर्शन आवश्यक आहे. कापसाचे कपडे वापरा, कारण ते आग पसवरण्याचा धोका कमी करतात. फटाके फोडायला अगरबत्ती अथवा मोमबत्ती वापरा.

**पर्यावरण सुरक्षा** - इको फ्रेंडली दिवाळी साजरी करा, सामुहिक कार्यक्रम आयोजित करा, ज्यामुळे वैयक्तिक फटाक्यांचा वापर कमी होतो. फटाक्यांचा कचरा योग्य प्रकारे विल्हेवाट लावा.

**आरोग्य आणि आपत्कालीन तयारी** - प्राथमिक उपचार पेटी जवळ ठेवा, जवळचे रुग्णालय आणि आपत्कालीन क्रमांक माहिती ठेवा. मोठ्या कार्यक्रमांची माहिती स्थानिक प्रशासनाला द्या, फटाक्यांमुळे निर्माण होणारे प्रखर प्रकाश आणि स्फोटातून उडणारे घातक रायायनिक कण यामुळे डोळ्याला गंभीर दुखापत होऊ शकते. यासाठी सुरक्षित अंतरावरुन फटाके हाताळा आणि शक्य असल्यास संरक्षित चष्मा घाला. किरकोळ भाजलेले अथवा लासलेला भाग थंड पाण्याने लगेच धुआ, फटाक्यातून निर्माण होणारा धूर नाका तोंडावाटे शरीरात जाऊन निर्माण होणाऱ्या दमा तसेच श्वसनाच्या इतर समस्या टाळण्यासाठी सुरक्षित मास्कचा वापर करा.

**इमारत व विद्युत सुरक्षा** - सर्व विद्युत सजावट तपासा, शार्ट सर्किट किंवा ओव्हरलोड होऊ नये, प्रमाणित विद्युत उपकरणे वापरा, तात्पुरती वायरिंग टाळा, निर्गमन मार्ग सजावटीमुळे अडवू नका. घरात पुजा तसेच सजावटीसाठी पेटवलेले दिवे अथवा मेणबत्या ज्वलनशील पदार्थाजवळ ठेऊ नका, फटाक्यांपासून अचानक निर्माण होणाऱ्या मोठ्या आवाजामुळे कानाला दुखापत अथवा श्रवणशक्ती कमी होऊ नये याकरीता कानात कापूस घाला. कान झाका, आणि शक्य असल्यास विना आवाजाचे फटाके वापरा. दिवाळीच्या उत्सवादरम्यान आवश्यकता नसल्यास घरातील गॅस सिलेंडरचे रेग्युलेटर बंद करा.

**आग आणि दुखापत टाळा** - फटाके कोरड्या झाडाझूडपाजवळ, गॅस सिलेंडर किंवा वाहनाजवळ फोडू नये, मुलांना फटाके एकटे फोडू देऊ नये, न फुटलेले फटाके पुन्हा पेटवू नका त्यांना पाण्यात टाका, फटाके फोडायला माचीस किंवा लाइटर वापरु नये, फटाका फोडतांना इतर फटाके जवळपास ठेऊ नका, मोठी झाडे किंवा विजेचे तार असलेल्या जागी रॉकेट किंवा हवेत फुटणारे फटाके फोडू नका.

**पर्यावरणीय धोके** - बंद किंवा गर्दीच्या जागेत कचरा किंवा फटाके जाळू नका, अत्यंत आवाज करणारे फटाके वापरु नका, ध्वनी प्रदुषण नियमांचे पालन करा, फटाक्यांच्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावा.

**आरोग्य आणि सुरक्षा** - जळजळ, श्वासोच्छवासाचा त्रास किंवा डोळ्यांची दुखापतीकडे दुर्लक्ष करु नका, आपत्कालीन मार्ग वाहन किंवा सजावटीमुळे अडवू नका, जास्त दिवे एका सॉकेटमध्ये लावून विद्युत ओव्हरलोड करु नका, भाजलेल्या जागी टूथपेष्ट किंवा बर्फ लावू नये, प्राण्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने त्यांचा जवळपास फटाके फोडू नका, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने कळविले आहे.

## विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद

# जुनगडच्या गाडगे महाराज आश्रम शाळेत सण साजरा



**सेलू/जनमाध्यम**
जुनगड येथील संत गाडगे महाराज प्राथमिक आश्रम शाळेत दिवाळीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थीनींनी पहाटे उटणे लावून अभ्यंगस्नान केले, नवीन कपडे परिधान करून संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. सकाळी आठ वाजता विद्यार्थ्यांना चिवड्याचा फराळ वाटप करण्यात आला, तर सायंकाळी गोडधोड पदार्थांसोबत दिवाळीचे जेवण देण्यात आले.रंगीत रांगोळ्या, फटाक्यांचा कडकडाट आणि इमारतीवरील रोषणाईमुळे परिसर उजळून निघाला. विद्यार्थ्यांचा आनंद पाहून शिक्षक आणि कर्मचारी भावूक झाले. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना सुवासिक तेल, उटणे व साबण असे दिवाळीचे साहित्य वाटप करण्यात आले.या सोहळ्यात संचालक मोरेश्वर पाटील, मुख्याध्यापक रमेश कोठेकर, रामनाथ (काका) पाटिल, जी.एन. चंदनखेडे, गोकुल डाबेराव, ज्ञानेश्वर घोंगटे, अरविंद मडावी आणि राजाभाऊ वाकपांजर आदी उपस्थित होते.

# ट्रॅक्टर टँकर चालकास काठीने मारहाण

**कारंजा -** ट्रॅक्टर टँकर बाजूला कर असे म्हणत वाद करून थंड पाण्याच्या कॅन वितरित करणा-या मालवाहू चालकाने वाद करून ट्रॅक्टर टँकर चालकास काठीने मारहाण करून जखमी केले. ही घटना कारंजा येथील इंदिरा नगर भागात घडली. रामेश्वर हरीभजन ढोबाळे रा. कारंजा असे जखमीचे नाव आहे. त्यास प्रफुल सातपुते रा. इंदिरा नगर कारंजा याने मारहाण केल्याचे तक्रारीत नमुद केले.

**क्षुल्लक कारणावरून मारहाण**

**वर्धा-** चारचाकी वाहनाने धडक देत दुचाकीचे नुकसान करण्यात आले. दुचाकी मालकाने भरपाईची मागणी केली. अशातच वाद करून दुचाकी चालकास मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना १५ रोजी बोरगाव मेघे भागातील कळंबे ले-आऊट परिसरात घडली. जखमी मारोती अजाब टाले रा. कळंबे ले-आऊट बोरगाव मेघे यांच्या तक्रारीवरून कळंबे ले-आऊट बोरगाव मेघे भागातील रहिवासी रवी भगवानदास मोनानी याच्याविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पुराने शेत खरडले; अरुण चवडे यांच्या मदतीने शेतकऱ्याला नवा दिलासा

**वर्धा/जनमाध्यम**
अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे शेतजमीन खरडून गेलेल्या देवळी तालुक्यातील गौळ येथील तरुण शेतकरी जगदीश भोयर यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे शहराध्यक्ष अरुण चवडे यांनी आर्थिक मदत देत संवेदनशीलतेचा सुंदर आदर्श घालून दिला.

या वर्षीच्या मुसळधार पावसामुळे भोयर यांचो तिनएकरांपेक्षा अधिक क्षेत्रातील पीक पूर्णपणे वाहून गेले. वडिलांचा आजार, भावाची



आत्महत्या आणि शेतात निर्माण झालेली दलदल यामुळे भोयर कुटुंब गहन संकटात सापडले. प्रशासनाकडून किरकोळ मदत जाहीर झाली असली तरी प्रत्यक्ष सहाय्य न मिळाल्याने त्यांनी हतबलता व्यक्त केली होती.

या वेदनादायी परिस्थितीकडे लक्ष देत एक उपवास, शेतकऱ्यांसाठी सहवेदनेचा या उपक्रमांतर्गत अरुण चवडे यांनी शेतातील रस्त्याची दुरुस्ती, मुलांच्या शिक्षणासाठी आणि वडिलांच्या उपचारासाठी आर्थिक मदत दिली. राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनीही प्रशासनाशी पाठपुरावा करून पुढील मदतीसाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

वर्धा येथील झुनका भाकर केंद्रातील झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात ही मदत सुपूर्द करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष बाबाराव किटे, पदाधिकारी गजेंद्र सुरकार, सारिका डेहनकर, प्रा. माधुरी झाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# नेत्रहीन, अपंग व मूकबधिरांच्या अनुशेष भरतीसाठी निवेदन



**आर्वी/जनमाध्यम**
नेत्रहीन, अपंग व मूकबधिरांना शासकीय सेवांमधील राखीव जागांवर तातडीने नियुक्ती द्यावी, या मागणीसाठी ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरम आणि डॉ. हेलन केअर अंध व अपंग बहुउद्देशीय संस्था (महाराष्ट्र राज्य) यांच्या पदाधिकाऱ्यांनी आ. सुमीत वानखेडे यांना निवेदन सादर केले.
वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयासह विविध शासकीय विभागांमध्ये अपंग, नेत्रहीन व मूकबधिरांसाठी राखीव जागा अनेक वर्षांपासून रिक्त आहेत.

त्यामुळे पात्र उमेदवारांना रोजगाराच्या संधीपासून वंचित राहावे लागत असल्याचो निवेदनात नमूद करण्यात आले.आमदार वानखेडे यांनी या विषयाची दखल घेत, जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून रिक्त पदे भरण्यासाठी लवकरच आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वस्त केले.या प्रसंगी इमरान राही (राष्ट्रीय उपाध्यक्ष, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरम), प्रकाश सिंग बावरी, कृष्ण दहाट, प्रल्हाद भिवगडे, पदमा पाकपाजन, वासूदेव सलामे, ओंकार मेहकरे, लता नागोसे, सैय्यद फारूख, माला नरांजे, योजना राऊत, अनिता चौधरी, वनिता मोतेवार, श्यामसुंदर राठी, ॲड. असद खान, आणि ॲड. इब्राहिम बख्श आजाद आदी उपस्थित होते.

# चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाची गरज अधोरेखित

## विधितज्ञ ॲड. ज्योती कोमलकर यांचे मत

**वर्धा/जनमाध्यम**
महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील समाजाच्या मुक्तीसाठी अखंड कार्य केले. स्त्री मुक्तीसाठी त्यांनी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे. त्यामुळे चळवळींमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविणे ही काळाची गरज आहे, असे मत प्रसिद्ध विधितज्ञ ॲड. ज्योती कोमलकर यांनी व्यक्त केले.

बुद्ध टेकडी येथे ६९व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते सुनील सुटे आणि बुद्ध टेकडी महिला विंगच्या रूपाली वाणी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात पंचशील ध्वजाच्या ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर पिंपळाचे रोपण करण्यात आले. प्रणोज बनकर यांनी बुद्धवंदना सादर केली. यानंतर शास्त्रीय गायक प्रदीप लोखंडे यांनी बुद्ध विहारी दर रविवारी. हे गीत गाऊन वातावरण भारावून टाकले.

या वेळी सुनील सुटे यांनी धम्मदीक्षेचा इतिहास सांगून वर्तमान काळातील सामाजिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी एकत्रित लढ्याची गरज अधोरेखित केली. यावेळी शाक्य संघाचे अध्यक्ष प्रवीण कांबळे, मुख्याध्यापक मुकुंद नाखले, राजकुमार वासेकर, दिनेश वाणी, प्रवीण जंगले, ऋषिकेश फुसाटे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन सुनील ढाले यांनी, प्रास्ताविक प्रकाश कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन सेवानिवृत्त शिक्षक आणि कवी किशोर ढाले यांनी केले.

# दिव्यांगांना विविध योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**
दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनवून समाजाचा कृतिशिल घटक म्हणून जीवन जगता यावे यासाठी दिव्यांग व्यक्तींमध्ये शैक्षणिक, व्यवसायिक व तांत्रिक पात्रता प्राप्त करण्यासाठी जिल्ह्यातील अंध, अंशत: अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग, मतिमंद इत्यादी दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शालांतपुर्व शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, इयत्ता ११ वी ते पदवीत्तोर पदवी पर्यंतच्या शिक्षण घेणाऱ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, दिव्यांग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य योजना या योजनेसाठी विवाह झालेल्या तारखेपासुन एक वर्षाच्या आत अर्ज सादर करावा. व्यवसायासाठी बिजभांडवल योजना या दोनही योजनांसाठी ३१ ऑक्टोंबर पर्यत अर्ज सादर करावा. विनामुल्य शालेय शिक्षण घेण्यासाठी विशेष निवासी व अनिवासी शाळांची योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद येथे संपर्क साधावा, असे दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांनी कळविले आहे.

# शेतकऱ्यांनो ॲग्रीस्टॅक नोंदणी करा, अन्यथा अनुदान होईल बंद

**वर्धा/जनमाध्यम**
कृषि विभागाच्यावतीने ॲग्रीस्टॅक या नव्या डिजिटल प्लॅटफॉर्मसाठी नोंदणी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. प्रत्येक शेतकऱ्यास ॲग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी काढणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे विविध योजनांचे अनुदान सुरळीत सुरु राहण्यासाठी नोंदणी आवश्यक असल्याने अशी नोंदणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ॲग्रीस्टॅक हे शेतकऱ्यांसाठी तयार करण्यात आलेले एक एकात्मिक मंच असून याद्वारे हवामानाचा अंदाज, पीक सल्ला, बाजारभाव, शासन योजना तसेच कृषि संबंधित विविध माहिती एका ठिकाणी उपलब्ध होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.हवामानावर आधारित पीक सल्ला आणि पुर्वसूचना, बाजारभाव व पुरवठा साखळी माहिती, शासनाचे अनुदान, विमा व विविध योजना यांची माहिती, तज्ञांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभाग, डिजिटल नोंदी व शेत व्यवस्थापन यासारख्या सुविधांचा लाभ ॲग्रीस्टॅक नोंदीमुळे शेतकऱ्यांना मिळणार आहे. याशिवाय ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक मध्ये नोंदणी होऊन ॲग्रीस्टॅक मध्ये ई-केवायसी पूर्ण झाली आहे.

अशा शेतकऱ्यांची माहिती डीबीटी प्रणालीवरील माहितीशी जुळत असल्यास अशा शेतकऱ्यांना ई-केवायसी न करता शासकीय मदत थेट त्यांच्या बँक खात्यावर वितरीत होत आहे.

त्यामुळे अशा शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे ई-केवायी करण्यापासून सूट देण्यात आली आहे. तथापी ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅकमध्ये नोंदणी झालेली नाही, अशांना प्रचलित पध्दतीने ई-केवायसी करुनच मदत वितरीत करण्यात येणार आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील नोंदणी न केलेल्या उर्वरीत शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक प्लॅटफार्मवर नोंदणीसाठी https://mhfr.agristack.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा जवळच्या आपले सरकार सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे यांनी कळविले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३१९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व कामकाज २० ते २७ ऑक्टोबर पर्यंत बंद



**अमरावती/ प्रतिनिधीः-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व कामकाज दिनांक २० ऑक्टोबर पासून ते २७ ऑक्टोबर पर्यंत बंद राहणार आहे.

दिनांक २० ऑक्टोबर रोजी स्थानिक सुटी, २१ ऑक्टोबर रोजी लक्ष्मीपूजन, दुस-या दिवशी बलिप्रतिपदा व २२ ऑक्टोबर रोजी भाऊबीज ची शासकीय सुटी आहे. तर दिनांक २२ व २३ फेब्रुवारी, २०२५ रोजी विद्यापीठाच्या एकेचाळिसाव्या दीक्षांत समारंभामुळे विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभाग सुरू ठेवण्यात आले होते.

सदर तारखेची पर्यायी सुटी दिनांक २४ ऑक्टोबर व २७ ऑक्टोबर रोजी दिवाळीनिमित्त जाहीर करण्यात आली असल्याने विद्यापीठाचे सर्व कामकाज हे २० ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर पर्यंत बंद राहणार आहे, याची सर्वसंबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

## कुल्लु मनाली येथे होणा-या राष्ट्रीय साहसी शिबिरात विद्यापीठाचे रासेयो स्वयंसेवक सहभागी होणार

**अमरावती/ प्रतिनिधीः-** केंद्र शासनाच्या युवा व खेल मंत्रालयाच्यावतीने अटल बिहारी वाजपेयी इन्स्टिटयूट ऑफ माऊंटनेअरिंग ॲन्ड इलाईट स्पोर्ट, कुल्लू, हिमाचल प्रदेश येथे दि. १५ ते २४ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान होणा-या राष्ट्रीय साहसी शिबिरामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सहा स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. यामध्ये तीन विद्यार्थी व तीन विद्यार्थीनींसह महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचा समावेश आहे. सदर शिबिरात महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीचा अनिकेत सवाई, बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळचा पवन कुंभेकर, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणीचा रोहित वाबीटकर, ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाची श्रध्दा यादव, श्री आर. एल. टी. विज्ञान महाविद्यालय, अकोलाची ऐश्वर्या घुगरे व जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूरची गौरी कडू तसेच लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी येथील रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. निलिमा दवणे यांचा यात सहभाग राहणार आहे.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३७६/२०२५
**श्री.संजय अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२१.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Sanjay S/o Ratnakar Khajurkar, Age 64 Yrs. Occu.: Retired
2. Prakash S/o Ratnakar Khajurkar, Age 59 Yrs. Occu.: Business
   Both 1 & 2 R/o Kedia Nagar, Rajapeth, Amravati.
3. Kiran W/o Prakash Deshmukh, Age 62 Yrs. Occu.: Homemaker
   R/o New Pournima Darshan, Near Akshay Hospital, Manpada Road, Dombivali (East) Mumbai

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रत्नाकर काशिनाथ खजूरकर** हे दिनांक 21.09.2011 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **ताराबाई रत्नाकर खजूरकर** ही दिनांक 13.11.2022 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावली. अर्जदार **संजय अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संजय अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक 10.10.2025 रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

वि.श्रीमती आर.डी. सिंधनाळे २३ वे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - २०५६/२०२५**
**श्रीमती शोभा अधिक तीन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख १०.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1) **Shobha w/o. Arun Jadhav,** Age 56 yrs., Occu.- Household
   R/o. Kharbadi Road, Ward No.5, Motala, Dist. Buldhana-443103
2) **Shubhangi Sushant Mane**, Age 30 yrs., Occu.- Household
   R/o. Shelgaon, Indapur, Shelgaon, Dist. Pune- 413114
3) **Shubham s/o. Arun Jadhav ,** Age 28 yrs., Occu.- Job,
   R/o. Radhaswami Nagar, Near Mahadev Mandir, Rukhmini Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati- 444606
4) **Shivani D/o. Arun Jadhav,** Age 26 yrs., Occu.- Education,

-- विरुध्द -

**गैरअर्जदार ः -** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरुण रंगनाथ जाधव हे दि.२०/०९/२०२४ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार शोभा अधिक तीन विरुध्द निरंक यांनी** वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती शोभा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - २३९३/२०२५**
**श्रीमती बबीता अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २५.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1) **Babita Rajkumar Shriwas,** Age 47 yrs., Occu.- Housewife
2) **Ganesh Rajkumar Shriwas,** Age 23 yrs., Occu.- Student,
3) **Anjali Rajkumar Shriwas,** Age 26 yrs., Occu.- Makeup Artist
   All applicant are R/o. Shilangan Road, Galli No. 2, Pannalal Bagicha, Bhuteshwar Chowk, Amravati.

-- विरुध्द -

**गैरअर्जदार ः -** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत राजकुमार तुलसीरामजी श्रीवास हे दि.०३/०८/२०२५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार बबीता अधिक दोन विरुध्द निरंक यांनी** वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती बबीता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

# क्रीडा साहित्य अनुदानासाठी अर्ज करण्याचे आवाहन

## -संस्थांना १४ लाखांपर्यंत अर्थसहाय्य

**अमरावती/ प्रतिनिधीः-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत राज्य, जिल्हास्तरावर क्रीडा विकासाचे उपक्रम राबविण्यासाठी तसेच गुणवंत गरजू खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाअंतर्गत क्रीडा विकासासाठी १४ लक्ष मर्यादेपर्यंत अर्थसहाय क्रीडा साहित्य व व्यायाम साहित्य अनुदान देण्यासाठी शैक्षणिक संस्था क्रीडा संघटना मंडळे शासकीय संस्था यांचेकडून तीन प्रतीत प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात येत आहे. व्यायाम साहित्याकरीता ५०० चौरस फुट हॉल असणे आवश्यक आहे. तसेच क्रीडा साहित्यासाठी प्रत्यक्ष क्रीडागंणासाठी राखीव जागा असणे आवश्यक आहे. सदरची जागा ही स्वमालकीची ७/१२, ८ अ अथवा दीर्घ मुदतीचा करारनामा असावा. लाभार्थी संस्थांना क्रीडा व व्यायाम साहित्य प्रचलीत दर करारानुसार पुरवठा करण्याबाबतची कार्यवाही संचालनालयाचे सहमतीने करण्यात येईल.

---

# नगर परिषद कार्यालय, पांढरकवडा, जि.यवतमाळ

**ई-निविदा सुचना क्र.२०२५_DMA_१२३१९६_१**

**जा.क्र.१२६७/२०२५** **दिनांक १७.१०.२०२५**

**पां**ढरकवडा नगर परिषद हद्दीतील ख्ाालील आरोग्य विभाग १५ वा वित्त आयोग व न.प.निधी अंतर्गत खालील कामाकरीता सीलबंद टक्केवारी **बी-१** प्रपत्रात निविदा अनुभवी नोंदणीकृत पंजीबध्द सेवाभावी संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा पांढरकवडा नगर परिषद मागवित आहे. निविदेचा विस्तृत नमुना mahatebnders.gov.in या वेबसाईटवर दिनांक १७.१०.२०२५ पासून पहावयास उपलब्ध आहे. निविदेचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत | अनामत रक्कम | कोरे निविदा प्रपत्र किंमत रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | सन २०२५-२६ करीता पांढरकवडा शहरातील विविध प्रभागातून दैनंदिन घनकचरा संकलन वाहतूक, नाली सफाई, रस्ते सफाई मृत जनावरे विल्हेवाट लावणे | ८२४७६१८ | ८३००० | २००० | कामाचा आदेशा-पासून १२ महिने |

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशील**

| | |
|---|---|
| ऑनलाईन निविदा वि**क्री** व दर सादरीकरण कालावधी | दि.१७.१०.२०२५ ते दि.२८.१०.२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणे (तांत्रिक) | दि.२९.१०.२०२५ ला दु.३.०० नंतर (शक्य झाल्यास) |

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पांढरकवडा

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३६८/२०२५
श्रीमती शोभाताई मयत तर्फे प्रकाश विरुध्द निरंक
पुढील तारीख २१.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
१. शोभाताई प्रकाशराव यावले (मयत)
   १अ) प्रकाश मोतीराम यावले, वय ७७ वर्षे, धंदा - शेती
   रा.लाडेगांव, ता.आर्वी, जि.वर्धा
   १ब) अर्चना मनोजराव अवचार, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.जळका पटाचे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती
   १क) अमोल प्रकाशराव यावले, वय ४६ वर्षे, धंदा - शेती
   १ड) सुवर्णा प्रकाशराव चव्हाण, वय ४३ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.शिवाजी वार्ड, धामणगांव रेल्वे, जि.अमरावती
२. कुसूम शंकरराव टावरे, वय ६४ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.पोरगव्हाण, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सुशिला नारायणराव येवले, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.लाडेगांव टाकरखेडा, ता.आर्वी, जि.वर्धा
४. दिपक भाऊरावजी फाळके, वय ५६ वर्षे, धंदा - शेती
   रा.राजमाता कॉलनी, रहाटगांव चौक, ता.जि.अमरावती
५. माला संजयराव शेटे, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.टीटवा, ता.बार्शीटाकळी, जि.अकोला
६. प्रमोद भाऊरावजी फाळके (मयत)
   ६अ) रेखा प्रमोद फाळके, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.कुऱ्हा, ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव
   ६ब) अश्विनी प्रितम महाडीक, वय २७ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.जुनी वस्ती तळेगांव शामजीपंत जि.वर्धा
   ६क) विक्की प्रमोद फाळके, वय २५ वर्षे, धंदा - शेती
   रा.कुऱ्हा ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **भाऊराव रामराव फाळके** हे दिनांक **२७.११.२०११** रोजी **नांदुरा लष्करपूर, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शोभाताई (मयत) तर्फे प्रकाश विरुध्द निरंक** रा.वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शोभाताई (मयत) तर्फे प्रकाशविरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# जाहीर सुचना

आम जनतेस या जाहीर सुचनेव्दारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार अमीर खान हकीम खान हे मयत हकीम खान छोटे खान पठाण, रा.इंदला, ता.जि.अमरावती यांचे कायदेशिर वारस असून, मयत हकीम खान छोटे खान पठाण यांच्या मालकीचे हीलटॉप कॉलनी, मौजे- वडाळी, प्रगणे- अमरावती येथील भुखंडावरील हल्का क्र.२६/०३/२९/१ मध्ये प्लॉट नं. ३१, साईज ४०बाय ५० असून, क्षेत्रफळ २००० चौ.फुट व प्लॉट नं.३२, साईज ४० बाय ५० असून, क्षेत्रफळ २००० चौ.फुट असे दोन प्लॉट असून त्याची चर्तुःसिमा पूर्व-प्लॉट क्र.३०,पश्चिमेस- प्लॉट क्र.३३, उत्तरेस- प्लॉट क्र.१६,दक्षिणेस-रोड अशी मालमत्ता आहे. सदर वरील नमुद वर्णनाचे मालमत्तेशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध किंवा सरकारी अथवा निमसरकारी सोसायटी,बॅंकेचा इत्यादीचे कर्ज, गहाण, बोजा, वारसाहक्क, ताबा, कचेरी वाद, बक्षिस, जप्ती अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार असल्यास ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत माझे पक्षकाराचे इंदला, ता.जि.अमरावती येथील पत्यावर कागदपत्रांसह लेखी कळवावे. तसे न केल्यास, तदनंतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचा हक्क व अधिकार चालणार नाही.

करिता ही जाहीर सूचना दिली असे.

**दिनांक ः-१७/१०/२०२५**
**ठिकाण ः-अमरावती.**

**स्वाक्षरी/-**
**ॲड.के.एस.पडोळे**
वडाळी नाका, अमरावती
**मो.-८४२१२२१८३२**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान ए.बी.कटटे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.२१६५/२०२५**
**विजया -वि- निरंक**
**पुढील ता.०६.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
१. **विजया प्रभाकर दिबे,** वय ७९ वर्षे, व्यवसाय - निरंक
   रा.प्रभाकर दिबे सुतगिरणी रोड, वसंत मेडिकल मागे, सरोज कॉलनी रुख्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
२. **सविता रामदास डुमरे,** वय ६१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
   रा.रामदास डुमरे, तेलीपुरा, नेर,ता.नेर, जि.यवतमाळ
३. **शशिकांत प्रभाकरराव दिबे,** वय ५८ वर्षे, व्यवसाय - मजूरी
   रा.सुतगिरणी रोड,वसंत मेडिकल मागे, सरोज कॉलनी रुख्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
४. **वनिता अनिल खापेकर,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
   रा.अनिल खापेकर, साई बाबा मंदिरामागे, अयोध्या नगर, व्ही टीसी अयोध्या नगर, एसओ नागपूर
५. **उमाकांत प्रभाकरराव दिबे,** वय ५४ वर्षे, व्यवसाय - मजूरा
   रा.सुतगिरणी रोड वसंत मेडिकल मागे, सरोज कॉलनी, रुख्मीणी नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रभाकर दयारामजी दिबे** हे दि.**२४.१०.२०२३** रोजी **अमरावती** येथे मरण पावले. **अर्जदार विजया प्रभाकर दिबे व इतर ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विजया प्रभाकर दिबे व इतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

# जाहीर नोटीस

प्रो.नं.४०४५/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१७/१०/२०२५

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.४३१/२०२५ ने.ता.१९.११.२०२५

**अर्जदार -**
१. **पुरुषोत्तम सिताराम ददगाळ,** वय ७० वर्षे, धंदा - शेती
   रा.अमरावती, ता.जि.अमरावती
२. **गजानन नारायण ददगाळ,** वय ५२ वर्षे, धंदा - मजुरी
३. **संजय नारायण ददगाळ,** वय ६० वर्षे, धंदा - मजुरी
४. **श्रीमती पंचफुला वामन ददगाळ,** वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
५. **सतीश वामन ददगाळ,** वय ५२ वर्षे, धंदा - मजुरी
६. **अनिल वामन ददगाळ,** वय ४८ वर्षे, धंदा - मजुरी
   अर्जदार २ ते ६ रा. दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
   ह.मु.चंद्रपुर, ता.जि.चंद्रपुर

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **गयाबाई सिताराम ददगाळ** हे दिनांक **१४.०४.१९९८ रोजी मरण पावले आहेत.तसेच वामन सिताराम ददगाळ हे दि.१०.०८.२००२ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - मयत गयाबाई सिताराम ददगाळ, मयत नारायण ददगाळ,मयत वामन सिताराम ददगाळ व पुरुषोत्तम सिताराम ददगाळ** यांचे नावे मौजा दर्यापूर,ता.दर्यापुर, जि.अमरावती येथील नगर भुमापन क्र.९१६,प्लॉट क्र.९१६, शिट क्र.४४, क्षेत्र. १०२.८० चौ.मी.अशा वर्णनाची सामाईक मालमत्ता असुन याची बाजारभाव किंमत १,००,०००/- इतकी आहे.

आज दि.**१७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**श्री.ए.बी.कट्टे, ३ रे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२०९३/२०२५
**चमेलीबाई -वि- निरंक**
पुढील ता.२९.१०.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
१. चमेलीबाई हनुमान संत्रावाले, वय ७५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
   रा.मालीपुरा, न्यू टाऊन बडनेरा, ता.जि.अमरावती
२. किशोर हनुमानप्रसाद संत्रावाले, वय ४८ वर्षे, व्यवसाय - व्यापार
   रा.हनुमान संत्रावाले, मालीपुरा, न्यू टाऊन बडनेरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः विनोद** हनुमानप्रसाद संत्रावाले, वय ५१ वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.हनुमान संत्रावाले, मालीपुरा, न्यू टाऊन बडनेरा, ता.जि.अमरावती

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत हनुमान बन्सीलाल संत्रावाले** यांचे दिनांक **२१.११.२०२४** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार चमेलीबाई हनुमान संत्रावाले व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **चमेलीबाई हनुमान संत्रावाले व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

# जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.६३०/२०२५ ने.ता.२७.११.२०२५

**अर्जदार ः**
१) **हुसेना बी अब्दुंल गफ्फार,** वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम
   रा.तोडगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२) **शेख शबीर शेख गफ्फार,** वय ४३ वर्षे, धंदा - मजुरी
   रा.तोडगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३) **शेख सत्तार शेख गफ्फार,** वय ३५ वर्षे, धंदा - मजुरी
   रा.तोडगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निल

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत शेख लाल शेख आलम हे दि.१३/०५/२०१८ रोजी तोंडगाव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मृत्यू पावले.** तसेच **मय्यत अमीनाबाई शेख लाल** ही **दि.२६/०५/२०१२** रोजी तोंडगाव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मृत्यू पावली. तसेच **मय्यत शेख गफ्फार शेख लाल** हे **दि.१६/११/२००९** रोजी तोंडगाव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मृत्यू पावले.त्यामुळे अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यक्तीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरिता वारसाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश** (क.स्तर) **चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.६३०/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१६.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

वि.श्री.एस.एस.भिंगरदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - २३६९/२०२५**
**श्री विनोद अधिक चार विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २८.११.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1) **Vinod Ambadas Itankar,** Age 45 yrs., Occu.- Agriculture,
   R/o. I/f. Sakha Mangalam, Chaitanaya Colony, Badnera Old Bye Pass, Amravati, Tq. & Dist. Amravati.
2) **Sau. Sangita Arunrao Varbhe,** Age 60 yrs., Occu.- Household,
   R/o. Mangladevi,Tq. Ner Parsopant, Dist. Yavatmal
3) **Sau. Sunita Umeshrao Jude,** Age 55 yrs., Occu.- Household
   R/o. Kolambi, Tq. & Dist. Yavatmal
4) **Sau. Kavita Sanjayrao Belkhade,** Age 50 yrs., Occu.- Household
   R/o. Yashoda Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati.
5) **Sau. Kavita Sanjayrao Bhiwgade**, Age 42 yrs., Occu.- Household
   R/o. Anjangaon Bari, Tq. & Dist. Amravati.

-- विरुध्द -

**गैरअर्जदार ः -** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत श्री अंबादास जयरामजी ईटनकर हे दि.१६/०८/२०२५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार विनोद अधिक चार विरुध्द निरंक यांनी** वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री विनोद अधिक चार विरुध्द निरंक यांनी** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १५.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

# जाहीर नोटीस

P.No.3949/2025

**अमरावती येथील विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५८/२०२४ ने.ता.३०.१०.२०२५

**अर्जदार ः रमेश श्रीराम अवघड व ईतर**
**-- विरुध्द --**
**गैरअर्जदार ः रेखा जानराव अवघड अधिक २**

**अर्जदार -**
**१. सौरभ जानराव अवघड**
**२. रेश्मा सौरभ अवघड,**
**दोघे रा.६२ गणेडीवाल लेआऊट, कमिश्नर ऑफिसजवळ, अमरावती**

**Application Under Order 5 Rule 20 of CPC for Paper Publication Against the Non Applicants.**

ज्याअर्थी वरील अर्जदार रमेश श्रीराम अवघड यांनी वि.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांच्या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार यांना वारंवार नोटीस देऊनही न्यायालयात हजर राहत नसल्यामुळे त्यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी अर्जाची सुनावणीसाठी दिनांक ३०.१०.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दि. / /२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला.

अमरावती
दिनांक / /२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहा.अधीक्षक(न्यायीक विभाग)**
जिल्हा व सत्र न्यायालय ,
अमरावती

---

# जाहीर नोटीस

P.No.3949/2025

**अमरावती येथील विद्यमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश-६ यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३४/२०२५ ने.ता.१९.११.२०२५

**अर्जदार ः**
१. **चंदा** प्रल्हाद माहेकर, वय ४०वर्षे, व्यवसाय - नोकरी
२. साहिल प्रल्हाद माहेकर, वय १७ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३. देवयानी प्रल्हाद माहेकर, वय १३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
   सर्व रा.श्रीराम नगर, वार्ड नं.६, जि.वर्धा

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

**Application Under Section 8(2) of Hindu Minority and Guardianship Act, 1956 R/W Sectio 29 of Guardian and Wards Act**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी अज्ञान पाल्याच्या नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**DESCRIPTION OF PROPERTY**

Agriculture field bearing No.225/2/b at Village Anjangaon Bari, Tq.& Dist. Amravati total area 1.62 HR same as bounded as under :- Towards East : Field of Mahadeo Bhure, Towards West : Government Road, Towards North : Field of Ramesh Mahekar, Towards South : Field of Vimal Irade

त्याअर्थी वरील सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक १९.११.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दि. /१०/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला.

अमरावती
दिनांक /१०/२०२५

शिक्का

आदेशानुसार,
**सहा.अधीक्षक(न्यायीक विभाग)**
जिल्हा व सत्र न्यायालय ,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३६७/२०२५
**अर्चना -वि- निरंक**
पुढील ता.२५.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
१. अर्चना सुधीर लुंगे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२. साक्षी सुधीर लुंगे वय २४ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
३. वैभवी सुधीर लुंगे, वय १९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
   सर्व रा.किरणापुरे बगीचाा, गल्ली नं.१, रवि नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुधीर रामदासजी लुंगे** यांचे दिनांक **२२.१०.२०२३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार अर्चना सुधीर लुंगे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्चना सुधीर लुंगे व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**श्री.के.ए.पट्टेबहादुर, अतिरिक्त दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३६६/२०२५
**विजय -वि- निरंक**
पुढील ता.२०.११.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
१. विजय रामदास लुंगे, वय ६० वर्षे, व्यवसाय - मजुरी
   रा.किरणापुरे गार्डन, रवि नगर, अमरावती
२. छाया मनोहर सवई वय ५७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
   रा.६५, आदर्श नगर सेमनरी लेआऊट, यवतमाळ
३. अर्चना सुधीर लुंगे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
४. साक्षी सुधीर लुंगे, वय २४ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
५. वैभवी सुधीर लुंगे, वय १९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
   नं.३ ते ५ रा.किरणापुरे बगीचाा, गल्ली नं.१, रवि नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कोकीळा रामदासजी लुंगे** यांचे दिनांक **०१.०३.२०२०** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार विजय रामदास लुंगे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विजय रामदास व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४२
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### कृषिमंत्र्यांची खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी घेतली भेट

**अमरावती-**राज्यसभेचे खासदार, महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री तथा भाजपचे जेष्ठ नेते डॉ.अनिल बोंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय कृषीमंत्री तथा मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांची कृषी मंत्रालयात भेट घेतली.



राज्यात कृषिमंत्री राहिलेल्या डॉ.बोंडे यांनी संसदेत गेल्यावरही शेतकरी हिताच्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यांच्या या अनुभवाचा देशातल्या शेतकऱ्यांना फायदा व्हावा यासाठी त्यांच्याकडून देशातील राज्यांच्या सरकारकडून शेती संदर्भात राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, त्यांचा अभ्यास, प्रभावी अंमलबजावणी यासाठी प्रयत्न केले जातात. त्याच पार्श्वभूमीवर सोयाबीन, कापूस व कांदा खरेदी तसेच प्रधानमंत्री धनधान्य योजने संदर्भात केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत डॉ.बोंडे यांनी चर्चा केली. या चर्चेमधून आगामी काळात शेती क्षेत्रातील ऐतिहासिक निर्णय घेतले जाणार आहेत. शेतकऱ्यांचा त्याचा मोठा फायदा होईल, अशी माहिती डॉ.बोंडे यांनी दिली.



### शारदा गणोरकर सन्मानित

**अमरावती-**ज्ञानदाना सारख्या पवित्र क्षेत्रात समाज सेवेतील बहुमूल्य योगदाना बद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेल तर्फे कांडली येथील शिक्षिका शारदा अरुण गणोरकर यांना सन्मापत्र, स्मृतीचिन्ह, शाल व पुष्पगुष्य देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.सदर पुरस्कार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या मुंबई येथील कार्यालयात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक आमदार जयंत आसगावकर, शिक्षक सेलचे प्रदेशाध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे,साजिद खान पठाण, प्रा. प्रकाश सोनवणे,कार्याध्यक्ष प्रकाश तायडे, दुर्गाडे, प्रदेश सरचिटणीस यशराज पारखी, अमरावती शहर काँग्रेस शिक्षक सेलचे अध्यक्ष प्रदीप शेवतकर, उपाध्यक्ष अमोल महात्मे, प्रसिद्धी प्रमुख ॲड. प्रभाकर वानखडे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर पुरस्कारा बद्दल म. फुले ग्राम शिक्षण समिती करजगाव संचालित आदर्श व कनिष्ठ महाविद्यालय कांडली येथील मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, कर्मचारी आदींनी कौतूक केले.



### पोटे पाटील अभियांत्रिका महाविद्यालयात दीपोत्सव

**अमरावती-**पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात देखील दिवाळी उत्सव अर्थात दीपोत्सव मोठ्या आनंदात सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या समवेत साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयात असंख्य दीप प्रज्वलित करून श्रीचे पूजन करण्यात आले दिवाळी या सणाचे महत्व प्राध्यापकांनी आपल्या संवादातून उपस्थितांसमोर सांगितले त्यानंतर गीत गायनाचे आयोजन सुध्दा करण्यात आले होते.सर्वात शेवटी संस्थेतील सर्व कर्मचारी यांना दिवाळी निमित्त भेट वस्तू देउन संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या व प्रदूषण मुक्त दिवाळी साजरा करण्याचा संकल्प यावेळी सर्व कर्मचाऱ्यांनी केला.यावेळी पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व डीन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# २१ नोव्हेंबरला प्रसिध्द होणार मनपाची मतदारयादी

## महापालिका क्षेत्रात सहा लाख ७६ हजार ४२८ मतदार

**अमरावती/का.प्र.**

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या हालचाली वाढत्या असून अंतिम प्रभागरचना प्रसिध्द झाल्यानंतर आता मतदारयादीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. २१ नोव्हेंबरला अंतिम मतदारयादी प्रसिध्द करण्यात येईल, तर मतदान केंद्रनिहाय यादी १० डिसेंबरला प्रसिध्द करण्यात येणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार महापालिकेच्या मनपा क्षेत्रात सहा लाख ७६ हजार ४२८ मतदार,मतदारासाठी अर्हता दिनांक : १ जुलै २०२५,प्रारूप मतदारयादी प्रसिध्दी ६ नोव्हेंबर २०२५,हरकती व सूचनांसाठी मुदतः ६ ते १४ नोव्हेंबर,अंतिम मतदारयादीः २१ नोव्हेंबर,केंद्रनिहाय मतदारयादी प्रसिध्दीः १० डिसेंबर २०२५,निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करताना १ जुलै २०२५ ही अर्हता दिनांक निश्चित करण्यात आली आहे. वर्ष २०११ या लोकसंख्येवर आधारित ही यादी असली तरी लोकसभा व विधानसभा निवडणुकीनंतर मतदारसंख्या वाढली आहे. साधारणतः सहा लाख ७६ हजार ४२८ मतदारांची नोंद महापालिका क्षेत्रात आहे, तर ४५० च्या जवळपास मतदानकेंद्र २२ प्रभागांतर्गत राहणार आहेत.



महापालिकेस राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार सहा नोव्हेंबरला प्रारूप मतदारयादी जाहीर करण्यात येणार असून त्यावर हरकती घेण्यासाठी १४ नोव्हेंबरपर्यंत मुदत आहे. त्यवरील सुनावणीअंती अंतिम मतदारयादी २१ नोव्हेंबरला जाहीर करण्यात येणार आहे. केंद्रनिहाय मतदारयादी १० डिसेंबरला प्रसिध्द करण्यात येणार आहे.

# सर्पमित्रानी पकडला ८ फूटांचा अजगर

**नांदगाव पेठ-**परिसरातील धनगर पुरा येथील सूरज राऊत यांच्या शेतात बुधवारी तब्बल आठ फूट लांबीचा अजगर आढळल्याने एकच खळबळ उडाली. शेतातील कामगारांना हा अजगर दिसताच त्यांनी तत्काळ सर्पमित्र रवी बेंडे यांना संपर्क साधला सर्पमित्र रवी बेंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत अजगराला सुरक्षितपणे पकडले.त्या अजगराने शेतातील एका मांजरीला गिळंकृत केले होते,सर्पमित्रांनी मृत मांजरीला अजगराच्या विळख्यातून बाहेर काढत मांजरीवर अंत्यसंस्कार केले.या रेस्क्यू मोहिमेत सर्पमित्र रवी बेंडे यांच्यासोबत आशिष



निमकर्डे व जतीन कोठारे यांनीही सहभाग घेत कौशल्याने अजगराला पकडून सुरक्षितपणे वाळकी धरण परिसरात सोडण्यात आले.स्थानिक नागरिकांनी सर्पमित्रांच्या तात्काळ प्रतिसाद व धाडसाचे कौतुक केले.

# शैक्षणिक संस्थेत पार पडलेल्या भाजपच्या राजकीय कार्यक्रमास युवक काँग्रेसचा तीव्र विरोध

## युवक काँग्रेसची उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे तक्रार

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीद्वारा संचालित प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे नियमबाह्यपणे आयोजित करण्यात आलेल्या भाजपच्या राजकीय कार्यक्रमाविरोधात युवक काँग्रेसतर्फे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

ही तक्रार उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मा. जिल्हाधिकारी अमरावती यांच्या मार्फत तसेच तांत्रिक शिक्षण संचालनालयाच्या संयुक्त संचालकांकडे सादर करण्यात आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भारतीय जनता पक्षाच्या इतर नेते व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संस्थेच्या आवारात राजकीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना अनौपचारिक सुट्टी जाहीर करण्यात आली. तसेच संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा व परिसराचा वापर पक्षीय कार्यक्रमासाठी करण्यात आल्याचे या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.युवक काँग्रेसने या कृतीला शैक्षणिक वातावरणाच्या पवित्रतेला बाधा आणणारी व संस्थेच्या सामाजिक-शैक्षणिक उद्दिष्टांशी विसंगत असल्याचे म्हटले आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे हे भारतीय जनता पक्षाचे अमरावती शहराध्यक्ष देखील असल्याने, त्यांनी आपल्या राजकीय पदाचा गैरवापर करून संस्थेचा वापर राजकीय हेतूसाठी केल्याचा आरोप युवक काँग्रेसकडून करण्यात आला आहे.



१३ ऑक्टोबर रोजी झालेल्या कार्यक्रमाची सखोल चौकशी करण्यात यावी, चौकशीत उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कठोर शिस्तभंग कारवाई करण्यात यावी,महाविद्यालय प्रशासन व प्राचार्य यांनी परवानगी देण्यामागील कारण स्पष्ट करण्याचे आदेश देण्यात यावेत,भविष्यात कोणत्याही शैक्षणिक संस्थेत अशा प्रकारचे राजकीय कार्यक्रम होऊ नयेत, यासाठी स्पष्ट दिशा-निर्देश जारी करण्यात यावेत.आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.निवेदन देताना युवक काँग्रेस माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, अमरावती जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष अक्षय साबळे, मोहीत भेंडे, धनंजय बोबडे, सौरभ तायडे, ॲड.कार्तिक देशमुख, कृणाल गावंडे, प्रफुल्ल तंतरपाळे, राहुल गुडधे, प्रियल मोहोड हे युवक काँग्रेस पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# 'आपणहून येई ना सजण' या विरहोत्कंठीत गीताचे प्रसारण

**अमरावती-** येथील प्रसिद्ध कवी गझलकार अरुण सांगोळे यांचे एक विरहोत्कंठीत गीत दीपावलीच्या शुभपर्वावर युट्यूबच्या माध्यमातून प्रसारित करण्यात आले असून रसिकांकडून उस्फुर्त प्रातिसाद मिळत आहे.अष्टनायिकांपैकी एक म्हणजे विरहोत्कंठीता. प्रियकराला आपणहून यावेसे वाटत नाही. का बरं ? काय झाले असेल? अशा विचारांचे काहूर माजते तिच्या मनात. सरतेशेवटी माझीच तर दृष्ट नाही ना लागली म्हणत ती विरहाने व्याकुळ नायिका हळवी होते आहे. प्रेमाचे एक अनोखे तरल रूप अन् विप्रलंभ शृंगाराची ही विस्मयकारक छटा कवी अरुण सांगोळे यांनी नेमक्या आणि मोजक्या शब्दात काव्यरुपात या गीतातून साकारली आहे. प्रसिद्ध शास्त्रीय गायिका आणि संगीतकार पौलमी देशमुख यांनी अनोख्या शैलीत हे गीत स्वरबद्ध केले असून दर्दभऱ्या सुरात गायिले. काळजाचा एकेक कोपरा झंकृत व्हावा अशी ही गायनकला प्रभावीत करणारी आहे. सदर गीताला अमेय नाईक यांचे संगीत संयोजन असून अवधूत फडके यांचा बासरी स्वर लाभला आहे. गीत प्रसारित झाले असून गानरसिकांना पौलमी देशमुख यांच्या यु ट्युब चॅनलवरून ऐकता येईल.





# तिवसा येथे दिवसा घरफोडी; २६ ग्रॅम दागिण्यांसह ९० हजाराची रोकड लंपास

## अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**तिवसा/वार्ताहर**

शहरातील नारायण नगरात बुधवारी ता. १५रोजी दुपारी १२वाजता दरम्यान एका घरात अज्ञात चोरट्याने कुलूप तोडून कपाटातील २६ग्रॅम सोन व ९०हजार रुपये रोख रक्कम चोरल्याची घटना घडली.या प्रकरणी तिवसा पोलीसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.अगदी शहराच्या मध्यभागी असलेल्या परिसरात भरदिवसा चोरीची घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

नारायण नगरात राहणाऱ्या शकुंतला मारोतराव इनवाते यांचे घर हे मुख्य रस्त्या लागत असून ता. १५रोजी सकाळी घराला कुलूप लावून त्या दिवाळी निमित्त चिखलदरा येथे आपल्या मुलीला व नातवाला आणायला गेल्या होत्या.याच दरम्यान दुपारी १२वाजता एक अज्ञात चोरटा भिंतीवरून घराच्या आवारात शिरला व घराचे कुलूप तोडून घरातील मौल्यवान वस्तू,रोख रक्कम असा लाखोचा मुद्देमाल घेऊन पसार झाला. पोलीसांनी शकुंतला इनवाते यांच्या तक्रारीवरून अज्ञात विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करीत आहे. परंतु भरदिवसा गजबजलेल्या परिसरात चोरी झाल्याने नागरिकांमध्ये चांगलीच दहशत निर्माण झाली असुन पोलीसांचा धाक संपला की काय अशी चर्चा यावेळी नागरिकांमध्ये रंगली होती.

### चोरट्या सोबत झटपट

१५ रोजी श्रीमती इनवाते यांच्या शेतात संत्राची तोड सुरु होती.शेतातील वाईतदार काळकर हे दुपारी १वाजता दरम्यान घरी संत्रा घेऊन आले असता त्यांना घराचे दार उघडे दिसले, त्यामुळे त्यांनी इनवाते यांना फोन केला असता तेवढ्यात घरातून चोर बाहेर आला आणि दोघांमध्ये चांगलीच झटपट झाली.दरम्यान या झटपटीतून चोरट्याने पळ काढला. मात्र एका दुकानाच्या सीसीटीव्हीमध्ये चोरटा कैद झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहे.

# जनता विद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन'

लेहेगाव - श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, द्वारा संचालित, जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नेरपिंगळाई, येथे भारतरत्न डॉ.ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती 'वाचन प्रेरणा दिन' साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक अजय धोटे यांनी भूषविले तर, प्रमुख अतिथी क. म. वि. प्रभारी, प्रा. विजय साटोटे, यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम तसेच डॉ.भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. 'वाचाल तर वाचाल 'असा संदेश देत वाचेल त्याला पुस्तक असा उपक्रम राबवून मोबाईल कडून ग्रंथालयाकडे प्रवास वाढावा म्हणून मुलांचे समुपदेशन करण्यात आले.

# हवामान व बाजारभावाची माहितीकरीता एआय ॲप

**अमरावती/का.प्र.**

शेतकऱ्यांना हवामान बदल, बाजारपेठेतील अस्थिरता, आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हानाचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून कृषि विभागाने महाविस्तार एआय हे ॲप लाँच केले आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेच्या साहाय्याने हे ॲप लाँच केले आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेच्या साहाय्याने हे ॲप शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित सर्व गरजा पुर्ण करण्यासाठी एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध करून देते. मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे ॲप शेतकऱ्यांना रिअल टाइम माहिती, तज्ज्ञांचा सल्ला आणि आधुनिक शेती पध्दतींचे मार्गदर्शन करणार आहे.

महाविस्तार एआय ॲपमधील एआय चॅटबॉट शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरीत उत्तरे देतो. रिअल टाइम हवामान अंदाज स्थानिक पातळीवरील हवामान अंदाजामुळे शेतकरी पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करू शकतात. स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेतील पिकांचे भाव रिअल टाइममध्ये दाखविले जात आहे. या ॲपवर कृषि विभागाच्या विविध कृषि योजनांची माहिती, अनुदान, कर्जमाफी आणि विमा योजनांचे तपशील एकाचा ठिकाणी मिळु शकतील. ॲपमध्ये मराठीत व्हिडीओ उपलब्ध आहेत, ज्यामध्ये पिकांची लागवड, खतांचा वापर, कापणी आणि जैविक शेती याबाबत तपशीलवर मार्गदर्शन मिळेल.



ॲपमधील एआय तंत्रज्ञान मध्ये शेतकरी पिकांचे फोटो अपलोड करून पिकांवरील रोग आणि किडींचे निदान करून उपाय मिळू शकतात. शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य बनवण्यासाठी अनेक फायदे या ॲपमध्ये आहे. त्यामुळे सल्ला त्यांच्या मोबाईलवर मिळतो, ज्यामुळे वेळ वाचतो. चुकीच्या खतांचा किंवा कीटकनाशकांचा वापर टाळून शेतकरी उत्पादन खर्च कमी करू शकतात. बाजारभाव माहिती आणि हवामान अंदाजामुळे शेतकरी योग्य वेळी पिकांची विक्री आणि नियोजन करू शकता, यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. गुगल प्ले स्टोअरवर जाऊन आजच महाविस्तार एआय ॲप डाउनलोड करा. शेतीत डिजीटल क्रांतीचा भाग व्हा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

# विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील स्पर्धक, कलावंत, साथीदार यांची निवड

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील स्पर्धक, कलावंत व साथीदार यांची महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य - पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव आणि अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या चमूचा प्रशिक्षण वर्ग स्वामी विवेकानंद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे १८, १९ ऑक्टोबर व २३ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे. सत्र २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य-२०२५ महोत्सव कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे दि. ०५ ते ०९ नोव्हेंबर, २०२५ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्ली यांचेकडून पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कव्वाली स्पर्धेच्या आयोजनाच्या तारखा प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाव्दारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल, असे विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी कळविले आहे.

# पत्नीच्या हत्येतून आरोपीची निर्दोष मुक्तता

## ॲड.अमित सहारकर याचा यशस्वी युक्तीवाद

**अमरावती/का.प्र.**

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अमरावती यांनी आरोपी नरेश इंगोले याची कलम ३०७,३०२,४९८ अ भादवि मनुष्यवधाच्या प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली आहे.आरोपी नरेश इंगोले यांच्या तर्फे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती तर्फे न्यायरक्षक कार्यालय, अमरावती चे उपमुख्य अधिवक्ता ॲड. अमित विकास सहारकर यांनी आरोपीची बाजू मांडली २१डिसेंबर २०१५ रोजी पो. स्टे. चांदुर रेल्वे कलम ३०७,३०२,४९८ अ भादवि मृत्यू पुर्व बयाणाच्या आधारावर तक्रार नोंदवण्यात आली.



सदर प्रकरणामध्ये आरोपीवर असा आरोप होता की, आरोपी याने त्याच्या पत्नीला दारू पिण्याकरीता १००रू. मागणी केली व न दिल्यामुळे त्यांच्यात वाद झाला व त्या वादामध्ये आरोपीने त्याच्या पत्नीवर रॉकेल टाकून पेटवून दिले व नंतर तिचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला.८ साक्षीदार सदर प्रकरणामध्ये सरकारी पक्षातर्फे एकूण तपासण्यात आले. न्यायरक्षक कार्यालयाचे ॲड. अमित सहारकर यांनी यशस्वीपणे युक्तीवाद केला. विद्यमान न्यायालयाने दोन्ही बाजू तपासून आरोपी याला सदर प्रकरणामधून निर्दोष मुक्त केले.

न्याय सर्वांसाठी या उद्देश पूर्ती करीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे नेहमीच कायदेशीर मदतीच्या उद्देशाने समाजातील सर्व घटकांपर्यंत कायदेशीर सेवा उपलब्ध करून देत आहे तसेच कारागृहातील दुर्बल न्यायीक बंदी यांना मदत करीत असते. त्या अनुषंगाने आरोपीला विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत कायदेविषयक मदत करण्यात आली.

# व्यवस्थापनातून नवपरिवर्तन घडविण्यावर भर-आ.सुलभा खोडके

## एक कोटी ३२ लक्ष निधीतून विविध विकासकामांचे भूमिपूजन

**अमरावती/का.प्र**

नवनव्या क्षेत्रासाठी तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळ उपलब्धता यासोबतच शहराच्या उद्यमशील विकासाच्या वाटचालीसाठी सर्वांशी संवाद साधित जनसामान्यांच्या पाठबळावर शहराचे रुपडे पालटण्यासाठी पर्याप्त निधीतून शहर विकासासाठी आपले कार्य निरंतरपणे सुरु आहे. असे प्रतिपादन आमदार सुलभा खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

रुपये एक कोटी ३२ लक्ष निधीतून केल्या जाणाऱ्या प्रभाग क्रमांक -३ नवसारी अंतर्गत गुरुदेव नगर, प्रकाश नगर, आनंद विहार, कल्पना नगर - २ येथील विविध विकासकामांच्या भूमिपूजन- लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी त्या बोलत होत्या. सर्वप्रथम आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते गुरुदेव नगर येथील मनपाच्या खुल्या जागेला चेंलिंग - फेंसिंग करणे यासोबतच इसार पेट्रोल पंप ते वाकोडे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. तदनंतर प्रकाश नगर येथील रस्त्याचे बांधकाम करणे या कामाचे लोकार्पण करण्यात आले.यासोबतच कल्पना नगर क्रमांक-२ येथील मनपाच्या ओपन स्पेसला चेंलिंग-फेंसिंग करणे तसेच आनंद विहार येथील सभागृहाचे बांधकाम करणे आदि विकासकामांचे त्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यादरम्यान आ. सुलभा खोडके यांच्या हस्ते विकासकामांच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. यावेळी जनसामान्यांच्या वतीने प्राप्त निवेदनांचा स्वीकार करीत आगामी काळात या समस्यांचे शीघ्रतम निराकरण करण्यात येईल.



असा विश्वास व्यक्त करीत स्थानिकांनी केलेल्या सत्काराचा स्वीकार करीत आ. सुलभा खोडके यांनी कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी गुरुदेव नगर, प्रकाश नगर, कल्पना नगर क्रमांक - २, आनंद विहार कॉलनी येथील नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# एमडी ड्रग्सचा डिस्ट्रीब्यूटर नागपूरमधून ताब्यात

## -गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी



**अमरावती/ प्रतिनिधीः-** एमडी ड्रग्स व गांजा तस्करांविरुद्ध पोलीस विभागाच्या वतीने विशेष मोहीम चालविण्यात येत आहे. या अंतर्गत मोठे यश गुन्हे शाखाच्या हाती आले आहे. शहर व जिल्ह्यात एमडी ड्रग्सचा सप्लाय करणारा डिस्ट्रीब्यूटर फैयाज अल्ताफ अहमद कुरेशी (वय २५, टेका परिसर ,न्यू व्यास नगर, नागपूर) याला गुन्हे शाखेच्या पथकाने नागपूरमधून ताब्यात घेतले आहे. पथक त्याला घेऊन गुरुवारच्या रात्री शहरात दाखल झाले आहे. त्याच्या कडून आणखीन विचारपूस केली जात आहे. आरोपी फैयाज कुरेशी कोठून ड्रग्स आणत होता आणि कुठे कुठे पाठवत होता याची विचारपूस त्याच्याकडून केली जात आहे. माहितीनुसार गुन्हे शाखेच्या पथकाने दोन दिवसापूर्वी पांढरी हनुमान मंदिर परिसरातून अब्दुल राजीक अब्दुल ताहीर (वय ३५, अलिहाल कॉलनी ) याला ५७ ग्रॅम ड्रग्स सह अटक केली होती. त्याच्याकडून पोलिसांना माहिती मिळाली की , ड्रग्स तस्करीचे नागपूर कनेक्शन आहे. त्याने विचारपूसमध्ये पोलिसांना सांगितले की, डिस्ट्रीब्यूटर फैयाज अहमद अल्ताफ कुरेशी अमरावती शहरात वेगवेगळया तस्करांना ड्रग्स सप्लाय करतो. यावरून गुन्हे शाखेच्या पथकाने नागपूर मध्ये कार्यवाही करून आरोपी फैयाज अहमद याला गुरुवारी रात्री ताब्यात घेतले. नागपूर मध्ये औपचारिक प्रक्रिया पूर्ण करून त्याला शहरात आणले. शुक्रवारी सकाळ पासून पोलीस आयुक्तालय मध्ये गुन्हे शाखेचे अधिकारी ☞(पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी काँग्रेसचे शिदोरी आंदोलन

## चांदुर बाजार तहसीलच्या आवारातच काँग्रेसने थापल्या चुलीवर भाकरी

### काळी दिवाळी साजरी करत शासनाचा केला निषेध



**चांदुरबाजार/ तालुका प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५०हजार रुपयांची मदत करून तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या नेतृत्वात चांदूरबाजार तहसील कार्यालयात शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत काळी दिवाळी साजरी करून तहसिल परिसरातच चुलीवर बेसन भाकर करून शिदोरी आंदोलन करून तहसिलदार सोनल सूर्यवंशी यांना निवेदन देण्यात आले.

चांदुर बाजार तालुक्यातील दिवसभर उन्हात राबणारा शेतकरी आजही त्या मदतीच्या आशेवर जगतोय . त्याच्या घरात तेलाचा दिवा नाही , पण आशेचा दिवा अजून विझलेला नाही . मात्र , सरकारने त्याच्या सहनशक्तीचा एवढा अंत पाहू नये . कारण जर हीच थट्टा सुरू राहिली , तर ही शांतता संतापात आणि हा संयम उद्रेकात बदलायला वेळ लागणार नाही ! शेतकऱ्यांचे संपूर्ण पीक ( संत्रा , सोयाबिन , कपाशी , तूर इ . पीके ) अतिपावसामुळे पुर्णपणे नष्ट झालेली आहेत . त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे . चांदुर बाजार तहसील कार्यालयात काँग्रेस कार्यकर्त्यांनी तसेच शेतकऱ्यांनी शासनाला शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात याव्या याकरिता शिदोरी आंदोलन केले असता कार्यालय परिसरातच महिला व कार्यकर्त्यांनी चुलीवर बेसन, भाकर शिजवून आंदोलनातील शेतकऱ्यांनी शासनकर्ते तुपाशी अन् शेतकरी मात्र उपाशी असल्याने शासनाचा निषेध व्यक्त करून जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलू देशमुख यांच्यासह शेकडो कार्यकर्ते तसेच शेतकऱ्यांनी एक घास बेसन भाकरीचा घेत काळी दिवाळी साजरी केली. ☞(पान २ वर)

# दर्यापूर तालुका काँग्रेसचे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी 'शिदोरी आंदोलन'

## निरीक्षक प्रशांत पाचडे यांची उपस्थिती




**खल्लार/ प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुका काँग्रेस व शहर काँग्रेसच्या वतीने (दि. १७ )काँग्रेस तालुकाध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांच्या नेतृत्वात तसेच अकोटचे सभापती तथा पक्षनिरीक्षक प्रशांत पाचडे यांचे प्रमुख उपस्थितीत दर्यापूर तहसिल कार्यालयावर 'शिदोरी आंदोलन' (काळी दिवाळी) आयोजित करण्यात आले.

अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे. सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, मालाला भाव नाही आणि शासनाकडून अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. दिवाळीसारख्या आनंदाच्या सणाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी मात्र निराशेच्या छायेत आहे. शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी दुर्लक्ष केल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे. दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांच्या नेतृत्वाखाली व दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुनिल गावंडे , शहर अध्यक्ष आतिश ☞(पान २ वर)

# भूकंपाने हादरले शिवणगांव

## अचानक घरातील भांडे पडल्याने उडाली खळबळ



**अमरावती/ प्रातिनिधीः-** तिवसा तालुक्यातील शिवणगाव फत्तेपूर येथे आज शुक्रवार १७ ऑक्टोबरच्या दुपारी १.१५ ते १.२० वाजताच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. या भूकंपाच्या धक्क्यामुळे कोणतीही जीवित वा वित्तहानी झालेली नाही. गावात उपस्थित असलेल्या तलाठी आणि ग्रामसचिवांनी ही माहिती जिल्हा प्रशासनाला दिली.दुपारी अचानकपणे परिसरात हादरे जाणवले. काही लोकांच्या घरातील भांडी खाली पडली. त्यामुळे एकच खळबळ उडाली. या संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांना पत्राद्वारे ही माहिती कळवली आहे. शिवणगाव फत्तेपूर येथे दुपारी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली. याआधी सुद्धा परिसराममध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते.या धक्क्यांमुळे कुठल्याही प्रकारची हानी झालेली नाही. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर भूकंपाच्या तीव्रतेबाबत कोणताही संदेश प्राप्त झालेला नाही. भूकंपाच्या सौम्य धक्क्यामुळे परिसरातील गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भूकंपाची तीव्रता आणि क्षेत्रीय तपासणी (सर्वेक्षण) करण्यासाठी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, मध्य विभाग, नागपूर येथील पथक घटनास्थळी पाठवण्याबाबत भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे. गेल्या ७ सप्टेंबरला तिवसा तालुक्यातील च शिरजगाव मोझरी येथे भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते. गावात सकाळी अचानक अनेक घरात पाट्यांवर ठेवलेली भांडी जमिनीवर कोसळली. अनेकांना शेतात जमिनीला हादरा बसतोय असे लक्षात आले. या प्रकारामुळं ग्रामस्थांमध्ये भीती ☞(पान २ वर)

# सिंभोरा नदीत बुडालेल्या मुलाचा आढळला मृतदेह



**मोर्शी/ प्रतिनिधीः-** सिंभोरा नदीमध्ये बुडाल्याने एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलाचा मृत्यू झाल्याची घटना आज शुक्रवार १७ ऑक्टोबर च्या दुपारी समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली. जय मुकेश मनोटे ( सिंभोरा, मोर्शी) असे मृतक मुलाचे नाव आहे. माहितीनुसार जय मनोटे शुक्रवारच्या दुपारी दीड वाजता सुमारास सिंभोरा नदी मध्ये पाय घसरल्याने बुडाला. याची माहिती नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन पथकाला दिली. माहिती मिळताच पथक तेथे दाखल झाले. पथकाने ३० मिनिटाच्या प्रयत्नानंतर जय मनोटेचा ☞(पान २ वर)

# सक्करसाथ, सराफा परिसरात मनपाची मोठी कारवाई

## दोन गोडाऊन सील, २१५० किलो प्रतिबंधित प्लास्टिकसह ३ ट्रक माल जप्त



**अमरावती/ प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेतर्फे शहरात स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि प्लास्टिक बंदी मोहिमेला गती देत महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १६ ऑक्टोंबर व दिनांक १७ ऑक्टोंबर, २०२५ रोजी सक्करसाथ आणि सराफा परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्ती मोहीम राबविण्यात आली. मनपाच्या प्लास्टिक बंदी अंमलबजावणी पथकाने सायंकाळपासून उशिरापर्यंत चालविलेल्या या कारवाईत प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा व वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान मनपाच्या पथकाने दोन मोठी गोडाऊन सील करत २१५० किलो प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य आणि तब्बल तीन ट्रक माल जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये ☞(पान २ वर)

# धावत्या एसटी बसमधून निघाला धूर

## परतवाडा मार्गावरील घटना, थोडक्यात बचावले प्रवासी



**परतवाडा/ प्रतिनिधीः-** अमरावतीहून परतवाडाकडे येणाऱ्या अमरावती आगाराच्या बसमधून बुधवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास अचानक धूर निघायला सुरुवात झाली. चालकाने बस थांबवली. प्रवासी सुखरूप खाली उतरले. सुदैवाने कुठलीच अनुचित घटना घडली नाही. मात्र, नेहमीच्या या प्रकाराने प्रवासी कमालीचे संतप्त झाले. परतवाडा-अमरावती मार्गावरून सर्वाधिक प्रवासी वाहतूक आहे. आधीच रस्ते जिवावर उठले असताना नेहमीप्रमाणे परिवहन महामंडळाच्या बसमधून जीवघेणा प्रवास नागरिकांना करावा लागत आहे. बुधवारी रात्री ८ वाजता अमरावती आगाराची साधारण बस आष्टी नजीक येताच त्यामधून धूर निघायला सुरुवात झाली. प्रवाशांच्या लक्षात येताच बसचालकाने थांबवून प्रवासी बाहेर ☞(पान २ वर)

# संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला सेवा गौरव पुरस्कार

## शासनातर्फे पुण्यात विश्वस्तांचा गौरव



**अमरावती/ प्रतिनिधीः-** शासनाच्या आरोग्य विभागातर्फे उत्तम कार्यासाठी देण्यात येणाऱ्या वंदनीय बाळासाहेब ठाकरे जन आरोग्य सेवा गौरव पुरस्काराने अमरावती येथील श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला गौरविण्यात आले आहे.

पुण्यातील पिंपरी चिंचवड येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात शुक्रवारी सकाळी झालेल्या कार्यक्रमात सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार दत्तात्रय भरणे, पद्मश्री पोपटराव पवार, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्याहस्ते श्री संत अच्युत महाराज ☞(पान २ वर)

# मुख्यमंत्री सहायता निधीत बाजार समितीकडून ५ लाखाची मदत

## -शेतकऱ्यांसाठी घेतला पुढाकार



**अमरावती/ प्रतिनिधीः-** राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये पाच लाख रुपयांचा धनादेश निवासी उप जिल्हाधिकारी यांच्या कडे प्रदान करण्यात आला.

यंदाच्या मान्सूनमध्ये अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने थैमान घातले होते. शेतांमध्ये पाणी साचून शेती पिकांचे आतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्यांना आर्थिक झळ बसली आहे. काही शेतकऱ्यांचा तर शेतीसाठी केलेला खर्च देखील निघणे कठीण झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. ☞(पान २ वर)


# खोलापुरी गेट परिसरात गळफास घेऊन दोघांची आत्महत्या

**अमरावती/ प्रतिनिधीः-** खोलापुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत दोन तरुणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. वल्लभनगर दोन मध्ये राहणाऱ्या कैलास श्रीराम हेमने (वय ४६) याने गुरुवारी रात्री आपल्या घरात गळफास लावून आत्महत्या केली. कैलासला दारू पिण्याचे व्यसन होते. त्यामुळे त्याची पत्नी मुलांना घेऊन माहेरी गेली होती. अशाच त्याने आपल्या घरी आत्महत्या केली. गुरुवारच्या रात्री साडेनऊ वाजता त्याचा भाऊ पवन हेमने त्याला जेवण करण्यासाठी बोलवायला गेला तर ,तो गळफास घेऊन लटकलेला दिसला. भावाने ☞(पान २ वर)

# भाऊसाहेबांच्या जन्मगावी पापळ येथे मिळाले कृषी महाविद्यालय

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मागणीला मोठे यश, -शिव परिवाराच्या स्वप्नाची पूर्तता- हर्षवर्धन देशमुख







**अमरावती/ प्रतिनिधीः-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेची महत्त्वाची मागणी राज्य सरकारने आज पूर्ण केली असून खऱ्या अर्थाने शिव परिवाराच्या स्वप्नाची ही पूर्तता आहे. भाऊसाहेबांच्या जन्मगावी म्हणजे पापळ येथे शासनाने आज अध्यादेश काढून कृषी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता दिली.ही श्री शिवाजी शिक्षण संस्थेसाठी मोठी उपलब्धी आहे. खऱ्या अर्थाने श्री शिवाजी शिक्षण संस्थेला आज मोठे यश प्राप्त झाले असून महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार मानत असल्याची प्रतिक्रिया श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने आज जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला ☞(पान २ वर)

### महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार

श्री.शिवाजी शिक्षण संस्थेच्या मागणीची दखल घेत पापळ येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्याची मान्यता प्रदान केल्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार मानले आहे. उल्लेखनीय म्हणजे गेल्या वर्षी भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथी सोहळ्यात तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पापळ येथे लवकरच कृषी महाविद्यालय सुरू करू असे आश्वासन दिले होते. आज ही मागणी पूर्ण झाल्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या संपूर्ण कार्यकारिणीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. यासोबतच या मागणीच्या पूर्तते करिता ज्यांचे विशेष सहकार्य लाभले असे आ. प्रताप अडसड व आ. रणधीर सावरकर यांचे देखील संस्थेच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.



सुशिल पर्वतकर यास प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्य अभिवादन

अभिवादक
श्री निलकंठ वकील पर्वतकर (आजोबा), निळाताई निळकंठ पर्वतकर (आजी), श्री.गजानन नि. पर्वतकर (वडील), सौ.वर्षाताई ग. पर्वतकर (आई), अनुश्री ग. पर्वतकर (बहीण), देवानंद नि. पर्वतकर (काका), सौ रुपाली दे. पर्वतकर (काकू), उज्ज्वल दे. पर्वतकर (भाऊ), आस्था दे. पर्वतकर (बहीण), रंगराज पळसपगार (आतेमामा), सौ सुरेखा रंगराज पळसपगार (आत्या), सिद्धांत पळसपगार (आतेभाऊ), रजतकुमार पळसपगार (आतेभाऊ )
व समस्त पर्वतकर परिवार मोचर्डा (म्हैसपूर)ता. दर्यापूर